नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ६९ * * नागपूर * शनिवार, दिनांक ७ जून २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## ऑपरेशन ब्लू स्टारचा ४१ वा स्मृती दिन

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :**
शुक्रवारी पंजाबमधील अमृतसरमध्ये ऑपरेशन ब्लू स्टारचा ४१ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सकाळी ८ वाजता अकाल तख्त साहिब येथे अरदास आयोजित करण्यात आला. त्यानंतर लोकांनी हातात जर्नेल सिंग भिंद्रनवालाचे पोस्टर घेऊन खलिस्तान झिंदाबादचे नारे दिले.
वाद टाळण्यासाठी, अकाल तख्त साहिबचे कार्यवाहक जथेदार कुलदीप सिंग गडगज यांनी अरदास दरम्यान समुदायाला संदेश दिला. समुदायाला दिलेल्या संदेशात त्यांनी म्हटले की, शिखांनी त्यांच्या मागण्यांसाठी एकाच झेंड्याखाली लढावे. यासोबतच त्यांनी शीख कैद्यांच्या सुटकेबद्दल आणि बलवंत सिंग राजोआनाच्या सुटकेबद्दल बोलले पाहिजे.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## समृद्धीचे गणित

अखेर एकदाचा समृद्धी महामार्गाच्या संपूर्णीकरण सोहळ्याचा उपचार पार पडला. हा समृद्धी महामार्ग नागपूर आणि मुंबई यांच्यातील तेवढेच अंतर कापण्यासाठी जो वेळ लागत होता. तो कापून 60 टक्के वर आणला. म्हणजे आता नागपूर ते मुंबई हे अंतर आठ तासात पार होईल, अशी घोषणा करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता समृद्धी महामार्ग मुंबईला पोहोचतच नाही. त्याची समृद्धी फक्त ठाण्यापर्यंत आहे. आपल्या मनाचे समाधान करण्यासाठी आणि ज्यांना ज्यांना ठाणे म्हणजे मुंबई नाही. हे माहीत नाही, त्यांना आठ तासात मुंबई हे गणित सांगायला हरकत नाही. समृद्धी महामार्ग संपल्यावर मुंबई जिथून शून्य मैलावर राहते. तोपर्यंत मुंबईच्या गजबजलेल्या रस्त्यांवरून ते ठिकाण गाठण्यास किमान दोन ते अडीच तास लागतात. समृद्धीचा प्रवास ठाण्यापर्यंत करण्यासाठी 120 किलोमीटर प्रति तासाचे गणित केले. तर कुठेही न थांबता हा प्रवास आठ तासात पूर्ण होऊ शकतो. पण या आठ तासात तुम्ही स्वतः गाडी चालवत असाल किंवा तुमचा एखादा ड्रायव्हर गाडी चालवत असेल. तर किमान तीन वेळा तुम्हाला गाडी थांबवावी लागते. तशी ती थांबवणे भाग आहे. अन्यथा चालकाला झोप येईल. कारण त्या मार्गावर ब्रेक मारायचा नसतो. ब्रेक मारण्याची सहसा गरजच नसते. सहजपणे इतर वाहनांना ओव्हरटेक करता येते. अशा स्थितीत इतर कोणतीही दक्षता घेण्याची गरज नसते. त्यामुळे जर गाडी दर दोनशे किलोमीटरवर थांबवली नाही. तर ड्रायव्हरला डुलकी लागण्याचा आणि गाडीला अपघात होण्याचा धोका उद्भवू शकतो. यामुळे स्वयंचलित गाड्यांच्या दाव्यावर आपल्याला विश्वास ठेवता येत नाही. त्या गाडीचे ॲव्हरेज प्रतिलिटर 30 किलोमीटर असते. प्रत्यक्षात तेच ॲव्हरेज इथे 14 ते 15 किलोमीटर प्रतिलिटर पेक्षा जास्त उतरत नाही. या समृद्धीचा खर्च 15000 कोटी रुपयांनी वाढलेला आहे. त्यावर विरोधी पक्षनेते काँग्रेसचे राज्याध्यक्ष सपकाळ साहेबांनी भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे. काँग्रेसच्या राज्यातही एखादी योजना ठराविक वेळेत पूर्ण होत नसायची. तेव्हा अनेक वेळा वाढत्या महागाईमुळे भाववाढ देण्यात येत होती. तेव्हा जर योग्य असेल तर त्या पद्धतीचा खर्च केला जात होता. तर मग आताही हे योग्यच म्हणावे लागेल. मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेच्या कंत्राटाचे टेंडर धीरूभाई अंबानी यांनी 33 हजार कोटी रुपयांचे भरले होते. तो मुंबई पुणे एक्सप्रेस महामार्ग तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीनजी गडकरी यांनी केवळ अठरा हजार कोटी रुपयांत तयार केला. त्यामुळे आता भ्रष्टाचार वगैरेच्या बाबतीत कोणाकडे बोट दाखवणे म्हणजे स्वतःकडेच बोट दाखवण्यासारखे होते. जेव्हा या समृद्धी महामागार्चा पहिला टप्पा पूर्ण झाला. तेव्हा भव्यदिव्य कार्यक्रम करून महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रांना जाहिराती देऊन तो प्रसंग थाटामाटाने पार पाडला होता. आता मात्र महाराष्ट्राच्या तिजोरीवर जास्त ताण पडू नये. म्हणून समृद्धीचे समापन कमी खर्चात करण्यात आलेले आहे, हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. आता समृद्धीच्या महामार्गावरून मुंबईची समृद्धी नागपूर पर्यंत जाईल, असा विश्वास व्यक्त करूया. तसेच या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न साकार झाले, त्याबद्दल त्यांचेही मनस्वी अभिनंदन!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# जगातील सर्वात उंच चिनाब आर्च ब्रिजचे
# पीएम मोदी यांच्याहस्ते उद्घाटन

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ६ :**
संपूर्ण जगातील सर्वाधिक उंच अशा चिनाब आर्च ब्रिजचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तिरंगा फडकावून उद्घाटन केले. शुक्रवारी कटरा येथे हा कार्यक्रम झाला.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, मुख्यमंत्री ओमर देखील सातवी-आठवीपासून काश्मीरला रेल्वेशी जोडणारा प्रकल्प पूर्ण होण्याची वाट पाहत होते. लोक फ्रान्समधील आयफेल टॉवर पाहण्यासाठी जातात, आता लोक चिनाब आर्च ब्रिज पाहण्यासाठी काश्मीरमध्ये येतील. हा पूल स्वतःच एक पर्यटन स्थळ बनेल. लोक सेल्फी पॉइंटवर सेल्फी घेतील.

तत्पूर्वी, पंतप्रधानांनी जम्मूच्या रियासी जिल्ह्यात चिनाब नदीवर बांधलेल्या जगातील सर्वात उंच रेल्वे चिनाब आर्च ब्रिजचे तिरंगा फडकावून उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी कटरा येथे अंजी ब्रिज आणि काश्मीरची पहिली ट्रेन वंदे भारतला हिरवा झेंडा दाखवला.

उत्तर रेल्वे ७ जूनपासून कटरा-श्रीनगर मार्गावर वंदे भारत ट्रेन सेवा सुरू करणार आहे. आयआरसीटीसी वेबसाइटवर तिकीट बुकिंग करता येईल. कटरा आणि श्रीनगर दरम्यान आठवड्यातून ६ दिवस दोन गाड्या धावतील.


स्वातंत्र्याच्या ७७ वर्षांनंतरही, हिमवषार्वाच्या काळात काश्मीरचा देशाच्या इतर भागापासून संपर्क तुटलेला राहतो. राष्ट्रीय महामार्ग-४४ बंद असल्याने, खोऱ्यात जाण्याचा मार्ग बंद आहे. याशिवाय, जम्मू ते काश्मीर रस्त्याने प्रवास करण्यासाठी ८ ते १० तास लागायचे. ट्रेन सुरू झाल्यामुळे, हा प्रवास सुमारे तीन तासात पूर्ण होईल.

पंतप्रधान म्हणाले, 'दहशतवादामुळे जम्मू-काश्मीरच्या लोकांसाठी त्यांच्या पसंतीचे प्रतिनिधी निवडणे एक आव्हान बनले होते. जम्मू-काश्मीरने इतका विनाश पाहिला की लोकांनी स्वप्न पाहणे सोडून दिले. त्यांनी दहशतवादाला आपले भाग्य म्हणून स्वीकारले होते. आम्ही ते बदलले आहे. आज येथील तरुणही नवीन स्वप्ने पाहत आहेत. लोकांना जम्मू-काश्मीर पुन्हा चित्रपट आणि खेळांचे केंद्र बनताना पहायचे आहे.

ते म्हणाले, आज ६ जून आहे. एक महिन्यापूर्वी, ६ मे च्या रात्री, पाकिस्तानचा नाश झाला होता. जर पाकिस्तानने कधी ऑपरेशन सिंदूरचा विचार केला तर त्याला त्याचा पराभव आठवेल. आपला शेजारी मानवतेच्या विरोधात आहे, सौहार्दाच्या विरोधात आहे. जम्मू-काश्मीरचे लोक ज्या पद्धतीने पाकिस्तानच्या कटाविरुद्ध उभे राहून जम्मू-काश्मीरच्या लोकांची ताकद दाखवली, जम्मू-काश्मीरच्या लोकांनी जगाला एक मजबूत संदेश दिला आहे. येथील लोकांनी दहशतवादाला कडक उत्तर देण्याचा निर्णय घेतला आहे.











पंतप्रधान मोदी म्हणाले, चिनाब पूल किंवा अंजी पूल, हे जम्मू आणि काश्मीर दोन्हीसाठी समृद्धीचे साधन बनतील. यामुळे पर्यटनासोबतच रेल्वे कनेक्टिव्हिटी आणि व्यवसाय वाढेल. यामुळे उद्योगाला चालना मिळेल. काश्मीरचे सफरचंद देशाच्या मोठ्या बाजारपेठेत वेळेवर पोहोचू शकतील. सुकामेवा, पश्मीना शाल, हस्तकला देशाच्या कोणत्याही भागात पोहोचू शकतील. जम्मू आणि काश्मीरच्या लोकांना देशाच्या कोणत्याही भागात प्रवास करणे सोपे होईल.

पंतप्रधान म्हणाले, 'मला चिनाब पूल आणि अंजी पुलाचे उद्घाटन करण्याची संधी मिळाली. जम्मू आणि काश्मीरला दोन नवीन गाड्या मिळाल्या. नवीन वैद्यकीय महाविद्यालयाची पायाभरणी करण्यात आली. ४६०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांमुळे जम्मू आणि काश्मीरला नवी चालना मिळेल. या विकासाबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. रेल्वे कनेक्टिव्हिटीचे स्वप्न पाहत येथे अनेक पिढ्या गेल्या आहेत.

यावेळी जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी जाहीर सभेला संबोधित केले. ओमर म्हणाले, त्यावेळी आमचे राज्यपाल साहेब रेल्वे राज्यमंत्री होते. देवीच्या कृपेने त्यांना बढती मिळाली आणि माझे डिमोशन झाले.

मी राज्याचा मुख्यमंत्री होतो, आता मी केंद्रशासित प्रदेशाचा मुख्यमंत्री आहे. पण मला विश्वास आहे की ते दुरुस्त करण्यासाठी जास्त वेळ लागणार नाही. तुमच्या (पंतप्रधान मोदी) हातून जम्मु आणि काश्मीरला राज्याचा दर्जा मिळेल.

## वारीच्या वाटेवर विष नको, भक्तीचा प्रसादच द्या..

**मंत्री झिरवळांचा भेसळखोरांना इशारा**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**
पंढरपूर वारीच्या प्रवासात वारकऱ्यांच्या ताटात भक्तीऐवजी भेसळ पडू नये, यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी थेट मैदानात उतरून भेसळमुक्त अन्न मोहिमेला सुरुवात केली आहे.

मंत्री झिरवळ यांनी यंदाच्या वारीत फूड सेफटी व्हॅन, भेसळ चाचणी मोहिमा आणि जनजागृती कीर्तने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. अन्न व औषध प्रशासनात नुकतीच १८९ अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची भरती झाली असून, त्यांना आज नियुक्तीपत्रांचे वाटप होणार आहे.

## सामाजिक न्याय विभागाचा निधी
## पुन्हा लाडकी बहीण योजनेसाठी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**
लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारची चांगलीच दमछाक होताना दिसतेय. या योजनेसाठी लागणारा निधी भागवण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी पुन्हा एकदा वळवण्यात आला आहे. यामुळे राजकीय वतुर्ळात पुन्हा एकदा नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्य सरकारकडून लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागातील अनुसूचित जाती घटकांसाठी मंजूर केलेल्या ४१०.३० कोटी रुपयांचा निधी वळवण्यात आला आहे. विशेष म्हणजे याआधीही हाच निधी एकदा वळवण्यात आलेला होता. म्हणजेच आतापर्यंत सामाजिक न्याय विभागाचा ८२० कोटी ६० लाख रुपयांचा निधी लाडकी बहिण योजनेसाठी वापरण्यात आला आहे.

**आदिवासी विभागालाही फटका**

आदिवासी विकास विभागाकडूनही तब्बल ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी तीन वेळा वळवण्यात आला असून, एकूण १००७ कोटी रुपयांचा निधी लाडकी बहिण योजनेसाठी वापरला गेला आहे.

यामुळे दोन्ही विभागांकडून एकत्रितपणे १८२७ कोटी ७० लाख रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वळवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

या पूर्वीही सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी यावरून अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर थेट टीका केली होती. आता पुन्हा एकदा त्यांच्या खात्यातील निधी वळवल्याने राजकीय आरोप-प्रत्यारोपांना पुन्हा एकदा हवा मिळण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे.

यावर्षी सामाजिक न्याय विभागासाठी एकूण २९ हजार ९७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी जवळपास ५ हजार कोटी रुपये लाडकी बहीण आणि तत्सम योजनांसाठी ठेवण्यात आले आहेत.

# १२ कुख्यात नक्षल्यांचे मुख्यमंत्र्यांसमक्ष आत्मसमर्पण

■ **महासागर प्रतिनिधी**
**गडचिरोली, दि. ६ :**
राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज, शुक्रवारी जिल्हा दौऱ्यावर असतांना मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत 1 कोटी 12 लाख रुपयाचे बक्षिस असलेल्या नक्षल चळवळीतील वरिष्ठ जहाल 12 माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे.

यामध्ये डिकेएसझेडसीएम गीरेड्डी पवनानंद रेड्डी यांची पत्नी डिव्हीसीएम सपनाक्का हिचेसह चार डीव्हीसीएम दजार्चे वरीष्ठ कॅडर, एक कमांडर, दोन उप-कमांडर, चार एसीएम व एक सदस्य पदावरील माओवाद्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे प्रथमच दोन जहाल माओवाद्यांनी स्वयंचलीत एके-47 शस्त्र व इतर शस्त्रांसह माओवादी गणवेशात मुख्यमंत्री यांच्या समक्ष आत्मसमर्पण केले आहे. यामुळे गडचिरोली आणि संपूर्ण दंडकारण्य विभागातील माओवादी चळवळीला मोठा हादरा बसला आहे.

यामध्ये इंद्रावती एरिया डिव्हीसीएम सपना ऊर्फ सपनाक्का ऊर्फ स्वप्ना ऊर्फ पापक्का बुचय्या चौधरी (55) रा. वेलगूर ता. अहेरी, कुतूल एरिया कमिटी एरिया कमिटी (कृषी विभाग) डिव्हीसीएम रामदास ऊर्फ झिटकुराम ऊर्फ चित्राजी ऊर्फ सोमाजी ऊर्फ रामजी मटकुवरसिंग हलामी, (55) रा. कवडीकसा, ता. धानोरा, तसेच याच दलमचे डिव्हीसीएम (कृषी विभाग) शिवलाल ऊर्फ सुकलु सनकु पदा, (60) व पुष्पा ऊर्फ शामबत्ती नांगसाय होळी (55) दोघेही रा. गुर्रेकसा, ता. धानोरा, रा. गुर्रेकसा तह. धानोरा, कुतूल दलम कमांडर कोसा कुम्मा गोटा (35) रा. कस्तुरमेट्टा, ता. ओरच्छा, जि. नारायणपूर छत्तीसगड, अहेरी दलम उपमकमांडर दुर्गी ऊर्फ रम्मी चित्रा विडपी (35) रा. होडरी, ता. भामरागड, राही दलम उपकमांडर अजय ऊर्फ भीमा सोमडू मुचाकी (27) रा. भुसापूर, पो. उसुर, ता. मारुबाक, जि. बीजापूर (छत्तीसगड), सप्लाय टिमची एसीएम संगिता ऊर्फ मसरी दोगे आत्राम (40), रा. रामय्यापेठा, ता. अहेरी, भामरागड दलम एसीएम सविता ऊर्फ सुनिता भिमा नरोटे (35) रा. पिपली बुर्गी, ता. एटापल्ली, पश्चिम सब झोनल टेलर टिमची एसीएम अंजु ऊर्फ छाया दसरु वड्डे (25) रा. झुरी, ता. एटापल्ली, डॉक्टर टिमची एसीएम अरुणा ऊर्फ सोमारी ऊर्फ प्रिती येर्रा तलांडी (30) रा. जिंजगाव, ता. भामरागड, कंपनी क्र. 10 चा सदस्य दिलीप ऊर्फ सुधाकर कारु मोहंदा (28) रा. मुरंगल, ता. भामरागड असे आत्मसमर्पित जहाल माओवाद्यांची नावे आहेत.



### १ कोटी १२ लाखांचे होते बक्षीस : नक्षल चळवळीला हादरा

**आत्मसमर्पित नक्षल्यांवर असे होते बक्षिस**

महाराष्ट्र शासनाने सपना ऊर्फ सपनाक्का ऊर्फ स्वप्ना ऊर्फ पापक्का बुचय्या चौधरी, रामदास ऊर्फ झिटकुराम ऊर्फ चित्राजी ऊर्फ सोमाजी ऊर्फ रामजी मटकुवरसिंग हलामी, शिवलाल ऊर्फ सुकलु सनकु पदा तसेच पुष्पा ऊर्फ शामबत्ती नांगसाय होळी यांचेवर प्रत्येकी 16 लाख रुपयाचे बक्षीस जाहिर केले होते. तर कोसा कुम्मा गोटा याचेवर 8 लाख रुपये, दुर्गी ऊर्फ रम्मी चिन्ना विंडपी, अजय ऊर्फ भीमा सोमडू मुचाकी, संगिता ऊर्फ मसरी दोगे आत्राम, सविता ऊर्प सुनिता भिमा नरोटे, अंजु ऊर्फ छाया दसरु वड्डे, अरुणा ऊर्फ सोमारी ऊर्फ प्रिती येर्रा तलांडी यांचेवर प्रत्येकी 6 लाख रुपये तर दिलीप ऊर्फ सुधाकर कारु मोहंदा याचेवर 4 लाख रुपयाचे बक्षीस जाहिर केले होते.

**चार वर्षात 34 नक्षल्यांचे आत्मसमर्पण**

गडचिरोली पोलिस दलाने अतिशय प्रभावीपणे माओवादाविरोधी अभियान राबविल्यामुळे तसेच शासनाने माओवाद्यांना आत्मसमर्पणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिल्याने, सन्मानाने जीवन जगण्यासाठी सन 2022 त आजपर्यंत एकूण 34 जहाल नक्षल्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर जाऊन स्थितीचा आढावा घेतला. यावेळी बोलताना त्यांनी आपल्या एवढा दुसरा कोणताही मुख्यमंत्री गडचिरोलीत फिरला नाही असा दावा केला. गडचिरोलीत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले सुरक्षा जवान चांगले काम करत आहेत. या सुरक्षा यंत्रणांचे मनोधैर्य वाढावे म्हणून मी अशा दुर्गम आऊटपोस्टवर येत असतो, असेही ते यावेळी म्हणाले.

गडचिरोलीत आज १३ आत्मसमर्पित नक्षलवादी तरुण-तरुणींचा विवाहसोहळा संपन्न झाला. या सोहळ्याला मुख्यमंत्री फडणवीस हजर होते. या निमित्ताने त्यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर जाऊन पाहणी केली.

यावेळी बोलताना ते म्हणाले, आपण आता महाराष्ट्राच्या पहिल्या पॉईंटवर आलो आहोत. कवंडेच्या पोलिस आऊटपोस्टमुळे या भागातील सुरक्षेचा बॅकलॉग भरून निघाला आहे. हा भाग आजपर्यंत अनकनेक्टेड होता.

पण आता इथे पोलिस आल्यामुळे शासनाच्या योजना, त्यांचे लाभ लोकांना मिळतील. लोकांचा सरकारवरील विश्वास वाढेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

## बाबा सिद्दीकी हत्या
## मास्टरमाइंडला अटक

■ **वृत्तसंस्था, जालंधर, दि. ६ :**
राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील सूत्रधार झीशान अख्तर उर्फ जस्सी पुरेवाल याला कॅनडातील सरे पोलिसांनी अटक केली आहे. ही अटक कोणत्या प्रकरणात करण्यात आली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.



१२ ऑक्टोबर २०२४ च्या रात्री बाबा सिद्दीकींची त्यांचा मुलगा झिशान सिद्दीकीच्या ऑफिसबाहेर गोळ्या घालून हत्या करण्यात आली.

गँगस्टर लॉरेन्स गँगने या हत्येची जबाबदारी घेतली. टोळीने दावा केला होता की, बाबा सिद्दीकींचा बॉलीवूड स्टार सलमान खानशी जवळचा संबंध होता. म्हणूनच त्यांची हत्या करण्यात आली.

सिद्दीकींच्या हत्येमागील सूत्रधार जालंधरचा रहिवासी झीशान अख्तर होता. हत्येनंतर तो परदेशात पळून गेला.

## जेटलींना सांगितले होते, जातो म्हणून...
### मल्ल्या म्हणाला मी फरार नाही, चोर म्हणू नका

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. ६ :**
फरार उद्योगपती विजय मल्ल्याने दावा केला की देश सोडण्यापूर्वी त्याने तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांची भेट घेतली आणि त्यांना सांगितले की तो एका बैठकीसाठी जिनेव्हाला जात आहेत आणि परत येईल. परंतु त्याचा पासपोर्ट रद्द करण्यात आला, ज्यामुळे तो परत येऊ शकला नाही.



त्याचबरोबर, किंगफिशर एअरलाइन्सच्या अपयशाबद्दल त्याने पहिल्यांदाच सार्वजनिकरित्या माफी मागितली आहे. तो म्हणाला, किंगफिशर एअरलाइन्सच्या अपयशाबद्दल मी सर्वांची माफी मागतो. मल्ल्याने हे विधान उद्योगपती राज शमानी यांच्यासोबतच्या पॉडकास्टमध्ये केले. जो शुक्रवारी प्रसिद्ध झाला.

चोर म्हटल्याबद्दल मल्ल्या म्हणाला, ते मला फरार म्हणत आहेत, पण मी पळून गेलो नाही. मी वेळापत्रकानुसार परदेशात गेलो आणि माझ्याकडे योग्य कारणे असल्याने परतलो नाही. पण मला 'चोर' का म्हटले जात आहे? चोरी कुठे झाली?

किंगफिशर एअरलाइन्सशी संबंधित आर्थिक अनियमिततेच्या आरोपांमुळे २०१६ मध्ये उद्योगपती आणि माजी खासदार विजय मल्ल्या भारतातून युकेला पळून गेला. ५ जानेवारी २०१९ रोजी विजय मल्ल्याला फरार घोषित करण्यात आले.

माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी त्यांची कंपनी वाईट परिस्थितीत असताना किंगफिशर एअरलाइन्सने कमी उड्डाणे चालवावीत, कर्मचाऱ्यांची संख्या कमी करावी असा सल्ला दिल्याचा आरोपही मल्ल्याने केला.

मल्ल्याने सांगितले की मला काम कमी करण्यास मनाई करण्यात आली होती. त्यांनी सांगितले की बँक तुम्हाला मदत करेल. या काळात किंगफिशर एअरलाइन्सला त्यांची सर्व उड्डाणे रद्द करावी लागली. पण, जेव्हा त्याने कर्ज मागितले तेव्हा कंपनीची कामगिरी चांगली नव्हती.

मल्ल्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) ला त्यांचा पहिला आयपीएल ट्रॉफी जिंकल्याबद्दल अभिनंदन केले होते. त्याच्या अभिनंदनपर पोस्टवर वापरकर्त्यांकडून विविध कमेंट आल्या. एकाने लिहिले, आरसीबी जिंकला आहे, आता पैसे परत करा.

# ईडी कार्यालयाला लागलेल्या आगीचा भुजबळांना फटका



**मुंबई :** अंमलबजावणी संचालनालयाच्या मुंबई स्थित कार्यालयाला आगीत राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या पासपोर्टचे नुकसान झाले आहे. कोर्टाने त्यांना परदेश दौऱ्यासाठी १२ जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

मुंबई स्थित विशेष न्यायालयाने गत २९ एप्रिल रोजी छगन भुजबळ यांना परदेश दौऱ्यावर जाण्याची परवानगी दिली होती. पण तेव्हा त्यांचा पासपोर्ट हा ईडीच्या कार्यालयात जमा करण्यात आला होता. कोर्टाच्या निर्देशानुसार गत १३ मे रोजी त्यांना त्यांचा पासपोर्ट मिळाला. पण तो त्यावेळी भिजलेला व फाटका होता. २७ एप्रिल रोजी ईडीच्या दक्षिण कैसर ए हिंद इमारतीत असलेल्या कार्यालयाला आग लागली होती. त्यात या पासपोर्टचे नुकसान झाले होते.

या घटनेनंतर छगन भुजबळ यांनी तत्काळ नवीन पासपोर्ट जारी करण्यासाठी अर्ज केला. पण नवा पासपोर्ट मिळण्यास उशीर झाल्यामुळे त्यांना २२ मे रोजी व्हिसा मिळाला. ईडी कार्यालयाला लागलेली आग व पासपोर्टच्या झालेल्या नुकसानीचा दाखला देत आपल्या परदेश दौऱ्याला १२ जूनपर्यंत मुदतवाढ देण्याची विनंती केली.

पण सरकारी पक्षाने त्यांच्या या विनंतीला विरोध केला. छगन भुजबळ न्यायालयीन कारवाई टाळण्यासाठी व त्यात दिरंगाई करण्यासाठी ही विनंती करत असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. पण विशेष पीएमएलए कोर्टाचे न्यायाधीश एस आर नावंदर यांनी त्यांचा युक्तिवाद फेटाळून लावला.

## पशुकत्तलीच्या तपासणी शुल्कात कपात

**मुंबई :** राज्य सरकारने बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कत्तलीसाठी पशु तपासणीच्या २०० रुपयांच्या शुल्कात मोठी कपात केली आहे. या शुल्क कपातीसाठी समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी पाठपुरावा केला होता.

पशुंची कत्तल करण्यापूर्वी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्र घ्यावे लागते. त्यासाठी प्रती पशु २०० रुपये शुल्क आहे. मांस उत्पादनात राज्याचा वाटा ११ टक्के असून राज्याचे वार्षिक मांस उत्पादन १२ लाख टन आहे. सदर शुल्क पूर्वीप्रमाणे २० रुपये करावे, अशी मागणी शेख यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे केली होती.

अजित पवार यांनी पंकजा मुंडे यांच्याशी चर्चा करत कत्तल शुल्क कपात करण्याची शिफारस केली होती. त्यासदर्भातली अधिसूचना बुधवारी रोजी जारी करण्यात आली. आता हे शुल्क प्रती पशु १०० रुपये राहील. पशुकत्तल परिक्षण शुल्कातील कपातीचा केवळ कुरेशी समाजाला नव्हे तर सर्व मांस ग्राहकांना लाभ होणार आहे.

## ते मुख्यमंत्री असेपर्यंत मराठा समाजावर अन्यायच



**रायगड :** शिवराज्याभिषेक दिनाच्या पार्श्वभूमीवर रायगडावर मोठ्या उत्साहात सोहळा पार पडत असताना, मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. जोपर्यंत देवेंद्र फडणवीस आहेत, तोपर्यंत मराठा समाजावर अन्याय होतच राहणार, असा घणाघात त्यांनी केला.

देवेंद्र फडणवीस आहे तो पर्यंत मराठा समाजावर असाच अन्याय होणार आहे. त्या माणसाला मराठा समाजाबद्दल द्वेष आणि आकस आहे, वाईटनितीने मराठा समाजासोबत त्यांची वागणूक असते असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, देवेंद्र फडणवीस हे मराठा समाजाला न्याय देणार नाही, यामुळेच देशमुख कुटुंबियांना रायगडावर येत छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासमोर नतमस्तक होत न्याय मागावा लागत आहे. सीएम फडणवीसांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणाची विल्हेवाट लावली आहे. हे प्रकरण पूर्णपणे दाबून टाकले आहे. सरकारच्या प्रतिनिधीमध्ये टाकत त्यांनी हे सर्व घडवून आणल्याचा आरोप जरांगे यांनी केला.

# रायगडावर शिवराज्याभिषेक दिनाचा दैदिप्यमान सोहळा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त किल्ले रायगडावर आज दैदिप्यमान सोहळा पार पडलो. ३५१ वर्षांपूर्वी याच दिवशी, ६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता. या ऐतिहासिक सोहळ्याच्या स्मरणार्थ गडावर लाखो शिवभक्तांनी उपस्थिती लावली असून, राजसदरेपासून जगदीश्वर मंदिरापर्यंत जयघोषांनी संपूर्ण गड दुमदुमून गेला होता.

युवराज शहाजी राजे भोसले यांनी राजेशाही पोशाखात रोपवे मार्गे पायऱ्यांद्वारे राजसदरेवर आगमन केले. गडावरून राजांना मुजरा करण्यासाठी देशभरातून आलेल्या ३ ते ४ लाख शिवभक्तांनी गडावर हजेरी लावली. यानंतर युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक घालण्यात आला.

गडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी प्रशासनाने भक्कम व्यवस्था केली असून, २२ मंडप, ५०० लिटरच्या ५० टाक्या, १ लाख पाण्याच्या बाटल्या, ८ आरओ यंत्र, १५ ठिकाणी वैद्यकीय मदत केंद्र उभारण्यात आले आहेत.

गडावरील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी रायगड ते पाचाड परिसरात १०९ सीसीटीव्ही कॅमेरे, १७ ठिकाणी पब्लिक अलाऊंस सिस्टीम, आणि ९ एलईडी स्क्रीनवर थेट प्रक्षेपण सुरू आहे. शिवभक्तांच्या मार्गदर्शनासाठी दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत. एसटी महामंडळाच्या १०० बसगाड्या पाचाड व



पार्किंगच्या ठिकाणी सुरू करण्यात आल्या आहेत. १२ ठिकाणी पार्किंगची सोय देखील करण्यात आली आहे.

**सुरक्षेसाठी फौजफाटा तैनात**

गडावर १७० पोलिस अधिकारी, १२०० पोलिस कर्मचारी, ३५० होमगार्ड, १ एसआरपी प्लाटून, १५० वॉकीटॉकी, स्वतंत्र कंट्रोल रूम आणि प्रत्येक विभागासाठी पीआरओ तैनात आहेत.

**सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन**

माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या उपस्थितीमध्ये शिवराज्याभिषेक दिनाच्या पूर्वसंध्येला दुर्गराज रायगडावर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त राज्यासह देशभरातून मोठ्या संख्येने शिवप्रेमी येथे आले आहेत.

# रायगडावर केवळ पोषक गोष्टीच राहतील

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**



माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी शुक्रवारी शिवराज्याभिषेक दिनाच्या दिवशी पुन्हा एकदा रायगडावर रायगडाला पोषक असणाऱ्या गोष्टीच राहतील असे ठणकावून सांगितले आहे. अतिक्रमण काढत असताना माझे संरक्षण सुद्धा येथील धनगर समाजाला असणार आहे, असेही ते म्हणालेत.

रायगडावर आज तारखेनुसार शिवराज्याभिषेकाचा सोहळा साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने संभाजीराजे छत्रपती यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना दुग्धाभिषेक केला. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी रायगडावर रायगडाला पोषक असणाऱ्या गोष्टीच राहतील असा पुनरुच्चार केला.

ज्या ठिकाणी हजार-दोन हजार लोक यायचे, तिथे आज लाखो लोक येत आहेत. एवढा शिस्तभक्त शिवभक्त... कोणताही कायदा हातात न घेणारा हा शिवभक्त आहे. मला आयजी व एसपीने ही शिस्त कशी निर्माण होते? असा प्रश्न दिला. त्यावर मी त्यांना हे शिवभक्तांवर असणारे संस्कार आहेत, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे संभाजीराजे छत्रपती यांनी रायगडावरील वाघ्या कुत्र्याची हटवण्याची मागणी केली आहे. या श्वानाने शिवाजी महाराजांच्या निधनानंतर त्यांच्या चितेत उडी घेऊन मृत्युला कवटाळल्याची आख्यायिका आहे. पण संभाजीराजे यांनी इतिहासात अशा कोणत्याही घटनेचा उल्लेख नसल्याचा दावा केला आहे.

# आमच्या व त्यांच्या मनात कोणताही संभ्रम नाही

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ६ :**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मनसे सोबतच्या संभाव्य आघाडीवर मोठे विधान केले. महाराष्ट्राच्या मनाज जे आहे तेच होईल. या प्रकरणी आमच्या व त्यांच्या (राज ठाकरे) मनात कोणताही संभ्रम नाही, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे ठाकरे गट व मनसे लवकरच एकत्र येतील, असा दावा केला जात आहे.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या मुंबईतील पदाधिकारी सुजाता शिंगाडे यांनी शुक्रवारी ठाकरे गटात प्रवेश केला. यावेळी




पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी मनसेसोबतच्या संभाव्य युतीवर उपरोक्त भाष्य केले. ते म्हणाले, जे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे तेच होईल. मी या प्रकरणी कोणताही संदेश देणार नाही. थेट बातमी देईल. शिवसैनिकांच्या मनात कोणताही संभ्रम नाही. त्यांचेही मनसैनिक एकमेकांच्या संपर्कात आहेत. त्यांच्याही मनात कोणता संभ्रम नाही. संदेश वगैरे देण्यापेक्षा आम्हाला जी काही बातमी द्यायची आहे, ती देऊ.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी सुजाता शिंगाडे यांचा दाखला देत शिंदे गटात गेलेल्या सर्वच कार्यकर्त्यांना मोठा पश्चाताप होत असल्याचाही दावा केला.

सुजाता शिंगाडे यांनीही यावेळी पत्रकारांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, ती माझी फार मोठी चूक होती. ओरिजनल शिवसेना ही उद्धव ठाकरे यांची व मातोश्रीचीच आहे मागील ५ महिन्यांत मला फार वाईट अनुभव आले. मला त्यांनी कोणतेही आमिष दिले नाही. त्यामुळे मी त्यांची मिंधी नाही. तिकडे सर्व अनागोंदी सुरू असल्याचे त्या म्हणाल्या.

# समृद्धी महामार्गावर एसटीला परवानगी द्या

## सपाचे आमदार रईस शेख यांची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ६ :**



मुंबई ते नागपूर या ७०१ किमीच्या समृद्धी महामार्गावर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसेस-ना धावण्यास संमती द्यावी, अशी मागणी समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्याकडे आमदार शेख यांनी पत्राद्वारे मागणी केली आहे.

आमदार रईस शेख म्हणाले की, समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे गुरुवारी उद्घाटन झाले. आता ७०१ किमी समृद्धी महामार्ग वाहतुकीस पूर्ण खुला आहे. १० जिल्हे, २६ तालुके, ३९ शहरे आणि ३९२ गावांना जोडणारा हा मार्ग राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महामार्ग होणार आहे. मात्र या महामार्गावरून एसटी बसेसना धावण्यास परवानगी नाही.

समृद्धी महामार्ग सार्वजनिक निधीतून बनलेला आहे. तो सामान्य नागरिकांना वापरता आला पाहिजे. एसटी बसेसना समृद्धीवर धावण्यास संमती दिली जात नाही, तोपर्यंत हा मार्ग श्रीमंतांची चैन असणार आहे. मुंबईतील अटल सेतू आणि किनारा रस्ता यावरसुद्धा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मनाई आहे. एसटी बसेसना समृद्धीवर धावण्यास परवानगी देताना टोल माफी देण्यात यावी. अन्यथा सामान्यांना हा प्रवास परवडणारा नाही, असा दावा आमदार रईस शेख यांनी केला.

# वादातून वकिलाने बंदूकच काढली

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. ६ :**

पुण्यात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असल्याचे दिसत आहे. जमिनीच्या वादातून एका वकिलाने थेट बंदूकच बाहेर काढल्याचा प्रकार समोर आला आहे.

पुण्यात जमिनीच्या वादातून सुरू झालेली गुंडगिरी काही नवीन नाही. मुळशी पॅटर्न सारखा चित्रपट देखील याच घटनांवर आधारित आहे. असाच काहीसा प्रकार आता हिंजवडी जवळ असलेल्या कासारसाई येथे घडला आहे. वादात जमीन पाहण्यासाठी गेलेल्या वकिलाला जमिनीच्या मालकाने अडवल्यानंतर वकिलाने थेट बंदुकीचा धाक दाखवला आहे. या घटनेचा व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

बंदूक दाखवत दहशत दाखवणाऱ्या वकीलाचे नाव संदीप भोईर असे आहे. ते धनंजय वाडकर यांचे वकील आहेत. कासारसाई येथील शब्बीर मुलानी आणि वाडकर यांच्यात जमिनीवरून गेल्या अनेक वर्षांपासून वाद सुरू आहेत. मुलानी यांची काही जमीन वाडकरांनी खरेदी केली. मात्र, ही जमीन कूळ कायद्यात मोडत असल्यानं यासाठी गेली १० ते १२ वर्षांपासून न्यायालयीन लढा सुरू आहे. त्यातच, जमिनीच्या ठिकाणी वाद इतका वाढला की वकिलाने थेट बंदूकच बाहेर काढली. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

# अपघातग्रस्त कारमध्ये आढळले तिघांचे कुजलेले मृतदेह

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ६ :**

शहापूर तालुक्यातील उंबरमाळी गावाजवळ मुंबई-नाशिक महामार्गालगत झाडाझुडपात पडलेल्या कारमध्ये तिघांचे कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. हा अपघात चार ते पाच दिवसांपूर्वी झाल्याचा प्राथमिक अंदाज असून, मृतदेहांची स्थिती पाहून याचा अंदाज आला आहे.

गुर चारण्यासाठी गेलेल्या महिलेला झाडांमध्ये गाडीसारखी गोष्ट असल्याचे दिसून आले. झाडाझुडपात अर्धवट झाकलेली ही कार पाहून तिने डोकावून पाहिले असता, आत दुर्गंधीयुक्त वातावरणात तिघांचे मृतदेह दिसले. तातडीने तिने गावकऱ्यांना माहिती दिली.

या घटनेची माहिती मिळताच कसारा पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सुरेश गावीत, पोलिस उपनिरीक्षक सागर जाधव, व पोलिस कर्मचारी उमेश चौधरी, तसेच आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले. शाम धुमाळ, देवा वाघ, दुर्गेश सोनवणे, धर्मेंद्र ठाकूर यांच्यासह पथकाने क्रेनच्या सहाय्याने कार बाहेर काढून तपासणी केली.



कारमध्ये सापडलेले मृतदेह २५ ते ३० वयोगटातील पुरुषांचे असून, कार क्रमांकाच्या आधारे तपास केल्यानंतर ती कार मुंबईतील अंधेरी-खार परिसरातील असल्याचे स्पष्ट झाले. मृतांपैकी एकाची ओळख यशेश वाघेला अशी पटली असून, उर्वरित दोघांची ओळख अद्याप स्पष्ट झालेली नाही. अपघात नेमका कसा आणि कुठे झाला, त्यामागचे कारण काय, हे स्पष्ट होणे अद्याप बाकी आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# दमानियांचे सुपेकरांवर आरोपांच्या नव्या फैरी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**

वैष्णवी हगवणे हुंडाबळी आत्महत्या प्रकरणी अडचणीत सापडलेले आयपीएस जालिंदर सुपेकर यांच्यावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आणखी एक नवा आरोप केला आहे. जालिंदर सुपेकर हे प्रत्येक पोलिस उपनिरीक्षकाकडून पैसे घ्यायचे. एवढेच नव्हे तर दरवर्षी दिवाळीला ते त्यांच्याकडून १ तोळा सोनेही घ्यायचे, असे ते म्हणालेत.

जालिंदर सुपेकर हे मृत वैष्णवी हगवणेचा नवरा शशांक याचे मामा आहेत. अंजली दमानिया शुक्रवारी म्हणाल्या की, काल अशी बातमी होती की, पुण्याच्या येरवडा तुरुंगात एक कैदी होता, त्याला तेथून अमरावतीला हलवण्यात आले. जालिंदर सुपेकर तिथे जाऊन त्या कैद्याला भेटले. त्याच्याकडे सुटकेच्या मोबदल्यात ५०० कोटींची मागणी केली. मी संबंधिताकडून खात्री करून घेतली असता ते म्हणाले की, सुपेकर त्या कैद्याला भेटायला आले, ते म्हणाले तुज्याकडे दीड हजार कोटींची संपत्ती आहे हे मला ठावूक आहे. त्यातील ५५०कोटी रुपये मला दिले तरच तू बाहेर येशील अन्यथा इथेच सडत राहशील.

त्या पुढे म्हणाल्या, जालिंदर सुपेकर त्या तुरुंगात साडेतीन तास बसून होते. अमरावतीचे तत्कालीन जेलर त्यांचे नातलग होते अशी माहिती आहे. मी आता त्याचीही चौकशी करणार आहे. कारण या प्रकरणी रोज नवे खुलासे होत आहेत. काल मला आणखी एका केसची माहिती मिळाली. जालिंदर सुपेकर प्रत्येक पीआयकडून पैसे घ्यायचे, दिवाळीला १ तोळे सोनेही घ्यायचे व जळगावची मिठाई लय भारी असल्याने खरेदी करायचे. या सर्व गोष्टी अत्यंत गंभीर आहेत. मी या प्रकरणी गृहमंत्र्यांना पत्र पाठवणार आहे. वैष्णवी हगवणे प्रकरणातील आरोपी नीलेश चव्हाणला गंभीर आरोप असतानाही शस्त्र परवाना कसा मिळाला? या प्रकरणी सखोल चौकशीची गरज आहे, असेही दमानिया यावेळी बोलताना म्हणाल्या.

अंजली दमानिया यांनी यावेळी बीडमधील गुन्हेगारीच्या घटनांवर भाष्य करत पुण्यातील गुन्हेगारीवरून उपमुख्यमंत्री अजित पवारांना टोला हाणला. बीडमध्ये मारामारीच्या रोज घटना घडतात. तेथील आमदार व खासदारांनी आपले डोके ताळ्यावर आणण्याची गरज आहे. धनंजय मुंडे यांनी वाल्मीक कराडला मोठे केले. त्यामुळे तेथील पालकमंत्री अजित पवार यावर काही विशेष करतील असे वाटत नाही. कारण, त्यांच्या पुण्यामध्येही अशा घटनांत मोठी वाढ झाली आहे.

# मध्य रेल्वेच्या १२६ व्या झेडआरयूसीसी बैठकीचे यशस्वी आयोजन





■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**

मध्य रेल्वेची १२६ व्या झोनल रेल्वे वापरकर्ते सल्लागार समिती (झेडआरयूसीसी) बैठकीचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना यांच्या अध्यक्षतेखाली मध्य रेल्वे मुख्यालय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे नुकतेच आयोजन करण्यात आले. बैठकीला खासदार, ज्ञानेश्वर रावसाहेब पाटील, श्रीमती वर्षा गायकवाड आणि अनुप संजय धोत्रे यांच्यासह ४४ झेडआरयूसीसी सदस्य उपस्थित होते.

बैठकीला संबोधित करताना धर्मवीर मीना म्हणाले की, झेडआरयूसीसी सदस्यांच्या सूचनांचे स्थान महत्त्वाचे आहे आणि मध्य रेल्वेला प्रवाशांना चांगल्या सेवा प्रदान करण्यास मदत होते. सुरळीत रेल्वे वाहतूक आणि प्रवाशांच्या सोयीसाठी चोवीस तास अत्यंत समर्पणाने काम करणाऱ्या रेल्वे कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.

प्रवाशांच्या सुविधांवर लक्ष केंद्रित करताना मीना यांनी आधुनिक वेटिंग रूम, चांगले शौचालय, वाढलेले आसन, पिण्याच्या पाण्याचे बूथ, लिफ्ट, एस्केलेटर, मोबाईल चार्जिंग पॉइंट्स आणि डिजिटल डिस्प्ले बोर्ड यासारख्या वाढीव सुविधांवर प्रकाश टाकला.

मध्य रेल्वे दररोज ३८३ मेल/एक्सप्रेस आणि १४२ पॅसेंजर/मेमू/डेमू गाड्या चालवते, ज्या ५.५ लाख प्रवाशांना सेवा देतात. १० वंदे भारत गाड्या आणि एलटीटी ते सहरसा पर्यंत नव्याने सुरू झालेल्या अमृत भारत एक्सप्रेस सारख्या प्रीमियम सेवांमुळे प्रवासाचा अनुभव सुधारला आहे.

अमृत स्टेशन योजनेअंतर्गत, ९८ स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे, ज्यामध्ये २२ मे २०२५ रोजी माननीय पंतप्रधानांनी उद्घाटन केलेल्या १२ स्थानकांचा समावेश आहे. श्री मीना यांनी असेही नमूद केले की, मध्य रेल्वे मुंबई विभागात १,८१० आणि पुणे विभागात ४२ उपनगरीय सेवा चालवते, ज्यातून दररोज सुमारे ३८.२ लाख प्रवाशांना वाहतूक होते.

मुंबईची जीवनरेखा म्हणून उपनगरीय सेवांचे महत्त्व ओळखून, प्रवाशांच्या सोयी वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून, मुंबई विभागात वातानुकूलित सेवांची संख्या ८० पर्यंत वाढवण्यात आली आहे, ज्यामुळे प्रवाशांना प्रवासाचा अधिक सोयीस्कर पर्याय उपलब्ध झाला आहे.

सुरक्षा आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की उपनगरीय कोचमध्ये ५,२०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे आणि वंदे भारत, डीईएमयू आणि एलएचबी कोचमध्ये अतिरिक्त २,६९३ कॅमेरे बसवण्यात आले आहेत. १६१ ईएमयू रेक्सच्या महिला कोचमध्ये आपत्कालीन टॉक बॅक सिस्टम बसवण्यात आले आहेत. मध्य रेल्वेच्या आरपीएफने एका वर्षात ७३ जणांचे जीव वाचवले आणि १,४६३ हरवलेल्या मुलांना त्यांच्या कुटुंबियांशी पुन्हा जोडले. क्यूआर कोड-आधारित पेमेंट आणि डिजिटल दिव्यांगजन आयडी कार्डमुळे दिव्यांगजनांसह प्रवाशांसाठी तिकीट बुकिंग सोपे आणि सोयीस्कर झाले आहे.

नावीन्यपूर्णता आणि पायाभूत सुविधांमधील कामगिरी अधोरेखित करताना, मीना यांनी पुनरुच्चार केला की, मध्य रेल्वेच्या वॉटरप्रूफ पॉइंट मशीनने ट्रॅक फ्लडिंग दरम्यान त्याच्या कार्यक्षमतेसाठी सर्व झोनल रेल्वेमध्ये प्रथम पुरस्कार जिंकला. कोचमधील रिअल-टाइम वॉटर लेव्हल नोटिफायरने दुसरे पुरस्कार जिंकला, ज्यामुळे प्रवाशांचे समाधान झाले.

नवी दिल्ली येथे झालेल्या समारंभात मध्य रेल्वेला एकूण सहा प्रतिष्ठित विभागीय शिल्डने सन्मानित करण्यात आले आहे, जे ऑपरेशनल उत्कृष्टतेमध्ये एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. यापैकी, भारतीय रेल्वेच्या सर्व झोनमध्ये सर्वोत्तम एकूण कामगिरी प्रदर्शित केल्याबद्दल मध्य रेल्वेला सर्वात प्रतिष्ठित पंडित गोविंद वल्लभ पंत एकूण कार्यक्षमता शिल्ड प्रदान करण्यात आला, त्याव्यतिरिक्त पाच इतर विभागीय शिल्ड देण्यात आल्या.

यावेळी खासदारांनी त्यांच्या मतदारसंघांशी संबंधित विविध मुद्दे उपस्थित केले. रेल्वे अधिकाऱ्यांनी त्यांना समाधानकारक उत्तरे दिली. सदस्यांनी रेल्वे वापरकर्त्यांशी संबंधित विविध समस्यांवर चर्चा केली. अमृत भारत स्टेशन प्रकल्पाअंतर्गत सुरू असलेल्या कामांची माहिती घेतली, विविध स्थानकांवर प्रवाशांच्या सुविधा वाढवण्याची सूचना केली आणि थांबे आणि नवीन रेल्वे सेवांसाठी मागण्या मांडल्या. बैठकीत त्यांनी अनेक सूचना दिल्या.

मध्य रेल्वेने सूचना तपासल्या असून त्या अंमलात आणल्या जातील, असे आश्वासन महाव्यवस्थापकांनी सदस्यांना दिले.

# पालखीला फुलांच्या पायघड्या

## दुसऱ्या दिवशीही भाविकांची लोटली गर्दी

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ६ : विठ्ठलाच्या भेटीसाठी शेगाव येथून निघालेल्या संत गजानन महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे गुरुवारीही शहरात भक्तिपूर्ण वातावरणात स्वागत झाले. सकाळपासून रात्रीपर्यंत अखंडपणे हरिनामाचा गजर सुरू होता. श्रींच्या स्वागतासाठी राजराजेश्वर नगरीचे रस्ते फुलांच्या पायघड्या, आकर्षक रांगोळ्यांनी सजवण्यात आले होते. सकाळी मुंगीलाल बजोरीया मैदानावरून निघालेल्या वारकऱ्यांच्या मेळ्याने दिवसभर शहरात भ्रमण करून भक्तीपूर्ण भावात रात्री हरिहरपेठ जि. प. शाळेत विसावा घेतला.



शहरात चौकाचौकात अनेक संस्था, संघटना, व्यक्तींकडून पालखीचे पुष्प वर्षावात स्वागत झाले. भजन, संगीताचे सूर प्रत्येक विश्रांती स्थळांवर निनादत होते. स्वागताचे पोस्टर, बॅनर ठिकठिकाणी झळकले होते. मुंगीलाल बाजोरिया शाळेच्या पटांगणावरून सकाळी ६ वाजता पालखी मार्गस्थ झाली. उड्डाणपुलाखालून जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानासमोरून वन विभाग कार्यालय, खंडेलवाल भवन, जुने इन्कम टॅक्स चौकमार्गे आदर्श कॉलनीतून प्रवास करून शाळा क्रमांक १६ येथे सकाळी ८ वाजता पोहोचली. दुपारी विश्राम घेत मार्गक्रमण अकोला शहरात बुधवारी आणि गुरुवारी दोन्ही दिवस कमाल तापमान ३८ अंश सेल्सियसच्या पुढे होते. सकाळपासून ऊन प्रखर होते. यामुळे पालखीचे मार्गक्रमण होत असताना थोड्या-थोड्या अंतरावर जरा विश्राम घेण्यात येत होता. पिण्याच्या पाण्याची जिथे पुरेशी व्यवस्था असेल, तिथे पालखीचा वेग हळू करण्यात आला. ज्यामुळे वारकऱ्यांना आवश्यक असल्यास पाणी पिता यावे. पालखी मार्गावर फटाके फोडण्यात आले. खाद्यपदार्थांच्या वितरणामुळे काही ठिकाणी कचरा होत होता. यावेळी संस्था संघटनांकडून पालखीच्या मार्गावर कचरा उचलण्यात आला. नागरिकांनी कृतीतून स्वच्छतेचा संदेश दिला.

आज निघणार पुढील प्रवासाला विश्रांतीनंतर ११ वाजता संभाजीनगर, गजानन महाराज मंदिर, सिंधी कॅम्प, जिल्हा कारागृह, अशोक वाटिका, सरकारी बगीचा, सिटी कोतवाली चौक, लोखंडी पुल, जयहिंद चौक, राजराजेश्वर मंदिर होऊन हरिहर पेठमधील श्री शिवाजी विद्यालय जिल्हा परिषद टाऊन स्कूल येथे पालखी रात्री मुक्कामासाठी थांबली. शुक्रवार ६ जूनला वाडेगावमार्गे पालखी पुढील प्रवासाला निघेल. पुढे २९ दिवसांत ७१० किलोमीटरचा प्रवास करून हा सोहळा पंढरपूरात दाखल होईल.

# इंजिनीअरींग करणाऱ्या तरुणीचा संशयास्पद मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. ६ : गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत भाड्याने खोली करुन राहणाऱ्या एका २० वर्षीय इंजिनीअरींगच्या तरुणीचा बुधवारी ४ जूनला रात्री मृत्यू झाला. गळफास लावून तरुणीने आत्महत्या केली असावी, असा पोलिसांचा प्राथमिक निष्कर्ष पोलिसांचा होता. कारण तरुणीच्या खोलीतून पोलिसांनी चिठ्ठी जप्त केली. त्यामध्ये 'माझ्या प्रेमाला माफ करा, मृत्यूचे कारण वेगळे' असा उल्लेख आहे. मात्र गुरूवारी ५ जूनला तरुणीच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यावेळी तरुणीला मृत्यूनंतर फास लागल्याचे प्राथमिक शवविच्छेदन अहवालात पोलिसांना समजले आहे.

इंजिनीअरींग करणाऱ्या तरुणीच्या या संशयास्पद मृत्यूचा गुंता सोडवण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे झाले आहे. ग्रामिण भागात राहणारी एक २० वर्षीय तरुणी शहरातील एका खासगी अभियांत्रीकी महाविद्यालयात द्वितीय वर्षाला शिकत होती. बुधवारी रात्री नऊ वाजताच्या सुमारास मुलीच्या आकस्मिक मृत्यूची माहिती गाडगेनगर पोलिसांना मिळाली. त्यामुळे प्रभारी ठाणेदार दिनेश दहातोंडे यांच्यासह पथक तरुणीच्या खोलीवर गेले. त्यावेळी एका तरुणाच्या मांडीवर तरुणीचा मृतदेह होता व तो रडत होता. त्याने पोलिसांना सांगितले कि, ही तरुणी माझ्या परिचित होती. मी तीला वारंवार कॉल केले मात्र तीने उचलले नाही, म्हणून तिच्या खोलीवर आलो, बाहेरुन आवाज दिला मात्र तिने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे खिडकीतून डोकावून पाहीले तर तिने गळफास घेतला होता.

त्यानंतर दरवाजा तोडून खोलीत जावून तिला फासावरुन खाली उतरवले मात्र तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. त्यानंतर पोलिसांनी तरुणीच्या खोलीची झडती घेतली तर एक चिठ्ठीसुद्धा पोलिसांना सापडली. त्यामुळे ही आत्महत्या असावी, अशा प्राथमिक उर्वरित. पान ४ रात्री उशिरापर्यंत डीसीपी, एसीपी गाडगे नगर ठाण्यात प्राथमिक शवविच्छेदन अहवालानंतर या प्रकरणातील गुंता वाढला.

## NAGPUR MUNICIPAL CORPORATION

**Tender Notice**

Commissioner NMC invites e-tenders for the following works. These e-tender can be downloaded by the registered contractors from Govt. of Maharashtra portal (www.mahatenders.gov.in) The Terms and conditions of e-tenders are available on e-tender portal (www.mahatenders.gov.in). The sale and purchase of e-tender can be done through internet.

| Tender No. | Name of Work | BOQ Cost (Rs) | EMD (Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | Const. of C.C. Pavement Road at Chandrakiran Nagar in front of H/o Shri Murhokar Near Hanuman Mandir in Pr No. 29 | 1649002 | 16500 |
| 2 | Const. of C.C. Pavement Road at Siddharth Nagar in front of Shri Ramteke & Somkuwar in Pr No. 34 | 1651362 | 16600 |
| 3 | Const. of C.C. Pavement road at Siddharth Nagar in front of Shri Chandekar in Pr No. 34 & Const. of C.C. Pavement road at Mhalgi Nagar in front of Buddha vihar in Pr No. 29 | 1651452 | 16600 |
| 4 | Const. of C.C. Road at bhante Anand kaushalya Nagar slum from H/o Jambhulkar to H/o Shambharkar & Madarsa to Muslim Kabristan in Pr No. 02 | 1950153 | 19600 |
| 5 | Const. of C.C. Road at Shende Nagar Slum in Pr No. 02 | 1960662 | 19700 |
| 6 | Const. of Compound wall at Near Prem Seva Hostel Mouza Gorewada Vasti in Pr No.11 | 609095 | 6100 |
| 7 | Pro. & Fixing I-Block at Near beside road H/o Shri Aatish Sewate Pandhrabodi in Pr No. 13 | 1697555 | 17000 |
| 8 | Pro. & Laying Sewer line at Futala in Pr No. 13 | 1278682 | 13000 |
| 9 | Const. of C.C. Pavement at Sanjay Nagar Singal Line Pandhrabodi in Pr No. 13 | 1703439 | 18000 |
| 10 | Pro. & Fixing I-Block at beside road Gaddigodam in Pr No. 09 | 1520901 | 15500 |
| 11 | Const. of C.C. Pavement at Futala Vasti in Pr No. 13 | 1703349 | 17200 |

**NOTE** - **1)** Tender sale & submission start date : 09/06/2025. **2)** Tender submission and date/sales end date 16/06/2025. up to 5.00 pm. **3)** Date of opening of (if possible) 17/06/2025 up to 5.00 pm. **4)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in uploaded tender document.

**Executive Engineer (DPDC)**
**NMC, Nagpur**

**Advt No. 168 PR Date 06.06.2025**

P/N/25/25

# एलसीबीचे ३ ठिकाणी छापे
## सहा आरोपींवर गुन्हे दाखल

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ६ : पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी राबवलेल्या ऑपरेशन प्रहार अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाया सुरु केल्या आहेत. गुरुवारी एलसीबीने बाळापूर, डाबकी रोड, दहिहांडा परिसरात अवैध धंद्यावर छापे टाकले. त्यात सहा आरोपींना पोलिसांनी अटक केली. ही कारवाई सुरुच राहणार असल्याचे पोलिस निरीक्षक शंकर शेळके यांनी सांगितले. पोलिस अधीक्षकांच्या निर्देशाप्रमाणे, जिल्ह्यात अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबवण्यात येत आहे. पोलिस अधीक्षकांनी सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी व सर्व पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, अंमलदार तसेच एलसीबीला दिलेल्या सूचनेनुसार, पोलिसांनी सामूहिकपणे अवैध धंद्याविरुद्ध छापासत्र सुरू केले आहे. ५ जून रोजी एलसीबीच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून बाळापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दधम फाटा येथे छापा टाकला. यावेळी दारूची वाहतूक करणारा आरोपी राजू उर्फ विजय लक्ष्मण इंगळे रा. व्याळा याला पकडले. त्याच्याकडून पोलिसांनी २२० देशी दारूचे कॉर्टर




जप्त केले. दुसरी कारवाई पोलिसांनी डाबकी रोड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जुल्फकार नगर खैर मोहम्मद प्लॉट येथे केली. तेथून जुगार खेळणाऱ्या शेख नजीर शेख जमीर, मंगेश दिगंबर अहीर व शेख साजिद शेख सादिक यांच्या जवळून पोलिसांनी रोख रक्कम जप्त करुन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तिसरी कारवाई पोलिसांनी दहिहांडा हद्दीतील चोहोट्टा बाजार येथे केली. तेथून पोलिसांनी भरत लक्ष्मणराव दामोदर रा. टाकळी, व नदीम शहा रशीद शहा रा. चोहोट्टा बाजार यांना पकडले. त्याच्याजवळून पोलिसांनी रोख रक्कम जप्त केली. तिन्ही कारवायांमध्ये पोलिसांनी ९५ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन सहा आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले. ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, एलसीबीचे पोलिस निरीक्षक शंकर शेळके यांचे मार्गदर्शनाखाली महेंद्र मलिये, अविनाश वसिमोद्दीन, इजाज अहमद, अशोक सोनवणे, भास्कर, अन्सार, खुशाल नेमाडे, आकाश मानकर, धीरज वानखडे, मो. आमीर यांनी केली.

# कृषी केंद्रामध्ये बीबियाणे व खतांचा मुबलक पुरवठा

■ महासागर प्रतिनिधी,
आर्णी , दि. ६ : तालुक्यातील कृषी केंद्रात बी-बियाणे व खतांचा पुरवठा झाला असून, शेतकऱ्यांना बी-बियाणेव खतांची टंचाई भासणार नसल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी आनंद बदखल यांनी दिली आहे. आगामी खरीप हंगामाच्या लागवडीसाठी आर्णी तालुक्यातील शेतकरी सज्ज झाला असून सध्या बी-बियाण्यांच्या खरेदीची तयारी करत आहे. मागील काही वर्षांपासून आर्णी तालुक्यातील काही कृषी केंद्रांकडून खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करून त्यानंतर त्या खतांची ज्यादा दराने विक्री करून शेतकऱ्यांची लूट होत असल्याचा ओरड शेतकऱ्यांमध्ये आहे. मात्र याविरोधात तक्रार केल्यास आपल्याला खत मिळणार नाही या भीतीने शेतकरी सुद्धा याविरोधात आवाज उठवत नाहीत. त्यामुळे कृषी केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांची लूट केली जाते. दरम्यान, यावर्षी आर्णी तालुका कृषी विभाग शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी सज्ज झाला आहे. विविध मार्गाने शेतकऱ्यांमध्ये



जनजागृती करून कुठेही असा गैरप्रकार आढळल्यास शेतकऱ्यांनी तात्काळ तालुका कृषी अधिकारी किंवा पंचायत समिती कृषी अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी आनंद बदखल यांनी केले आहे. आर्णी तालुक्यात संपूर्ण हंगामासाठी १४,७०० मेट्रिक टन खताची आवश्यकता असून मे महिन्याच्या अखेरपर्यंत ५,३६८ मेट्रिक टन खताचा पुरवठा आर्णी तालुक्यातील कृषी केंद्रांमध्ये झाला आहे. यामध्ये एक हजार मेट्रिक टन युरियाचा समावेश असून उर्वरित खतांचा पुरवठा खताची रँक लागण्यानुसार होणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

महाराष्ट्र शासन

# नगर विकास विभाग

**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२.**

दिनांक - ०२.०६.२०२५,

**सूचना**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६

क्रमांक: टिपीएस-२४२३/१५२०/प्र.क्र.३१/२०१५/नवि-९: ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापूढे उक्त अधिनियम असं संबोधिले आहे) चे कलम ३१(१) अन्यये, सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांच्या विकास योजना शासनाने मंजूर केल्या असून त्या अमलात आलेल्या आहंत (यापुढं एकत्रितपणे उक्त विकास योजना' असे संबोधले आहे) :

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, नागपुर महानगर प्रदेश, कामठी नगरपरिषद व हिंगणा नगरपंचायत यांच्या क्षेत्रातील. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प फेज-२ ला (यापुढे उक्त मेट्रो प्रकल्प फेज-२ असे संबोधले आहे) केंद्र शासनाने पत्र क्र. के - १४०१/०६/२०१९-एमआरटीएस-२. दि.२९.१२.२०२२ नुसार मान्यता दिलेली असून राज्य शासनाने निर्णय क्र. एनएमआर-३३१८/प्र.क्र.१४५ /नवि-७. दि.१२.०५.२०२३ नुसार मान्यता दिलेली आहे:

आणि ज्याअर्थी, महाव्यवस्थापक (नगर नियोजन), महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, नागपुर यांनी दि.०७.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, उक्त विकास योजनांमध्ये ठक्त मेट्रो रेल प्रकल्प फेज-२ अंतर्गत संरेखन दर्शविण्यासाठी शासनास विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्यानुसार, उक्त मेट्रोचे सरेखनाखालील जागेपैकी (यापुढे उक्त जमिनी असे संबोधले आहे) काही जमिनी, सोवतच्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्यानुसार, रहिवास विभाग / वाणिज्य विभागात समाविष्ट आहेत तर काही जमिनी विद्यमान रस्ते (राष्ट्रीय महामार्ग) यांनी बाधित होत आहेत:

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्यानुसार, उक्त जमिनीत उक्त मेट्रो रेल प्रकल्प फेज-२ चे संरेखन (मार्गिका, स्थानके, मेट्रो रेल कॉरिडॉर, वाहनतळ, वाणिज्य विभाग यासह) दर्शविणे (यापुढे उक्त प्रस्तावित फेरबदल असे संबोधले आहे) व्यापक जनहिताच्या दृष्टीने आवश्यक झाले आहे, असे राज्य शासनाचे मत झाले आहे:

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१कक) मधील तसेच या अनुषंगिक शासनास असलेल्या शक्तींचा वापर करुन शासन, उक्त प्रस्तावित फेरबदलांबाबत, प्रस्तुत सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत जनतेकडुन सूचना / हरकती मार्गावण्यात येत आहेत. या अनुषंगाने, विभागीय सह संचालक नगर नागपूर विभाग, नागपूर यांची, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१कक) अन्यये उक्त प्रस्तावित फेरबदलांबायत विहीत मुदतीत प्राप्त हरकती, सूचनांबाबत सुनावणी देणेसाठी व त्याबाबतचा अहवाल शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेसाठी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

०२. विभागीय सह संचालक, नगर रचना, नागपूर विभाग, पहिला मजला, जूने सचिवालय, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१ यांचेकडे, सदर सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या विहीत कालमर्यादेत, उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत प्राप्त होणाऱ्या हरकती /सूचना स्विकारुन विचारात घेण्यात येतील.

०३. सदर सूचना त्यासोबतच्या परिशिष्ट-अ, परिशिष्ट-ब आणि उक्त प्रस्तावित फेरबदल दर्शविणाऱ्या विकास योजना भाग नकाशासह जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत व दिवशी उपलब्ध करणेत येत आहे.

१. विभागीय सह संचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.
२. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
३. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
४. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर.
५. व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, नागपूर,
६. सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर.
७. मुख्याधिकारी, कामठी नगरपरिषद, कामठी, जि. नागपूर.
८. मुख्याधिकारी, हिंगणा नगरपंचायत, हिंगणा, जि. नागपूर.

सदरची सूचना महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in (कायदे व नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,

स्वा/-
(धैर्यशील ह. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

### परिशिष्ट - अ
(शासन सूचना क्र.टिपीएस-२४२३/१५२०/प्र.क्र.३१/२०२५/नवि-९, दि. ०२.०६.२०२५ चे सहपत्र)

| अ. क्र. | विभाग / जिल्हा | विकास योजना | विकास योजना मान्यतेच्या अधिसूचनेचा क्रमांक व दिनांक | विकास योजना अमलात आल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | नागपूर विभाग /नागपूर | विकास योजना नागपूर (भागशः) | क्र. टिपीएस-२४९६/२६४३/प्र.प्रा. ३०० (अ)/ नवि-५. दि.०७,०१,२००० | दि.०१.०३,२००० |
| | | पुनर्प्रसिद्ध विकास योजना - नागपूर | क्र. टिपीएस-२४००/१६२८/प्र.क्र.२००/२००० /नवि-९, दि.१०.०९.२००१ | दि.२१.०९.२००१ |
| २ | | विकास योजना नागपुर महानगर प्रदेश (भागशः) | क्र. टिपीएस-२४१६/प्र.क्र.१२२ (अ)/एमएस/ २०१६/नवि-९, दि.०५.०१.२०१८ | दि.२१.०९.२००१ |
| | | पुनप्रसिद्ध विकास योजना नागपूर महानगर प्रदेश | क्र. टिपीएस-२४१६/प्र.क्र.१२२ (य)/ईपी/ २०१६/नवि-९, दि.०५.१२.२०१९ | दि.२१.०२.२०१९ |
| ३ | | विकास योजना - हिंगणा (भागशः) | क्र. टिपीएस-२४२३/२५३९/प्र.क्र.४८/वि.यो. मंजूरी (भागशः) / २०२४/नवि-९. दि.०९.१०.२०२४ | दि.०९.१०.२०२४ |
| ४ | | विकास याजना कामठी (भागशः) | क्र. टीपाएस-२४१९/१७५/प्र.क्र.१७६ (अ)/ २०१९/नवि-९, दि.१६.०९.२०२९ | दि.२८.१०.२०१९ |
| | | पुनर्प्रसिद्ध विकास योजना - कामठी | क्र. टिपीएस-२४१९/१७५/प्र.क्र. १७६/इपी मंजुरी/२०१९/नवि-९, दि.१०.१०.२०२३ | दि.२३.१२.२०२३ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने

(धैर्यशील ह. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

### परिशिष्ट - ब
(शासन सूचना क्र.टिपीएस-२४२३/१५२०/प्र.क्र.३१/२०२५/नवि-९, दि. ०२.०६.२०२५ चे सहपत्र)

| अ.क्र | नियोजन प्राधिकरण | मेट्रो रेल प्रकल्प फेज-२, कॉरिडॉर व स्टेशन | मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव |
|---|---|---|---|
| १ | नागपूर महानगरपालिका | ऑटोमोटोव्ह स्क्वेअर ते कन्हान नदी (कॉरिडॉर २ अ) | विद्यमान रस्ता (राष्ट्रीय महामार्ग) |
| २ | | प्रजापतीनगर ने ट्रान्सपोर्ट (कॉरिडॉर ४ अ) - २.४३ कि.मी. | विद्यमान रस्ता (राष्ट्रीय महामार्ग) |
| ३ | नागपूर सुधार प्रन्यास | ऑटोमोटीव्ह स्क्वेअर से कन्हान नदी (कॉरिडॉर २ अ) | रहिवास विभाग, औद्योगिक विभाग, विद्यमान रस्ता (राष्ट्रीय महामार्ग) |
| ४ | | प्रजापतीनगर ते ट्रान्सपोर्ट (कॉरिडॉर ४ अ) - २.४३ कि.मी. | विद्यमान रस्ता (राष्ट्रीय महामार्ग) |
| ५ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | मिहान ते एमआयडीसी इएसआर (कॉरिडॉर १ अ) - २२.६० कि.मी. | रहिवास विभाग, वाणिज्य विभाग, विद्यमान रस्ता (राष्ट्रीय महामार्ग) |
| ६ | | ऑटोमोटीव्ह स्क्वेअर ते कन्हान नदी (कॉरिडॉर २ अ) - १.६८ कि.मी. | रहिवास विभाग, वाणिज्य विभाग, ओद्योगिक विभाग, सार्वजनिक / निमसार्वजनिक विभाग, विद्यमान रस्ता (राष्ट्रीय महामार्ग) |
| ७ | | लोकमान्यनगर ते हिंगणा (कॉरिडॉर ३ अ)- १.३३ कि.मी. | वाणिज्य विभाग. सार्वर्जानक / निमसार्वजनिक विभाग, विद्यमान रस्ता (राज्य महामार्ग) |
| ८ | | प्रजापतीनगर ते ट्रान्सपोर्ट (कॉरिडॉर ४ अ) - ३.०७ कि.मी. | वाणिज्य विभाग व ओद्योगिक विभाग. विद्यमान रस्ता (राष्ट्रीय महामार्ग) |
| ९ | नागपूर प्रादेशिक योजना (नगर पंचायत वानाडोंगरी) | लोकमान्यनगर ते हिंगणा (कॉरिडॉर ३ अ) - ३.५४ कि.मी. | रहिवास विभाग, विद्यमान रस्ना (राज्य महानार्ग) |
| १० | कामठी नगरपरिषद | ऑटोमोटीव्ह स्क्वेअर ते कन्हान नदी (कॉरिडॉर २ अ) - २.९६ कि.मी. | रहिवास विभाग, वाणिज्य विभाग, सार्वजनिक / निमसार्वजनिक विभाग विद्यमान रस्ता (राष्ट्रीय महामार्ग) |
| ११ | हिंगणा नगरपंचायत | लोकमान्यनगर ते हिंगणा (कॉरिडॉर ३ अ) | रहिवास विभाग, सार्वजनिक / निमसार्वज-निक विभाग विद्यमान रस्ता (राज्य महामार्ग) |
| १२ | महाराष्ट्र मेट्रो रेल कापोरेशन लि. | मिहान ते एमआयडीसी इएसआर (कॉरिडॉर १ अ) -१.९५ कि.मी. | **(Mixed Use Zone ) MUZ (As per MIHAN Development Plan)** |
| १३ | महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ | लोकमान्यनगर ते हिंगणा (कॉरिडॉर ३अ) | औद्योगिक विभाग, विद्यमान रस्ता (राज्य महामार्ग) |
| १४ | | मिहान ते एमआयडीसी एस आर (कॉरिडॉर १अ) | वाणिज्य विभाग, ओद्योगिक विभाग, अंतर्गत विद्यमान रस्ता |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने

(धैर्यशील ह. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

क्र. संमावज / नाग / १६७ / २०२५

# युतीचा चेंडू शिवसेनेच्या कोर्टात!

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चा सुरू आहेत. ठाकरे गटाचे नेते संजय राऊत हे सुद्धा मनसे आणि शिवसेनेच्या युतीवर रोज बोलत आहेत. त्यामुळे राज्यात या युतीची जोरदार चर्चा सुरू असतानाच मनसे नेत्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन युतीबाबतची भूमिका स्पष्ट करतानाच ठाकरे गटासमोर सर्वात मोठी अट ठरली आहे. आम्हाला दोनवेळेचा अनुभव आहे. त्यामुळे आम्ही ताकही फुंकून पित आहोत. ठाकरे गटाला आमच्यासोबत युती करायची असेल तर आमच्याकडे रितसर प्रस्ताव द्या किंवा उद्धव ठाकरेंनी राज ठाकरे यांना फोन करावा. त्यानंतर राज ठाकरे काय तो निर्णय घेतील, अशी अटच मनसेने ठेवली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे हे आता राज ठाकरेंना फोन करणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

---

मनसे नेते संदीप देशपांडे आणि अविनाश जाधव यांनी आज पत्रकार परिषद घेऊन थेट शिवसेनेच्याच कोर्टात युतीचा चेंडू टोलवला आहे. युतीचा निर्णय राज ठाकरे घेत असतात. ठाकरे गटासोबत जाण्याबाबत कोणतीही चर्चा पक्षांतर्गत झाली नाही. आमचं तोंड दुधाने पोळलं गेलं आहे, त्यामुळे आम्ही ताकही फुंकून पितोय.

जोपर्यंत राज ठाकरेंकडे ठोस प्रस्ताव येत नाही तोपर्यंत निर्णयापर्यंत आम्ही पोहोचू शकत नाही. प्रस्ताव आल्यावर राज ठाकरे योग्य निर्णय घेतील. अमित ठाकरे यांनीही काल तेच सांगितलं. म्हणून आम्ही आज पत्रकार परिषद घेतली आहे, असं संदीप देशपांडे म्हणाले.

२०१४ आणि २०१७ च्या घटनांचा मी साक्षीदार आहे. जेव्हा युती करावी अशी आमची भावना होती, तेव्हा बाळा नांदगावकर मातोश्रीवर गेले होते. उद्धव ठाकरेंनी त्यांना भेट दिली नाही.

सुभाष देसाई त्यांना भेटले. युती करावी असा राज ठाकरे यांचा निरोप आहे, असा निरोप घेऊन बाळा नांदगावकर मातोश्रीत गेले होते. याला म्हणतात प्रस्ताव. तसा कोणताही प्रस्ताव आता ठाकरे गटाकडून आमच्याकडे आला नाही. जोपर्यंत प्रस्ताव येत नाही, तोपर्यंत राज ठाकरे कसा निर्णय घेऊ शकतात? असा सवाल संदीप देशपांडे यांनी केला.

**महापालिकेची तयारी सुरू**

पूर्वी ही युती करण्यासाठी शिवसेनेवाले पडद्यामागे सकारात्मक



होते. पण त्यांनी एक पाऊल पुढे टाकलं नाही. उद्धव ठाकरेंचा आधी फोन येऊ द्या, निर्णय घेण्याचा अधिकार राज ठाकरेंचा आहे ना?, असं सांगतानाच आमची महापालिकेची तयारी सुरू आहे. जेव्हा प्रस्ताव येईल तेव्हा राज ठाकरे निर्णय घेतील, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**ठिक आहे, परिवर्तन होत आहे**

संजय राऊत हे राज ठाकरे यांच्या घराला कॅफे म्हणून हिणवायचे. मात्र, आज राऊत यांनी आमच्यासाठी राज ठाकरे यांचं घर हे दुसरं घर आहे, असं विधान केलं. त्यावरून संदीप देशपांडे यांनी राऊत यांना टोले लगावले.

पुस्तक लिहिल्यानंतर राऊत यांच्या विचारात परिवर्तन झालं असेल तर स्वागत करतो. परिवर्तनही संसार का नियम आहे, असं गीता सांगते. त्यांनी गीता वाचली असेल तर स्वागत आहे. कॅफे हे राऊतच म्हणाले होते. घरही तेच म्हणत आहेत. परिवर्तन होत आहे, असा चिमटा देशपांडे यांनी काढला.

दरम्यान, अविनाश जाधव यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. दोन्ही भावांकडे एकमेकांचा नंबर आहे. हेच काल अमित ठाकरे यांनी सांगितलं. अख्ख्या शिवसेनेला मनसे सोबत युती हवी असेल तर उद्धव ठाकरेंकडे राज ठाकरेंचा नंबर आहे.

मराठी माणूस आणि महाराष्ट्राच्या हिताच्या गोष्टी घडणार असेल तर उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरेंना एक कॉल करावा. कॅमेऱ्यासमोर जे नेते बोलत आहेत. त्यांनी उद्धव ठाकरेंना सांगावं की राज ठाकरेंशी बोला. मी खात्रीने सांगतो, तुम्ही एक पाऊल पुढे या साहेब १०० पावलं पुढे येतील. २०१४ आणि २०१७ चा आम्हाला वेगळा अनुभव आहे. कॅमेऱ्यासमोर काय युती होते का?, असा सवाल अविनाश जाधव यांनी केला.

मुळात एक प्रश्न उभा राहतो तो हा की, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना मनापासून एकमेकांशी युती करायची आहे का? राज ठाकरे यांच्या मनसेचा मुंबई महानगरपालिका, राज्यातील अन्य स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विधानसभेत प्रभाव किती? याचा विचार केल्यास गेल्या काही वर्षात मनसेला गळतीच लागल्याचे दिसते.

या दोन्ही पक्षांमध्ये युती झाली तर दुसऱ्या फळीतील नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांची गोची होईल . तिकीट वाटपात अनेकांचे पत्ते कट होतील . अन्य राजकीय पक्षांना त्यांचे एकत्र येणे धोकादायक ठरू शकते . त्यामुळे येत्या काळात उबाठा शिवसेना आणि मनसे यांची युती होईलच, असे ठामपणे सांगता येत नाही . आता मनसेने चेंडू शिवसेनेच्या कोर्टात टोलवला आहे . बघुया काय होते ते?

■ ■ ■

## त्याग आणि बलीदानाचा सण
# ईद अल-अजहा

ईद-उल-अजहा किंवा बलिदानाची ईद हा एक मुस्लिम सण आहे. हा सण जगभर साजरा केला जातो. या दिवशी कुराणमधील बळीची घटना साजरी केली जाते. याच दिवशी अल्लाच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी पैगंबर इब्राहिमांनी आपला मुलगा इस्माईलचा बळी देण्याच्या इच्छेचा सन्मान केला.

इब्राहिम आपल्या मुलाचे बलिदान देत होते, तथापि, अल्लाहने त्यांना एक कोकरू प्रदान केले जो त्यांनी त्यांच्या मुलाच्या जागी बळी द्यायचे होता कारण त्यांनी अल्लाहच्या नावाने स्वतःच्या मुलाचे बलिदान देण्याची इच्छा दर्शविली होती. या हस्तक्षेपाच्या स्मरणार्थ प्राण्यांचा विधीपूर्वक बळी दिला जातो.

त्यांच्या मांसाचा काही भाग प्राणी अर्पण करणारे कुटुंब वापरतात, तर उर्वरित मांस गरीब आणि गरजूंना वाटले जाते. मिठाई आणि भेटवस्तू दिल्या जातात, लहान मुलांना भेटवस्तू किवा पैसे दिले जातात आणि विस्तारित कुटुंबातील सदस्यांना भेट दिली जाते आणि त्यांचे स्वागत केले जाते. या दिवसाला कधीकधी महान ईद देखील म्हटले जाते. हा सण कुबार्नीचा सण किंवा पवित्र हज यात्रेचा सण म्हणूनही ओळखला जातो.

बलिदानाचा सण हिजरीच्या शेवटच्या महिन्यात, झु-अल-हज मध्ये साजरा केला जातो. जगभरातील मुस्लिम या महिन्यात सौदी अरेबियातील मक्का येथे एकत्र येऊन हज साजरा करतात.

या दिवशी ईद-उल-अजहाही साजरी केली जाते. खरे तर हा हजचा एक भाग आणि मुस्लिमांच्या भावनांचा दिवस आहे. जगभरातील मुस्लिमांचा एक गट मक्का येथे हज करतो, जो उर्वरित मुस्लिमांसाठी आंतरराष्ट्रीय भावनांचा दिवस बनतो. ईद-उल-अजहा चा शाब्दिक अर्थ त्यागाची ईद आहे, या दिवशी एखाद्या प्राण्याचा बळी देणे हा एक प्रकारचा प्रतीकात्मक बलिदान आहे.

हज आणि त्याच्याशी संबंधित विधी हजरत इब्राहिम आणि त्यांच्या कुटुंबाने केलेल्या कायार्ची प्रतिकात्मक पुनरावृत्ती आहे. हजरत इब्राहिम यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी हाजरा आणि मुलगा इस्माईल यांचा समावेश होता.

असे मानले जाते की हजरत इब्राहिमला एक स्वप्न पडले होते ज्यात ते आपला मुलगा इस्माईलचा बळी देत होते, हजरत इब्राहिम आपल्या दहा वर्षाच्या मुलगा इस्माईलला देवाच्या मार्गावर बलिदान देण्यासाठी निघाले. देवाने त्याच्या देवदूतांना पाठवून इस्माईल ऐवजी एका प्राण्याचा बळी देण्यास सांगितले, असा उल्लेख पुस्तकांमध्ये आहे.

वास्तविक इब्राहिमकडून मागितलेला खरा त्याग हा त्याचाच होता, तो म्हणजे स्वतःला विसरून जा, म्हणजे आपले सुख-सुविधा विसरून स्वतःला मानवतेच्या सेवेत पूर्णपणे झोकून द्या. मग त्यांनी आपला मुलगा इस्माईल आणि आई हाजरा यांना मक्केत स्थायिक करण्याचा निर्णय घेतला. ण मक्का त्याकाळी वाळवंट होता, त्यांना मक्केत स्थायिक केल्यानंतर ते स्वतः मानवसेवेसाठी बाहेर पडले. अशाप्रकारे वाळवंटात स्थायिक होणे हा त्याचा आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा त्याग होता.

इस्माईल मोठा झाल्यावर एक काफिला तिथून निघून गेला आणि इस्माईलचा त्या काफिल्यातील एका तरुणीशी विवाह झाला, त्यानंतर वंश सुरू झाला. ज्यांना इतिहासात इस्माईल किंवा वानू इस्माईल म्हणून ओळखले जाते.

हजरत मुहम्मद साहेब यांचा जन्म याच घराण्यात झाला. ईद-उल-अजहाचे दोन संदेश आहेतः पहिला, कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याने स्वार्थाच्या पलीकडे जाऊन मानवी उन्नतीसाठी स्वतःला गुंतवून घेतले पाहिजे. ईद-उल-अधा एका लहान कुटुंबात कसा नवीन अध्याय लिहिला गेला याची आठवण करून देतो. या दिवशी मशिदींमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम एकत्र येतात. लाखो मुस्लिम पांढरे कुर्ता घालून ईदगाह किंवा मोठ्या मशिदीत ईदची नमाज अदा करतानाचे दृश्य खूप आनंददायी असते. नमाज अदा केल्यानंतर उंट, बकरी, खेचर, मेंढ्या इत्यादी चार पायांच्या प्राण्यांची कुर्बानी दिली जाते.

या दिवशी मुस्लिम त्यांचे नवीन किंवा आवडते कपडे घालतात. महिला शॉर्टब्रेड कुकीजसह विशेष पदार्थ बनवतात. त्या कुटुंब आणि मित्रांसोबत एकत्र येतात. या दिवशी ईदची नमाज एकत्रितपणे अदा केली जाते. नमाज जमवण्यात महिलांचा सहभाग समुदायानुसार वेगवेगळा असतो.

यात दोन भाग असतात, पहिल्या भागामध्ये सात तकबीर तर दुसऱ्या भागामध्ये पाच तकबीर असतात. शिया मुस्लिमांसाठी, सलात अल-ईद पाच दैनंदिन प्रार्थनेपेक्षा वेगळी असते कारण दोन्ही ईदच्या नमाजांसाठी इश्ना किंवा इकामा स्पष्टपणे केला जात नाही.

नमाजानंतर इमाम उपदेश देतात. नमाज आणि उपदेशांच्या शेवटी, मुस्लिम एकमेकांना मिठी मारुन ह्यईद मुबारकह्न म्हणत शुभेच्छा देत भेटवस्तूंची देवाणघेवाण करतात. अनेक मुस्लिम याप्रसंगी त्यांच्या गैरमुस्लिम मित्रांना, शेजारी, सहकारी आणि वर्गमित्रांना त्यांच्या ईद उत्सवात आमंत्रित करतात जेणेकरून त्यांना इस्लाम आणि मुस्लिम संस्कृतीची चांगली ओळख करून दिली जाते.

इस्लामिक मान्यतेनुसार, बकरी ईदची नमाज ही दोन रकातची नमाज आहे, जी अजान आणि इकमतशिवाय जमावाने अदा केली जाते. या नमाजात अधिक तकबीर आहेत, सहसा पहिल्या रकातमध्ये ६ आणि दुसऱ्या रकातमध्ये ५, जरी वेगवेगळ्या इस्लामिक पंथांमध्ये ही संख्या थोडी वेगळी असू शकते.

नमाजानंतर इमाम प्रवचन देतो, जे ऐकणे सुन्नत मानले जाते. मुस्लिमांना या दिवशी चांगले कपडे घालण्याचा, सुगंधी अत्तर लावण्याचा आणि मोकळ्या मैदानात किंवा मोठ्या मेळाव्यात नमाज अदा करण्याचा सल्ला दिला जातो. ईद-उल-अजहा दरम्यान लोकांना मांस वाटणे, ईदच्या पहिल्या दिवशी ईदच्या नमाजपूर्वी आणि ईदच्या तीन दिवसांत नमाजानंतर तकबीर म्हणणे हे या महत्त्वाच्या इस्लामिक सणाचे आवश्यक भाग मानले जातात.

ईदगाह किंवा मशीद नावाच्या खुल्या वक्फ मैदानावर मोठ्या मेळाव्यात ईदची नमाज अदा करण्यासाठी पुरुष, महिला आणि मुले यांनी त्यांचे उत्तम कपडे परिधान करावेत अशी अपेक्षा असते. ज्यांना परवडणारे श्रीमंत मुस्लिम त्यांचे सर्वोत्तम हलाल पाळीव प्राणी, सहसा गाय, कुर्बानी देऊ शकतात, परंतु प्रदेशानुसार उंट, बकरी किंवा मेंढी, इब्राहीमच्या एकुलत्या एका मुलाची बलिदान देण्याच्या इच्छेचे प्रतीक म्हणून.

बलिदान दिले जाणारे प्राणी ज्याला अधिया म्हणतात, ज्याला पर्शियन-अरबी शब्द कुबार्नी देखील म्हणतात, विशिष्ट वय आणि गुणवत्तेचे मानक पूर्ण करावे लागतात अन्यथा तो प्राणी अस्वीकार्य बलिदान मानला जातो.

एकट्या पाकिस्तानमध्ये २.० अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे अंदाजे दहा दशलक्ष प्राणी ईदच्या दिवशी बलिदान दिले जातात. बलिदान दिलेल्या प्राण्याचे मांस तीन भागांमध्ये विभागणे पसंत केले जाते. एक तृतीयांश कुटुंबात अबाधित राहते आणि एक तृतीयांश नातेवाईक, मित्र आणि शेजाऱ्यांना दिले जाते आणि उर्वरित एक तृतीयांश गरीब आणि गरजूंना दिले जाते. आज या प्रसंगी सर्व मुस्लिम बंधू आणि भगिनींना ईद-उल- अजहाच्या हार्दिक शुभेच्छा!



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

■ ■ ■

# हुंडा.. अवास्तव अपेक्षा!

लग्न म्हंटल की दोन परिवाराचे ऋणानुबंध जे पती पत्नीच्या नात्याला मान्यता देते ... ही पवित्र बंधने निर्माण होतांना किंवा जोडली जाताना काही अघोषीत अपेक्षा ह्या वधू वर पक्ष्यांच्या असतातच... तोही एक प्रकारची हुंडा मागण्याची सोय काही मध्यस्थी नातेवाईक यांच्या माध्यमातून होतेच की...

मुलांच्या मुलीकडे अपेक्षा जसे सुंदर देखणी, घरंदाज, नोकरीवाली, किंवा खाजगी जॉब असणारी , किंवा घरदार सांभाळणारी अशा प्रकारच्या अनेक मागण्या किंवा अपेक्षा असतातच .... तशाच मुलींच्याही अपेक्षा असतात. मग मुलगा सरकारी नोकरी वाला असावा, तो वेल सेटल असला पाहिजे, स्वतःच घर दार, गाडी, घोडी, शेती असली की आपली मुलगी अगदी सुखात .. खाजगी नोकरी असेल तर पॅकेज मोठे व पुन्हा स्वतःचं घर दार आलेच, मुलगा पुण्यात सारख्या मेट्रो सिटी मध्ये सेट असावा, सुंदर गोरापान असला पाहिजे यासारख्या अनेक वास्तव अवास्तव अपेक्षा आज समाजात फार वाढल्या आहेत.

शिवाय दोघेही सेट होण्याचे ठिकाणही जोडले जाऊन लग्न जोडणारी मंडळी जशी खरेदी विक्री सारखी गोळा बेरीज करण्यात मग्न होतात त्याच बरोबर लग्न मोठं दिमाखदार , भव्य दिव्य करावं जेणेकरून सर्वत्र उदो उदो व्हावा... त्यात भर म्हणे अहेर पद्धती बंद... (पैशाचे पाकिटे चालतील!) ते घेण्यासाठी यादी घेऊन बसणारी मंडळी असतात. असो तेही मान्य. मात्र पैशांची उधळपट्टी, अवास्तव खर्च मग प्री वेडींग फोटो शूट, पासून तर अगदी लग्न संपन्न होईपर्यंत वेगवेगळ्या इव्हेंट प्रमाणे दिखाऊपणा असणारी पुष्कळ लग्न आज प्रत्येक समाजात पोकळी निर्माण करीत आहेत.

खर्च करण्यावर काही मर्यादा नाही. इतका खर्च करूनही नवविवाहित दाम्पत्य काही सुखात नांदत नाही, ताण तणाव, मारहाण, आत्महत्या व दोन्ही परिवाराची राखरांगोळी होऊन जो समाज आपल्या कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन मौज मजा करतो तेव्हा मात्र तो भांडण तंटा न सोडवता सहानुभूती न देता आपली उलट बदनामी करून मजा पाहतो.



उमेश ज्ञानेश्वर ईखे
कृष्णा विहार, नागपूर.
9518571138

आजकाल समाज नातेवाईक, हे काय म्हणतील? दिखाऊ प्रतिष्ठा व सोसिअल मीडिया यांच्या नादात कर्जबाजारी होऊन कुटुंबातील लोकांच्या अक्षरशः नाकी नऊ येतात. मुळात लग्न थाटात करण्यासाठी मनाई नाही, मात्र १०० ते २०० मोजक्या लोकात शिस्तबद्ध, नेटके, उधळपट्टी न करता केल्यास लग्नाची तीच पुंजी भविष्यात आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी कामी येईल किंवा तोच पैसा दोघांना उद्योग धंदा यासाठी वापरता येईल

प्रतिष्ठा जपायची असेल तर अनाथ आश्रम , वृद्धाश्रम किंवा सामाजिक उपक्रम यासाठी वापरल्यास अधिक पुण्य, आशिर्वाद, आत्मिक समाधान मिळेल यात शंका नाही . अहो, तुम्ही सोन्याच्या ताटात जरी लोकांना जेवण घातले तरी ते त्यात कमीपणा, उणीवा असतीलच, लोकं टीका करतील. छोट्या गोष्टीची कमतरता भासली की थट्टा उडवतील. हा समाज कुठलाही असो तो नाव ठेवण्यात माग पुढें पाहत नाही.

कुठल्याही पालकांना आपल्या घरी थाटात लग्न व्हावे हे जरी वाटत असले तरी अवास्तव अपेक्षांमुळे आज अनेक तरुण तरुणी लग्न जुळण्याच्या प्रतीक्षेत आहेत. गावोगावी उत्तम सुशिक्षित, संस्कारी, निर्व्यसनी मुलं आहेत पण कुणाला नोकरी नाही, कुणाजवळ शेती नाही, घर नाही, कुटुंब नाही म्हणून लग्न जुळत नाही.

लग्न जुळवंतांना मुलगा स्वतःच्या कमाईवर उभा असणारा निर्व्यसनी, मेहनती व स्वकष्टाने, जिद्दीने उभारी घेणारा असला की त्याचे कडे शेती नोकरी नसली तरी चालेल. मात्र तो आपकमाई वर उभा राहणारा असावा, बाप कमाईवर , प्रॉपर्टी पाहून लग्न करणारी नसावी. तसेच शेती असली तरी लग्न झाल्यावर मुली शेतीत जात नाही. म्हणून शेती हा विषय लग्नाचा केंद्रबिंदू नसावा, निव्वळ प्रॉपर्टी काही कामात येत नाही.

तसेच मुलींच्या पालकांच्या अवास्तव अपेक्षा पण नसाव्यात. आपली मुलगी सुखात संसार करावी असं वाटत असेल तर होतकरू मेहनती जिद्दी, संस्कारी, निर्व्यसनी मुलं मिळाली की ते दोघे स्वतःच्या जिद्दीने महाल उभा करतील, जगण्यासाठी संपत्ती किंवा शेतीच काही उपयोगी पडत नाही.

काही लग्न जुळवणारी मंडळी शेती घर नोकरी पाहून संबंध जोडतात. पण मुलगाच व्यसनी निघाला तर भवितव्य काय? मुलींना चांगले संस्कार, शिक्षण, जाणीव असली की त्या घर चांगल्या चालवतील . मात्र लग्नाच्या संबंधात मागणी हुंडा, गाडी, सोनं, प्रॉपर्टी मागणे म्हणजे कितीही सुखी असला तरी भीक मागणे आहे असंच मी समजतो ....

आई बाप आपला काळजाचा तुकडा सोपवतो त्या मुलीला अन्य मागण्या करणारी लालची लोकं स्वतःलाही मुलगी आहे हेच विसरतात व मोठया मोठया गप्पा मारताना दिसतात. लग्नाच्या बैठकीत जणू श्रीमंतीची चर्चा व अवास्तववादी मागण्या वाढीस लागतात . त्यातून खऱ्या होतकरू तरुणी, तरुण यांची लग्न जुळण्याऐवजी तुटू लागतात.

आपल्या श्रीमंतीचे पोवाडे घरीच मिरवा, मात्र कुण्या गरीब कुटुंबातील तरुणीच्या आई बापाला फासावर काही चढवू नका किंवा आपल्या श्रीमंतीच्या मोहात होतकरू तरुणाला अडकवू नका, जो खरा मेहनती असेल तो हुंडा व अवास्तव अपेक्षा काही ठेवत नाही. स्वकष्टाने स्वतःचे साम्राज्य उभा करतो. त्याला मोह हा प्रॉपर्टीचा नसतो, म्हणून घर टिकण्यासाठी समाजातील दोन्ही कुटुंब एकमेकांना समजून गुण्यागोविंदाने नांदतील हीच साधारणपणे अपेक्षा असावी. बाकी मोह माया काही कामाची नाही...

कामापूरता पैसा स्वतःच्या कष्टाने कमवावा तो सासरच्या मंडळींना का मागावा? भीक मागून काही स्वाभिमान जगवता येत नसतो, इज्जतीने जगायचे तर स्वतःच्या मनगटावर जगावे. गाडी पाहिजे, लग्न धुमधडाक्यात पाहिजे, सोनंही पाहिजे, घरही पाहिजे, हिस्साही पाहिजे मग काय हातात बांगडी घालून जगणेच म्हणावे लागेल.

काही सो कॉल्ड उच्चशिक्षित, गर्विष्ठ श्रीमंत मंडळी समाजाचे वातावरण बिघडवीत आहेत . त्यांचाच मुळे आज लग्न एका सेलेब्रिटी इव्हेंट सारखी झाली आहेत ते पाहून इतर मंडळी ही त्याला साजेशी लग्न कर्ज काढून शेती विकून करतात . भविष्य काही पहात नाही. ज्यांच्या जवळ पैसे आहेत, त्यांनी करावेत लग्न मोठी मोठी. मात्र गरीब कुटुंबातील मंडळींना हीन भावनेने पाहू नये.

लग्न ही शेवट पर्यंत निभावली जावीत.

कुटुंब म्हटलं की भांड्याला भांड लागणारच. मात्र त्याचं द्वेषात, रूपांतर न होण्या साठी काही लुड बुड करणारी मंडळी यांनीही थांबलं पाहिजे. घर तोडण्या ऐवजी कुटुंब जुळुन राहील इतकं तरी समजदार राहावं .

लग्न तुटलं की प्रॉपर्टी कामात पडत नाही शेवटी पती पत्नी हेच समीकरण कुटुंब व्यवस्थेचा आधार आहे मग पैसा पोडगी काही सुखाची शाश्वती देत नाही ,जीवन जगताना अपेक्षा ह्या स्वतःकडून असाव्यात त्या इतरांच्या कडून नको. आज अनेक लग्न हुंड्यासाठी तुटतात त्याला दोन्ही कडच्या अवास्तव अपेक्षा व मध्यस्थी करणारे लोक यामुळे बरीच कुटूंब उध्वस्त झाली आहेत. काही कोर्टात चकरा मारतात, तर काही स्वतःला संपवून कायमचं दुःख कुटुंबातील लोकांना देतात.

वास्तविक लग्नाची आचारसंहिता जैन, ब्राम्हण, ख्रिश्चन व काही अनेक समाजाच्या सारखी असली पाहिजे . थोडक्यात लग्न व जमलेली राशी ही भविष्याची गुंतवणूक ही आजची गरज आहे .

सर्वांना काही सरकारी नोकऱ्या मिळणार नाही. शेवटी नोकरी ही कुठलीही असो किंवा बिझनेस असो मेहनतीला पर्याय नाही. चांगली मुलं, मुली ही ओळखता आली पाहिजे , निव्वळ रूप पैसा शेती काही कामात येतं नाही. निर्विवाद पणे कुठलेही व्यसन नसणारी मुलं ही काही सोन्यापेक्षा कमी नाहीत.

अ‍ॅडजस्ट करण्यापेक्षा समजावून घराचा गाडा चालवला तर अनेक लग्न जुळून राहून कौटुंबिक न्यायालयात पायरी चढण्याची वेळचं येणार नाही. नाहीतर स्वतःचे कुटूंब उध्वस्त करण्यास आपणच जवाबदार राहू . यात राहू केतूचा काही दोष नाही.

आपल्या आई वडील आजोबांनी काही पूजा कुंडल्या भटजी यांना दाखवून लग्न जोडली नाही किंवा केली नाही, ह्या रेशीमगाठी स्वतःच्या मनाने सद्सद्विवेक बुद्धिने जोडून कुणाच्या सांगण्याने घर तोडली नाही वा कलहही घरापर्यंत असला तरी घरीच निपटून मूलंबाळ सेट केली व आनंदाची बोळवण केली तेव्हा नव्हता फोन. हेही मानावेचं लागेल

संत तुकडोजी महाराज ग्रामगीता या पवित्र ग्रंथात लिहून आपणास सावधान करून गेले

*विवाहादि संस्कार आवश्यक।*
*परि खर्च न व्हावा अधिक।*
*त्यांचे स्वरूप जाणोनि तात्विक ।*
*आचरावे सर्वदा।*

■ ■ ■ ■

# आरसीबीचे ऐतिहासिक जेतेपद!

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएलच्या अठराव्या हंगामाची नुकतीच सांगता झाली. मंगळवारी झालेल्या रोमहर्षक अंतिम सामन्यात रजत पाटीदारच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने श्रेयस अय्यरच्या पंजाब सुपर किंग्स संघाला सहा धावांनी नमवत पहिल्यांदाच आयपीएल ट्रॉफीवर नाव कोरत इतिहास रचला.

आरसीबीने अठराव्या वर्षी हे ऐतिहासिक विजेतेपद मिळवून १८ वर्षांची प्रतीक्षा संपवली. गेली १८ वर्ष आरसीबीचे आजी - माजी खेळाडू, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ आणि आरसीबीचे चाहते ज्या क्षणाची वाट पाहत होते तो क्षण आला आणि आरसीबीचा महान खेळाडू विराट कोहली भावूक झाला.

आरसीबीच्या विजयावर शिक्कामोर्तब झाल्यावर विराट कोहलीच्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले. लहान मुलासारखा विराट रडू लागला. कधी जमिनीत तोंड खुपसून तर कधी आपल्या आजी माजी सहकाऱ्यांच्या गळ्यात पडून तर कधी आपल्या पत्नीच्या गळ्यात पडून तो रडू लागला. विराटला इतके भावूक झाल्याचे याआधी कधी पाहिले नाही.





मैदानावर नेहमी आक्रमक राहणारा विराट पहिल्यांदाच इतका भावूक झाला आणि त्याने आपल्या आनंदाश्रुंना वाट मोकळी करून दिली. अर्थात हे आनंदाश्रु होते १८ वर्ष पाहिलेले स्वप्न साकार झाल्याचे. हे फक्त आनंदाश्रु नव्हते तर त्यामागे त्याने केलेली मेहनत, जिद्द आणि त्याची हार न मानण्याची वृत्ती. आपल्या संघाला आयपीएलचे विजेतेपद मिळवून द्यायचेच असा चंग त्याने बांधला पण त्यात त्याला यश येत नव्हते.

यावेळी मात्र त्याला त्यात यश आले आणि विराट सोबतच मैदानावरील आणि आणि टीव्ही, मोबाईलवर सामना पाहणाऱ्या करोडो क्रिकेट प्रेमींनी एकच जल्लोष केला. जो तो विराट कोहलीचे आणि आरसीबी संघाचे कौतुक करू लागला. घराघरात आणि सोशल मीडियावर आरसीबी संघाचे अभिनंदन करण्याची स्पर्धा सुरू झाली. अर्थात आरसीबी संघांसाठी हे विजेतेपद सोपे नव्हते कारण अंतिम सामन्यात पोहचलेले दोन्ही संघ हे तुल्यबळ होते. दोघांनीही साखळी सामन्यात चांगली कामगिरी करून पॉईंट टेबलवर पहिले आणि दुसरे स्थान पटकावले होते त्यामुळे अंतिम सामना रंगतदार होणार यात कोणालाही शंका नव्हती.

पहिली फलंदाजी करताना आरसीबीने अपेक्षेप्रमाणे चांगली फलंदाजी करत १९० धावा काढल्या. विराट कोहली, रजत पाटीदार, जितेश शर्मा यांनी चांगली फलंदाजी केली मात्र पंजाबच्या गोलंदाजांनी त्यांना २०० धावा काढून दिल्या नाहीत. अर्शदीप सिंग आणि काईल जेमिन्सन यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. १९१ धावांचा पाठलाग करताना पंजाबने चांगली सुरुवात केली प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी चांगली सलामी दिली. दोघांनीही पहिल्या गाड्यांसाठी ४३ धावा काढल्या. जॉस इंग्लिसने २३ चेंडूत ३९ धावा काढून सामन्यात रंगत आणली मात्र श्रेयस अय्यर पुन्हा एकदा आरसीबी विरुद्ध फ्लॉप ठरला. अवघी १ धाव काढून तो माघारी फिरला. तिथेच सामना आरसीबीच्या बाजूने झुकला. अखेरच्या षटकात नेहाल वढेरा आणि शशांक सिंग यांनी झुंज दिली पण ती अपुरी ठरली. पंजाबचा संघ १८४ धावाच काढू शकला आणि आरसीबीने सहा धावांनी विजय मिळवला. आरसीबीच्या या विजयात त्यांच्या गोलंदाजांचे मोलाचे योगदान होते.

त्यांनी अतिशय शिस्तबद्ध मारा केला. भुवनेश्वर कुमार आणि कृणाल पांड्याने प्रत्येकी दोन बळी घेतले.त्यांच्या अचूक माऱ्याने पंजाबच्या फलंदाजांना वेगाने धावा काढता आल्या नाहीत. कृणालाने तर चार षटकात अवघ्या सतरा धावा देत दोन गडी बाद केले म्हणूनच त्याला प्लेअर ऑफ द मॅच हा पुरस्कार देण्यात आला.

आरसीबीच्या इतर गोलंदाजांनीही चांगली गोलंदाजी केली आणि आपल्या संघाला विजयी करत संघातील खेळाडूंसह चाहत्यांना जल्लोष करण्याची संधी निर्माण करून दिली. ऐतिहासिक विजेतेपद मिळवणाऱ्या आरसीबी संघाचे मनापासून अभिनंदन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

■ ■ ■



# दररोज करा या पानांचे सेवन

आपण आपल्या आहारात फळे आणि भाज्यांचा समावेश करतो, परंतु काही खास हिरव्या पानांचे महत्त्व दुर्लक्षित करतो. खरं तर, काही कच्ची पाने अशी असतात जी पोषक तत्वे, फायबर, अँटीऑक्सिडंट्स आणि डिटॉक्सिफायिंग गुणधर्मांनी समृद्ध असतात.

हे केवळ तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवत नाहीत तर पचनापासून ते त्वचेच्या आरोग्यापर्यंत सर्वकाही सुधारतात. आरोग्यतज्ञांच्या मते, या हिरव्या पानांचा वापर शतकानुशतके भारतात आयुर्वेद आणि घरगुती उपचारांमध्ये केला जात आहे. तुळस असो, कढीपत्ता असो किंवा शेवग्याची पाने असो या सर्वांचे स्वतःचे फायदे आहेत. ते सॅलड, ज्यूसमध्ये किंवा थेट चावूनही खाऊ शकतात.

विशेष म्हणजे त्यांचे कोणतेही दुष्परिणाम नाहीत आणि ते नैसर्गिकरित्या शरीराला विषमुक्त करण्यास मदत करतात.

**तुळशीची पाने :** दररोज सकाळी रिकाम्या पोटी ४-५ तुळशीची पाने चावल्याने सर्दी, खोकला आणि घसा खवखवणे यासारख्या समस्या टाळता येतात. याशिवाय, यामुळे मानसिक आरोग्य तसेच पचन सुधारते .

**कढीपत्त्याची पाने :** कढीपत्ता केवळ चवीसाठीच चांगले नाही तर ते आरोग्यासाठीही उत्तम आहे. त्यात फायबर, लोह आणि व्हिटॅमिन सी असते जे पचनसंस्था मजबूत करते आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवते. ते कच्चे चावणे किंवा रिकाम्या पोटी पाण्यासोबत घेणे खूप फायदेशीर आहे.

**शेवग्याची पाने :** शेवग्याची पाने किंवा मोरिंगा पाने हे पौष्टिकतेचा खजिना आहेत. त्यात प्रथिने, लोह, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन ए असते जे शरीराला ऊर्जा देते, हाडे मजबूत करते आणि त्वचा चमकदार बनवते. तुम्ही ते सॅलडमध्ये खाऊ शकता किंवा ज्यूस बनवून पिऊ शकता.

**कोथिंबीर आणि पुदिना :** कोथिंबीर आणि पुदिना यासारख्या हिरव्या पानांमध्ये व्हिटॅमिन ए, सी आणि के असते जे त्वचेला उजळवते आणि पचन सुधारते. ते कच्चे खाल्ल्याने किंवा स्मूदीमध्ये मिसळल्याने शरीर ताजेतवाने आणि थंड होते. विशेषतः उन्हाळ्यात, ही पाने नैसर्गिक शीतलक म्हणून काम करतात.

**पालक :** पालकामध्ये लोह आणि फायबर भरपूर प्रमाणात असते, जे अशक्तपणा रोखते आणि पोट देखील स्वच्छ ठेवते. ते शरीराला आतून मजबूत करते आणि उर्जेची पातळी वाढवते.

■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## माझी माती..?

माझी माती माझा देश
वरीष्ठ पातळीवरून
कृतीत यायला पाहीजे
भाऊ हा संदेश ... !
तर हमखास - -
आम जनता आचरणात
आणेल हा -
अनमोल उपदेश ..!

कारण
जैसा देश वैसा भेष
यथा राजा तथा प्रजा
हा संसाराचा -
नियम आहे ना राजा . !

# पोलिसांनी बनावट कीटकनाशकच्या रॅकेटचा पर्दाफाश



**नागपूर, ६ जून :** बनावट कीटकनाशकांच्या रॅकेटमधील प्रमुख आरोपींपैकी राजू चेचानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजेंद्र चेचानी याला तेलंगणा पोलिसांनी एका कारवाईदरम्यान अटक केली. स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या सहकार्याने केलेल्या या कारवाईत पोलिसांनी २ मे २०२५ रोजी राजस्थानातील चित्तोडगड जिल्ह्यातील बस्सी गावातील फार्महाऊसवरून राजू याला अटक केली.

या कारवाईमुळे भारतातील कृषी क्षेत्राला असलेला बनावट कीटकनाशकांचा वाढता धोका उघडकीस आला आहे. या अशा लोकांकडून बनावट कीटकनाशकांच्या माध्यमातून निष्पाप शेतकऱ्यांना वारंवार फसवले जाते. एकदम खऱ्या ब्रँडसारखी पॅक केलेली ही बनावट रसायने शेतीसाठी अत्यंत हानिकारक असतात. त्यांच्या वापरामुळे तसेच त्यातील घातक घटकांमुळे अनेकदा पिकांचे नुकसान होते आणि उत्पादनात घट होते. नुकत्याच झालेल्या या अटकेमुळे अशा प्रकाराला आळा बसेल अशी आशा व्यक्त होते आहे. अनेक राज्यांमध्ये पसरलेल्या बनावट कृषी रसायनांची ही पुरवठा साखळी तुटेल, अशी अपेक्षा आहे.

चेचानीवर आरोप आहे की, तो सात वर्षांहून अधिक काळ असा अवैध व्यवसाय आणि बेकायदेशीर नेटवर्क चालवत होता. ११ हून अधिक राज्यांमध्ये असलेल्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून त्याने संपूर्ण भारतात बनावट कीटकनाशके तयार आणि वितरित केली. दिल्ली, हरियाणा, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक येथे कार्यरत असलेल्या सहकाऱ्यांच्या विस्तृत नेटवर्कद्वारे प्रतिष्ठित कृषी रसायन कंपन्यांचे लेबल लावलेली बनावट उत्पादने त्याने पुरवली.

प्राथमिक तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, बस्सी येथे चेचानीचे महेश्वरी सीड्स अँड पेस्टिसाइड्स नावाने एक दुकान आहे. नियमांचे उल्लंघन करत पॅकेजिंग मटेरियल आणि तयार बनावट उत्पादनांचा तो कथितरित्या प्रमुख पुरवठादार असल्याचे समजते.

हैदराबादमधील नियमबाह्य काम करणाऱ्या ई राजेशच्या गोदामात जुलै २०२४ मध्ये बनावट कीटकनाशके सापडल्यानंतर कीटकनाशक कायद्यांतर्गत एलबी नगर पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या एफआयआर क्रमांक ८३१/२०२४ च्या आधारे ही अटक करण्यात आली आहे.

अधिक तपासात अन्य राज्यांमध्ये चेचानीविरुद्ध दाखल केलेले अनेक गुन्हे उघडकीस आले आहेत. यामुळे त्याच्या कारभाराची व्याप्ती आणि तसेच नियमबाह्य कामांमध्ये असलेला त्याचा समावेश अधोरेखित होतो आहे.

# एईएसएलला महाराष्ट्रात मिळाला १,६६० कोटींचा ट्रान्समिशन प्रकल्प

**गोंदिया, ६ जून :** भारतातील सर्वात मोठी खाजगी ट्रान्समिशन आणि वितरण करणारी कंपनी आणि जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या अदानी समूहाचा भाग असलेली अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड (एईएसएलला), हिने महाराष्ट्रात १,६६० कोटींचा आंतरराज्यीय ट्रान्समिशन प्रकल्प मिळविला असल्याची माहिती आज दिली.

या प्रकल्पामध्ये ३,००० मेगा व्होल्ट-अँपिअर्स (एमव्हीए) क्षमतेचे सबस्टेशन्स आणि इतर संबंधित ट्रान्समिशन इंफ्रास्ट्रक्चर उभारण्याचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे एईएसएलचं एकूण ट्रान्समिशन नेटवर्क २६,६९६ सर्किट किलोमीटर (सीकेएम) आणि ट्रान्सफॉर्मेशन क्षमतेसह ९३,२३६ एमव्हीएवर पोहोचेल. एईएसएल हा प्रकल्प जानेवारी २०२८ पर्यंत पूर्ण करणार आहे.



हा प्रकल्प विशेष उद्देशासाठी स्थापन करण्यात आलेल्या कंपनी (स्पेशल पर्पज वेहिकल - एसपीव्ही) डब्ल्यूआरएनईएस तळेगाव पावर ट्रान्समिशन लिमिटेड च्या अंतर्गत येतो. या प्रकल्पामुळे रायगड भागातील हायड्रो पंप्ड स्टोरेज प्रकल्पांमधून निर्माण होणारी १.५ गीगावॅट ग्रीन ऊर्जा मुंबई आणि आसपासच्या भागांमध्ये पोहोचवता येणार आहे. आज एईएसएलला या प्रकल्पाचे औपचारिक हस्तांतरण करण्यात आले.

हा आंतरराज्यीय ट्रान्समिशन प्रणाली (इंटर स्टेट ट्रान्समिशन सिस्टीम - आयएसटीएस) प्रकल्प टॅरिफ बेस्ड कॉम्पेटिटिव्ह बिडिंग (टीबीसीबी) यंत्रणेद्वारे जिंकण्यात आला असून, आरईसीपीडीसीएल(आरईसी पॉवर डेवलपमेंट अँड कंसल्टंसी लिमिटेड) या संस्थेने या निविदा प्रक्रियेचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

या नवीन ऑर्डरमुळे एईएसएलच्या ट्रान्समिशन ऑर्डरबुकची एकूण किंमत आता सुमारे ६१,६०० कोटी झाली आहे. वेबसाइट सीएमएस कंटेंट अपडेटसाठी कृपया अदानी सर्विसनाउ पोर्टल (https://adani.service-now.com) वर तिकीट उघडा.

## जागतिक पर्यावरण दिनी प्लास्टिक कचरा आणि पर्यावरणीय जबाबदारीबद्दल जनजागृती करत आहेत झी टीव्ही वरील कलाकार!

**मुंबई, ६ जून :** जागतिक पर्यावरण दिन २०२५ हा 'प्लास्टिक प्रदूषण संपवणे' या अत्यंत महत्त्वाच्या संकल्पनेसह साजरा करण्यासाठी अख्खे जग एकत्र येत असताना झी टीव्हीवरील लोकप्रिय कलाकार केवळ त्याबद्दल चिंता व्यक्त करत नाहीयेत, तर त्यांच्या दैनंदिन जीवनात त्यांनी केलेल्या सजग बदलही शेअर करत आहेत. झी टीव्हीवरील जमाई नं. १ मधील सिमरन कौर, भाग्य लक्ष्मी मधील ऐश्वर्या खरे, कुमकुम भाग्य मधील शक्ती आनंद, सरु मधील मोहक मटकर, वसुधा मधील सचिन पारिख आणि जागृति एक नयी सुबह मधील आर्य बब्बर हे कलाकार प्लास्टिक कचऱ्यावर आणि पर्यावरणीय जबाबदारीवर अर्थपूर्ण चर्चा घडवून आणत आहेत. त्यांच्या ऑन-स्क्रीन अभिनयाबरोबरच त्यांच्या ऑफ-स्क्रीन प्रभावामुळे, या कलाकारांच्या मते बदलाची खरी सुरुवात ही वैयक्तिक जबाबदारीने होते. पुन्हा वापरता येणारी पाण्याची बाटली वापरणे असो किंवा सेटवर अधिक शाश्वत पर्याय निवडण्यासाठी इतरांना प्रेरित करणे असो, त्यांच्या कृती आपल्याला आठवण करून देतात की खरा प्रभाव छोटी, पण सातत्यपूर्ण पावले उचलण्यातून येतो.

जमाई नं. १ मध्ये रिद्धीची भूमिका साकारत असलेली सिमरन कौर म्हणाली, जागतिक पर्यावरण दिन मला नेहमीच क्षणभर थांबून विचार करण्यास प्रवृत्त करतो. पण यंदा 'प्लास्टिक प्रदूषण संपवणे' ही संकल्पना मला खूपच वैयक्तिक स्तरावरील वाटत आहे. लहानपणी समुद्रकिनाऱ्यावर चालत असताना शंख-शिंपले गोळा करताना, पायांवर फेसाळणाऱ्या लाटा जाणवत घेणे, त्या आठवणी आजही जिवंत आहेत. पण आज त्याच किनाऱ्यावर प्लास्टिक कचऱ्याचे ढीग दिसतात. ही स्थिती फारच दुःखद आहे. मी माझ्या जीवनशैलीत छोट्या पण सजग सवयी अंगीकारल्या स्वतःची पाण्याची बाटली बाळगणे, प्लास्टिक स्ट्रॉ आणि पिशव्यांचा वापर न करणे तसेच शाश्वत पॅकेजिंग निवडणे. सेटवरही मी प्लास्टिक-मुक्त पर्याय मागते.

भाग्य लक्ष्मी मध्ये लक्ष्मीची भूमिका साकारणारी ऐश्वर्या खरे म्हणाली, प्लास्टिक सर्वत्र आहे आपल्या घरात, समुद्रात आणि अगदी आपण श्वास घेतो त्या हवेतसुद्धा. काही वर्षांपूर्वी एका समुद्रकिनाऱ्याच्या स्वच्छतेच्या मोहिमेत भाग घेतला आणि तिथे एक कासव प्लास्टिकच्या तुकड्यांमध्ये अडकलेले पाहिले ते माझ्या डोळ्यांसमोर अजूनही आहे. तेव्हापासून मी प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा निश्चय केला. मी कायम माझा री-यूजेबल किट मेटल कटलरी, स्टील स्ट्रॉ आणि फोल्ड होणारा कप बाळगते. हे आता माझ्या जीवनशैलीचा भाग झालंय. मी पॅकबंद स्नॅक्स टाळते आणि प्रवासासाठी भरपूर पाणी सोबत घेते.

कुमकुम भाग्य मध्ये करणची भूमिका साकारणारा शक्ती आनंद म्हणाला, एक अभिनेता म्हणून माझा वेळ सतत प्रवासात जातो शूटिंग, इव्हेंट्स, प्रवास आणि तेव्हा लक्षात येते की सिंगल-यूज प्लास्टिक किती सहज आपल्या जीवनात शिरले आहे. जेव्हा आपण सजग होतो, तेव्हाच त्याचे अस्तित्व जाणवते. या जागतिक पर्यावरण दिनी मी माझा प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा संकल्प केला आहे. आता मी माझी पाण्याची बाटली, स्वतःची कटलरी आणि मेटल स्ट्रॉ बाळगतो, आणि कापडी पिशवीसुद्धा नेहमी सोबत ठेवतो. सेटवर मी इतरांना शाश्वत पर्याय निवडण्यासाठी प्रोत्साहित करतो.

जागृति एक नयी सुबह मध्ये कलिकांत ठाकूरची भूमिका साकारणारा आर्य बब्बर म्हणाला, मागच्या वर्षी एका ट्रेक दरम्यान जेव्हा मी एका डोंगरशिखरावर पोहोचलो, तेव्हा तिथे असावी तशी निर्मळ हवा आणि नैसर्गिक सौंदर्य नसून, प्लास्टिकच्या पिशव्या आणि बाटल्यांनी भरलेली जमीन पाहून धक्का बसला. त्या गोष्टीने माझ्यावर खोल प्रभाव टाकला. तेव्हापासून मी सिंगल-यूज प्लास्टिकला पूर्णपणे निरोप दिला. प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या, स्ट्रॉ काहीही वापरत नाही. घरी मी कंपोस्ट होणारे कचरा पिशव्या वापरतो, आणि प्रवासात प्लास्टिकच्या बाटल्यांऐवजी सॉलिड शॅम्पू बार वापरतो. आयुष्य एकदम बदलणं कठीण आहे, पण विचारपूर्वक निवडी करणे शक्य आहे.

## डीएसपी म्युच्युअल फंडातर्फे आयटी आणि आरोग्यसेवा क्षेत्रांवर आधारित इंडेक्स फंड योजना सादर

**नागपूर, ६ जून :** डीएसपी म्युच्यूअल फंडाने डीएसपी निफ्टी आयटी इंडेक्स आणि डिएसपी निफ्टी हेल्थकेअर इंडेक्स फंड हे दोन नवीन फंड गुंतवणूकदारांसाठी आणले आहेत. व्यापक स्वरुपातील शेअरबाजाराच्या तुलनेत लवचिकतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या क्षेत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी गुंतवणूकदारांना मार्ग प्रदान करणे, हे या फंडांचे उद्दिष्ट आहे.

माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि आरोग्यसेवा (हेल्थकेअर) यासारख्या बचावात्मक क्षेत्रांनी ऐतिहासिकदृष्ट्या व्यापक शेअर बाजाराच्या तुलनेत अल्पबीटा दर्शविला आहे. याचाच अर्थ बाजारात मंदी असताना अथवा आर्थिक संकटे किंवा भू-राजकीय घटनांचा या दोन क्षेत्रांवर अत्यल्प परिणाम झालेला आहे. उदाहरणार्थ, जागतिक वित्तीय संकट (जानेवारी - ऑक्टोबर २००८) आणि कोविड-१९ साथीच्या काळात (जानेवारी - मार्च २०२०), निफ्टी हेल्थकेअर आणि निफ्टी आयटी निर्देशांकांत माफक घसरण झाली आणि त्यांनी वेगाने उसळी मारत व्यापक निफ्टी ०० निर्देशांकाच्या तुलनेत जोरदार कामगिरी बजावलेली आहे.

डीएसपी म्युच्युअल फंडचे सीएफए आणि पॅसिव्ह इन्व्हेस्टमेंट्स अँड प्रोडक्ट्सचे प्रमुख अनिल घेलानी नवीन फंडांच्या शुभारंभप्रसंगी बोलताना म्हणाले, डीएसपी निफ्टी आयटी इंडेक्स फंड आणि डीएसपी निफ्टी हेल्थकेअर इंडेक्स फंड योजनांमुळे गुंतवणूकदारांना वाढ तसेच लवचिकता एकत्रित करणाऱ्या क्षेत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी संतुलित दृष्टिकोन प्रदान होतो. सध्याच्या अनिश्चित बाजार वातावरणात आयटी आणि हेल्थकेअर सारख्या संरक्षणात्मक क्षेत्रांमध्ये कमी घसरण झालेली आहे. त्यामुळे या क्षेत्रांत आकर्षक परतावा प्रदान करण्याची क्षमता आहे.

डीएसपी म्युच्यूअल फंडाच्या पॅसिव्ह फंड विभागाचे बिझनेस हेड गुरजीत कालरा याप्रसंगी टिप्पणी करताना म्हणाले, माहिती तंत्रज्ञान आणि आरोग्यसेवा यासारख्या कमी-बीटा क्षेत्रांचा आपल्या गुंतवणूकीत धोरणात्मक समावेश करून, गुंतवणूकदार अधिक लवचिक आणि कार्यक्षम पोर्टफोलिओ तयार करू शकतात. त्यामुळे त्यांना परतावा वाढण्यास त्याचबरोबर शेअरबाजारातील जोखीम प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यास मदत होऊ शकते. सध्या व्यापक निर्देशांकांमध्ये बचावात्मक क्षेत्रांचे प्रतिनिधित्व कमी झालेले आहे. निर्देशांकात कमी मूल्य असलेली आयटी आणि आरोग्यसेवेसारखी क्षेत्रे पुढील वर्षात शेअरबाजारापेक्षा चांगली कामगिरी करतात, हे इतिहास दर्शवितो. आमचा शिस्तबध्द अप्रत्यक्ष गुंतवणूक व्यवस्थापन दृष्टिकोनाचा उद्देश या क्षेत्रांचा अतिशय बारकाईने मागोवा घेणे हा आहे. त्यामुळे कमी अस्थिरता राखताना संरचनात्मक वाढ मिळवण्यास गुंतवणूकदारांना मदत होते.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने सस्टेनेबल रिसोर्स मॅनेजमेंट ड्राईव्ह या थीमखाली एन्व्हायर्नमेंट मंथ २०२५ ची सुरुवात केली

**बेंगळुरू, ६ जून :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज एन्व्हायर्नमेंट मंथ २०२५ अर्थात पर्यावरण महिना ची सुरुवात केली असून, सस्टेनेबल रिसोर्स मॅनेजमेंट ड्राईव्ह या थीमच्या माध्यमातून टिकावूपणा (सस्टेनेबिलिटी) या दिशेने आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली आहे. हा उपक्रम टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५० आणि ग्लोबल थीम इन्हानसिंग अवेयरनेस टूवर्ड्स रियलायजिंग टोयोटा ग्लोबल व्हिजन २०५० सोबत सुसंगत आहे. या मोहिमेचा उद्देश कंपनी आणि तिच्या मूल्यसाखळीत (व्हॅल्यू चेन) शाश्वततेची संस्कृती(सस्टेनेबिलिटी कल्चर) अधिक बळकट करणे आहे. यावर्षीचा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे झिरो-बेस थिंकिंग या धोरणाचा अवलंब ज्यामध्ये सर्व संसाधनांचे मूल्यमापन नव्याने करून, केवळ खरे मूल्य निर्माण करणारीच संसाधने कायम ठेवली जातात. यामुळे रिफ्युज, रिसायकल (सर्क्युलर इकॉनॉमी), रियूज आणि रिड्यूस (4R) यामार्गे दीर्घकालीन टिकाऊ कार्यक्षमतेला चालना मिळते.

प्रत्येक वर्षी जून महिन्यात साजरा केला जाणारा टोयोटाचा ग्लोबल एन्व्हायर्नमेंट मंथ महत्त्वाच्या पर्यावरणीय समस्यांवर कृती करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करतो. २०२५ मधील आवृत्ती ही जनजागृती आणि सहभाग वाढवण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांवर आधारित आहे, शिवाय भारतात टीकेएमच्या २५ वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा टप्पाही साजरा केला जात आहे. यंदाचा थीम आहे जर्नी टू ग्रीन @25 जी त्यांच्या प्रमुख पर्यावरणीय कामगिरीचे प्रतिनिधित्व करते.

या प्रसंगी टीकेएमचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस प्रेसिडेंट व डायरेक्टर-मॅन्युफॅक्चरिंग, बी. पद्मनाभा म्हणाले, टीकेएममध्ये पर्यावरण संवर्धन ही केवळ कॉर्पोरेट धोरणाचा भाग नसून, ती आमच्या कामकाजात खोलवर रुजलेली मूल्य आहे. पर्यावरण महिना हा केवळ कॅलेंडरवर येणारा कार्यक्रम नसून, आपल्या मूल्यसाखळीतील प्रत्येक व्यक्तीला हरित भविष्यासाठी कृती करण्यास प्रवृत्त करणारे आवाहन आहे. झिरो-बेस थिंकिंग आम्हाला केवळ लहान सुधारणा न करता कायमस्वरूपी प्रभाव निर्माण करणारे परिवर्तनात्मक उपाय स्वीकारण्यास प्रवृत्त करते. प्रत्येक उपक्रम केवळ भागधारकांना सहभागी करून घेत नाही तर शाश्वत जीवनशैली आणि हरित नवकल्पनांची सखोल समज पुरवतो.

## अदानी एअरपोर्ट्सकडून पुढील टप्प्याच्या वाढीसाठी ७५० दशलक्ष डॉलर्सचा जागतिक वित्तपुरवठा सुनिश्चित

**अहमदाबाद, ६ जून :** भारतातील सर्वात मोठा खासगी विमानतळ संचालक (एअरपोर्ट ऑपरेटर) आणि अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडचा उपघटक असलेल्या अदानी एअरपोर्ट्स होल्डिंग्स लिमिटेड (एएएचएल) ने आंतरराष्ट्रीय बँकांच्या गटाकडून एक्स्टर्नल कमर्शियल बोरोविंग्स (ईसीबी) च्या माध्यमातून ७५० दशलक्ष डॉलर्स उभारले आहेत. या व्यवहाराचे नेतृत्व फर्स्ट अबू धाबी बँक, बार्कलेज पीएलसी आणि स्टँडर्ड चार्टर्ड बँक यांनी केले.

या निधीचा वापर विद्यमान कर्जाच्या पुनर्वित्तासाठी, पायाभूत सुविधांच्या सुधारणेसाठी आणि सहा विमानतळांच्या (अहमदाबाद, लखनऊ, मंगलुरू, जयपूर, गुवाहाटी आणि तिरुअनंतपुरम) क्षमतेच्या वाढीसाठी केला जाणार आहे. तसेच, संपूर्ण विमानतळ नेटवर्कवर नॉन-एरोनॉटिकल व्यवसाय जसे की रिटेल, एफ अँड बी (फूड अँड बेव्हरेज), ड्युटी फ्री आणि इतर सेवा यांचा विस्तारही यातून करण्यात येईल.

एएएचएल ने वित्तीय वर्ष २०२४२५ मध्ये ९४ दशलक्ष प्रवाशांची सेवा केली असून सध्या त्यांची एकूण क्षमता ११० दशलक्ष प्रवाशी इतकी आहे. २०४० पर्यंत ही क्षमता टप्प्याटप्प्याने वाढवून ३०० दशलक्ष प्रवाशी प्रतिवर्ष करण्याचं उद्दिष्ट आहे. या योजनेचा भाग म्हणून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच कार्यान्वित होणार असून, पहिला टप्पा २० दशलक्ष प्रवाशांच्या क्षमतेसह सुरु होईल आणि पुढील टप्प्यांमध्ये ती क्षमता वाढवून ९० दशलक्षपर्यंत नेण्यात येईल, ज्यामुळे मुंबई परिसरातील विमान सेवा पायाभूत सुविधा लक्षणीयरित्या वाढणार आहेत.

एएएचएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बंसल म्हणाले, जागतिक वित्तीय संस्थांनी दाखवलेला विश्वास हे भारताच्या विमानतळ पायाभूत सुविधांच्या दीर्घकालीन मूल्य आणि क्षमतेचं प्रतीक आहे. एएएचएलने आपल्या संपूर्ण विमानतळ नेटवर्कवर टेक्नॉलॉजीचा वापर करत ग्राहकांना अनन्यसाधारण अनुभव देण्यासाठी शाश्वततेला आणि स्थानिक समाजाशी जुळवून घेण्याला प्राधान्य देत आपली वाटचाल करत आहे. आमचा प्रवास सुरूच आहे आणि गेटवे टू गुडनेस म्हणून आम्ही ग्राहककेंद्रित उपाय देण्यास आणि सेवा व शाश्वततेमध्ये जागतिक स्तरावर उदाहरण ठरतील अशा दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्यास कटिबद्ध आहोत.

या व्यवहारासाठी इंग्लिश लॉ कॉंसिल(कायदेशीर सल्लागार) म्हणून लॅथम अँड वॉटकिंस एलएलपी आणि लिंकलेटर्स एलएलपी यांनी काम केलं, तर इंडियन लॉ कॉन्सिल म्हणून सिरील अमरचंद मंगलदास आणि टीटी अँड ए कार्यरत होते.

## पुष्पा इम्पॉसिबलमध्ये कायद्याच्या प्रवेश परीक्षेची तयारी करणाऱ्या पुष्पाच्या स्वप्नामध्ये संदेहाचे विघ्न



**मुंबई, ६ जून :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत चिकाटी, हिंमत आणि दुसरी संधी यांचे महत्त्व सांगणाऱ्या कथानकाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. प्रेक्षकांनी पाहिले की, पुष्पा (करुणा पांडे) अखेरीस कायदा शिकण्याचा आपला नवा ध्यास पूर्ण करण्याचे ठरवते. पण, नेहमीप्रमाणे तिच्या प्रवासातील पावलागणिक तिच्या समोर भावनिक, वैयक्तिक आणि नैतिक आव्हाने उभी राहतात.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका जिवंत करणारी अभिनेत्री करुणा पांडे म्हणते, हे कथानक पुष्पाच्या जीवनातील एक महत्त्वाचा टर्निंग पॉइंट आहे. कायदा शिकणे ही केवळ तिची महत्त्वाकांक्षा नाही, तर स्वतःचा आवाज शोधण्याचा आणि सत्याच्या बाजूने उभे राहण्याचा तिचा हा प्रयत्न आहे. हा भावनिक प्रवास साकारताना मी आनंद अनुभवत आहे कारण यामधून पुष्पाचे खरे रूप व्यक्त होते निडर, प्रामाणिक आणि नवीन शिकण्यासाठी सदैव तयार- मग तिचे वय आणि परिस्थिती काहीही असो. परीक्षेच्या पेपर चोरीच्या घटनेत तिच्या सचोटीची परीक्षा होते. सोपा मार्ग न स्वीकारता सत्याचा मार्ग स्वीकारण्याच्या तिच्या निवडीमुळेच ही गोष्ट नेहमी प्रभावी होते.

## जमाई नं.१ साठीच्या एका वनटेक भावनिक दृश्यामध्ये सिमरन कौरला कोसळले रडू




**मुंबई, ६ जून :** झी टीव्हीवरील लोकप्रिय नाट्य जमाई नं.१ आपल्या हायव्होल्टेज कथानक आणि भावनिकदृष्ट्या भरलेल्या क्षणांसह प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. आता एका नवीन ट्विस्टमध्ये हे कथानक आणखी एक नाट्यमय वळण घेत असून नील (अभिषेक मलिक) ला सायली (सोनल वेंगुर्लेकर) ने दाखल केलेल्या धक्कादायक छेडछाडीच्या गुन्ह्यासाठी चुकून अटक करण्यात येते. त्या सगळ्या गोंधळात नीलच्या समर्पित पत्नी रिद्धीची भूमिका करणाऱ्या सिमरन कौरने आपल्या पतीचा निरागसपणा सिद्ध करण्यासाठी आणि सत्य उघडकीस आणण्यासाठी अतिशय शक्तीशाली आणि हृदय पिळवटून टाकणारा अभिनय केला.

ह्या दृश्याला सिमरनच्या वास्तविक भावुकपणाने खरोखरीच वेगळे बनवले. आपल्या प्रेमासाठी उभ्या असलेल्या स्त्री चा असहाय्यपणा, क्रोध आणि अगतिकता दर्शवण्यासाठी सिमरनने आपल्या भावविश्वात खोल उडी मारली. हे भावनिक दृश्य केवळ एका टेकमध्ये चित्रीत करण्यात आले. अशा प्रकारच्या दृश्यासाठी ही दुर्मिळच गोष्ट आहे कारण अशा दृश्यांसाठी प्रचंड असुरक्षिततेची भावना आणि भावनिक खोलीची गरज भासते. अभिनयासाठी आपल्या मेथॉडिकल दृष्टीकोनासाठी मानल्या जाणाऱ्या सिमरनने एकांतात तयारी केली आणि आपल्या व्यक्तिरेखेच्या भावनिक द्वंद्वाला जाणून घेण्यासाठी स्वतःला एका खोलीत डांबून घेतले आणि ह्या दृश्याबद्दल खोलात जाऊन विचार केला.

सिमरन म्हणाली, ज्याक्षणी मी कथानक वाचले, मला ठाऊक होते की हे दृश्य आव्हानात्मक आणि तरीही खास असणार आहे. मला त्याचा केवळ अभिनय करायचा नव्हता. माझ्या व्यक्तिरेखेला काय वाटत असेल हे मला जाणून घ्यायचे होते. ते सोपे नव्हते. दृश्याचे चित्रीकरण करण्याआधी मी स्वतःला खोलीत डांबून घेतले, माझी स्क्रिप्ट वाचली, शांतपणे बसले आणि स्वतःला परिस्थितीचे गांभीर्य समजून घेऊ दिले. आपले ज्या व्यक्तीवर प्रेम आहे त्यावर अशा प्रकारचा भयंकर गुन्हा दाखल केल्यानंतर आपल्याला कसे वाटेल हे मी जाणून घेतले. त्या परिस्थितीवर आपले काहीच नियंत्रण असू शकत नाही. तेव्हाच भावनिकदृष्ट्या मला उध्वस्त झाल्यासारखे वाटले आणि मी त्या दृश्यामध्ये स्वतःला वाहून घेतले. मला आनंद आहे की टीमने केवळ एका टेकमध्ये ते दृश्य छान टिपले. एक कलाकार म्हणून अशा प्रकारचे क्षण तुमच्या मर्यादांची परीक्षा घेतात आणि तुम्हांला प्रचंड समाधानही प्रदान करतात.

सिमरनच्या जबरदस्त अभिनयाने जमाई नं.१ मध्ये सच्चाईचा आणखी एक स्तर आणला त्यामुळे ही मालिका प्रेक्षकांनी आता पाहायलाच हवी. आगामी भागांमध्ये हे पाहणे प्रेक्षकांसाठी रोचक ठरेल की नीलच्या नावावरील हा डाग पुसण्यासाठी रिद्धी कशी लढेल. सत्य उघडकीस आणण्यामध्ये ती यशस्वी होईल की सायली आणि कांचन (पापिया सेनगुप्ता) ह्या या जोडीमध्ये दरी निर्माण करण्यात यशस्वी होतील?

## शब्दकोडे क्रमांक २१३०



**आडवे शब्द :-**
१) शोभिवंत
५) हाडवैरी, फार जुना आणि मोठा शत्रू
९) चंद्र
१२) हात
१३) फाजील, बडबडी, लोचट स्त्री
१६) आत्तापर्यंत
१८) मृत्युदेवता
१९) सुटकेचा मार्ग
२१) नातेवाईक
२२) एक जुनी लेखणी प्रकार
२४) दादला
२६) समतल
२८) हाट, मंडई
३०) संन्यासाचे निवासस्थान
३१) शक्यता
३२) डोंगराचा तुटलेला उभा कडा
३४) प्रभात
३६) सातू
३७) अंत:करण
३८) मज्जाव
३९) सैन्याचा मुक्काम, बूड
४०) फिकीर, काळजी
४२) गोलमटोल
४५) हिंदुंचे दोन महानग्रंथ
४९) लापशी, क्षीर
५१) थाटमाट, छानदारपणा
५२) सवय, अभ्यास,
५३) देवाशी केलेला करार
५४) माफ
५५) चौक
५७) सैन्याचा मालपुरवठा
५९) शपथ
६०) फळांच्या रसाचे पेय
६२) स्वत:बद्दल कमीपणाची भावना
६५) घाण
६६) सरहद्द
६७) वर्ष, साल
६८) ठोकाठोकी, हाणामारी
७०) वजन
७२) नोकरी
७३) कावळा
७५) रविवासर
७६) मसाल्यातील एक पदार्थ
७७) कर्ज देणारा

**उभे शब्द :-**
१) प्रशाला
२) निकट
३) पालखी, मेणा
४) मालक
५) संगत
६) आगबोट
७) नोकर,
८) शत्रुत्व
१०) जनाबाई
११) खोडकर, दुष्ट, खट्याळ
१४) अति परिश्रमामुळे अंगातून येणारा घाम
१५) कहाणीतील ऐसपैस गाव
१६) छाती
१७) सनई, चौघडा वगैरे ठेवण्याची बंदिस्त जागा
१९) हार
२०) गंध
२१) शिक्षा
२३) पंकज
२५) पहिला ऋतू
२७) एकाग्र नजर
२८) किंचित वक्रता
२९) हस-या चेहऱ्याचा
३३) दरवेश, फकिरांचा एक पंथ
३५) मृत्यू, वेळ
३६) सामान
३८) अभिप्राय
४०) लोकनाट्य
४१) अंगावर येणारा काटा
४३) रत्न
४४) पद्धतशीर
४६) चर्चा
४७) निष्ठूर, भावना नसलेला
४८) भूदल
५०) राखणदार
५६) कर्णेंद्रिय
५८) युद्ध
५९) सारख्या वजनाचे
६०) बातमी
६१) मुस्लीमांचा एक सण
६३) एक ज्वालाग्रही खनिज पदार्थ
६४) भीती
६७) फुरसत
६९) मनुष्य
७१) सूर्याचे एक नाव
७३) आजच्या आधीचा दिवस
७४) चोरी करणारा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



## आज का अंदाज

शनिवार ७ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ६ | ९ | २ | ६ | ७ | ८ |
| १२० | ११२ | १२३ | १३५ | ११० | १५० | ११५ | १२५ |
| २५६ | २५७ | २२२ | ३८८ | २०० | ४५७ | २५० | २६० |
| ३४६ | ३५६ | ३३० | ४५० | ५७० | ५५६ | ५५७ | ४५७ |
| ३४ | ४२ | ६३ | ९३ | २१ | ६२ | ७३ | ८२ |
| ३६ | ४५ | ६५ | ९४ | २६ | ६३ | ७४ | ८४ |
| ३० | ४८ | ६८ | ९८ | २९ | ६० | ७० | ८० |

**७ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | ४१ | ६३ | ८३ |
| ३४ | ४६ | ६४ | ८५ |
| ३९ | ४० | ६८ | ८७ |


**अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ.व रि.), महसूल व वन विभाग, मुख्य इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**क्र.अपिल-२०२३/प्र.क्र.२९७/ज-८, प्र.क्र.३६४ (०८/२०२४/अवपु**

**अर्जदार :- मो. शकील वल्द मो. सुलेमान शा व इतर**

विरुध्द

**गैरअर्जदार :- उपसंचालक भूमी अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर व इतर**

दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ कलम २० नुसार पक्षकार पर्यायी मार्गाचे अवलंब गैरअर्जदार- **श्रीमती शाहीस्ता जवजे प्यारे साहेब, १) रा.पवन नगर कामठी कलमना रोड मस्जिद नागपूर २) रा. लाल शाळा जवळ, मेहबूबशा तकीया, मोमीनपूरा, नागपूर** उक्त नमूद पक्षकार सुनावणी वेळी हजर झाले नाही, नमूद पत्यावर राहत नसल्याने किंवा अपूर्ण पत्तामुळे नोटीस परत आली. म्हणून वर्तमान पत्राद्वारे सुनावनी नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

उक्त अपिल प्रकणात मुंबई मंत्रालय येथे नमूद अधिकारी यांचे कार्यालया मध्ये दिनांक २४/०६/२०२५ रोजी सुनावणी ठेवली आहे.ऊक्त नमूद पक्षकाराने सुनावेळी दस्तावेज (ओळखपत्र) सह उपस्थित राहवे.अन्यथा आपले काहीही मनने नाही असे समजून पुढील प्रक्रिया कार्यान्वित करण्यात येईल.याची नोद घ्यावी.

**(संतोष कुमार)**
**अप्पर मुख्य सचिव तथा वि.का.अ.**
**(अ.व.रि.)**


## राशीभविष्य

**मेष :** कार्यक्षेत्रात नवीन भागीदार मिळतील.वाहन खरेदी करण्याचीयोजनायशस्वीहोईल. आज कामाच्या ठिकाणी चढ-उतार येतील. कामाच्या ठिकाणी अनावश्यक वाद होऊ शकतात.

**वृषभ :** घाईघाईत पैसे गुंतवू नका. मालमत्तेशी संबंधित खरेदी-विक्रीसाठी तुम्हाला धावपळ करावी लागेल. महत्वाचं काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. आज तुम्हाला आरोग्याच्या किरकोळ समस्या सतावतील.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंददायी, फायदेशीर आणि प्रगतीशील असेल. कोणतेही महत्त्वाचे काम पूर्ण होईपर्यंत ते उघड करू नका. अन्यथा, काम बिघडू शकते. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या.

**कर्क :** तुम्हाला काही अनावश्यक कामासाठी प्रवास करावा लागू शकतो. मन इकडे-तिकडे भटकत राहील. स्वत:वर विश्वास ठेवा. आज तब्येत थोडी नरम असेल. आरोग्याशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

**सिंह :** व्यवसायात अनावश्यक अडथळ्यांमुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. आज बराच संघर्ष करावा लागेल. आज घराबाबत काही समस्या जाणवू शकते. आज आर्थिक बाबींमध्ये विचार करून निर्णय घ्या.

**कन्या :** आज तुम्हाला छान बातमी मिळू शकेल. नातेवाईक आणि जवळच्या मित्रांच्या मदतीने कामाच्या क्षेत्रातील अडचणी कमी होतील. समाजातील उच्चपदस्थ लोकांशी संपर्क वाढतील.

**तुळ :** कुटुंबात तणाव निर्माण होऊ शकतो. राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा भांडणे गंभीर वळण घेऊ शकतात. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील. तुमची दिनचर्या शिस्तबद्ध ठेवा.

**वृश्चिक :** तुमच्या कामाच्या पद्धतीत सकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न करा. निरुपयोगी वादात अडकू नका. तुम्हाला परीक्षा किंवा स्पर्धेशी संबंधित काम, अभ्यास करण्याची इच्छा होणार नाही.

**धनु :** आज वाहन सुविधा वाढतील. व्यवसायाचा विस्तार होईल. नोकरीचा शोध पूर्ण होईल. सरकारी प्रशासनाच्या मदतीने कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील.

**मकर :** तुमच्या खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा. आज तुमचे आरोग्य चांगले राहील. आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्या येण्याची शक्यता कमी असेल. खाण्यापिण्याच्या बाबतीत संयम बाळगा.

**कुंभ :** आज तुम्हाला जवळचा मित्र भेटू शकतो. कोणतेही प्रलंबित काम पूर्ण होऊ शकते. न्यायालयीन प्रकरणांमध्ये वेळेवर काम करा. तुरुंगात असलेल्या लोकांना तुरुंगातून सुटका मिळू शकते.

**मीन :** शारीरिक आरोग्याकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता असेल. आज तुम्हाला जुन्या कर्जातून दिलासा मिळेल. व्यवसायात उत्पन्न चांगले राहील. पैशाअभावी प्रलंबित काम पूर्ण होईल.

# अवैध गौण खनिज वाहतूक करणारे २ ट्रॅक्टर जप्त



■ महासागर प्रतिनिधी,

**पातूर , दि. ६ :** तालुक्यात अवैध गौण खनिजांची विना रॉयल्टी वाहतूक दिवसेंदिवस वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने निर्णायक कारवाई करत दोन ट्रॅक्टर जप्त केली आहेत.

५ जून २०२५ रोजी रात्रीच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या पिंपळ डोळी फाट्यानजीक वन विभागाच्या विश्रामगृहासमोर दोन ट्रॅक्टर अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पातुर तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार बळीरामजी चव्हाण यांनी तत्काळ कारवाई करत आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्या पथकात तलाठी शरद जामोदकर, वाहन चालक मुजाहिद खान यांचा समावेश होता. कारवाईदरम्यान ट्रॅक्टर क्रमांक (एमएच ३०-ए.झेड.-९४०४) आणि (एमएच ३० बी.बी. ५४०४) यांना थांबवून वाहनांमध्ये असलेल्या गौण खनिजाची रॉयल्टी विचारली असता, संबंधित चालकांकडे कोणतेही रॉयल्टी दस्तऐवज नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे दोन्ही ट्रॅक्टर तात्काळ जप्त करून चान्नी पोलिस स्टेशनमध्ये जमा करण्यात आले आहेत.मागील काही दिवसांपासून महसूल विभागाची कारवाई काहीशी थंडावल्यामुळे तालुक्यात विना रॉयल्टी गौण खनिज वाहतुकीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली होती. मात्र, सदर घटनेनंतर महसूल प्रशासनाने पुन्हा एकदा कडक पावले उचलण्यास सुरुवात केल्याचे स्पष्ट झाले आहे.या कारवाईमुळे महसूल विभागाच्या भूमिकेला बळ मिळाले असून, खनिज माफियांना धडकी भरली आहे.

पुढील काही दिवसांत अशा प्रकारच्या आणखी कारवाया होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले आहे.

## गोवंश तस्करी रोखण्यासाठी जिल्ह्याच्या सीमेवर नाकाबंदी

अमरावती : बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कडेकोट बंदोबस्त नेमला आहे. या दरम्यान मध्यप्रदेशातून गोवंश तस्करी होऊ नये किंवा झाल्यास रोखता यावी, यासाठी महाराष्ट्र मध्यप्रदेश सीमेवर तब्बल आठ ठिकाणी नाकाबंदी सुरू केली आहे. ग्रामीण पोलिसांनी शेंदुरजना घाट पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन ठिकाणी तसेच परतवाडा, चिखलदरा, धारणी, ब्राह्मणवाडा थडी ठाण्याच्या हद्दीत प्रत्येकी एक व अन्य दोन ठिकाणी अशा एकूण आठ ठिकाणी चोविस तास पोलिसांची तैनाती ठेवली आहे. यापूर्वी अनेकदा जिल्ह्यात मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणात गोवंश जिल्ह्यात आणले जात असल्याचे पोलिसांच्याच कारवाईतून समोर आले होते. दरम्यान बकरी ईदच्या काळात गोवंश तस्करी होऊ नये, म्हणून ग्रामिण पोलिसांनी ही विशेष खबरदारी घेतली आहे. याव्यतिरिक्त प्रत्येक ठाण्याच्या हद्दीत शांतता समिती तसेच गोरक्षक यांच्या संयुक्त बैठका घेऊन पोलिसांना सहकार्य करण्याचे व समन्वय राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बकरी ईद दरम्यान सर्व नागरिकांकडून सामाजिक सलोखा, स्वच्छता राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. येणाऱ्या काळात सामाजिक एकोप्याचे वातावरण कायम ठेवून एकमेकांशी सौजन्यपूर्ण वागणूक ठेवावी, सोशल मीडियावर कोणत्याही प्रकारच्या खोट्या माहिती प्रसारित करू नये.

# जिल्ह्यामध्ये लवकरच तयार होणार 'मॉडेल सोलर व्हिलेज'

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती , दि. ६ :** विजेच्या बाबतीत स्वयंपूर्णता आणण्यासाठी जिल्ह्यातील एक गाव 'मॉडेल सोलर व्हिलेज' म्हणून तयार केले जाणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील ५ हजारहून अधिक लोकसंख्या असलेल्या गावांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या 'पी. एम. सूर्यघर मोफत वीज' योजनेंतर्गत महाऊर्जाकडून हे काम केले जाणार आहे. या योजनेसाठीचे प्रस्ताव महाउर्जाच्या विभागीय कार्यालयात स्वीकारले जातील. दरम्यान प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय निवड समिती पात्र गावांची अंतिमत: घोषणा करणार आहे. या घोषणेनंतर सर्व गावांना आपापसात स्पर्धा करावी लागेल. त्यासाठी कमाल ६ महिन्यांचा अवधी दिला जाणार आहे. स्पर्धा काळात जास्तीत जास्त अपारंपरिक ऊर्जा साधने किंवा सौर उपकरणे आस्थापित (इन्स्टॉल) करणे गरजेचे आहे. सौर उपकरणांमध्ये पी.एम.सुर्यघर योजनेंतर्गत जास्तीत जास्त घरांवर सोलर रुफ टॉप प्रकल्प उभारणी करणे तसेच पी.एम. कुसुम योजनेंतर्गत जास्तीत जास्त सौर पंप अथवा इतर विकेंद्रीत अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प आस्थापित करणे गरजेचे आहे.



अशाप्रकारे गावात सर्व अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांची क्षमता दहा मेगा वॅटपर्यंत असणे अपेक्षित आहे. याकरीता सी.एस.आर.निधी, विभाग किंवा जिल्हास्तरीय निधी व इतर उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करण्याची मुभा देण्यात आली आहे. याशिवाय अग्रणी बँकेमार्फत वैयक्तिक लाभार्थ्याला सौर प्रकल्प उभारणीकरीता बँकेच्या पात्रता निकषानुसार कर्ज उपलब्ध होऊ शकेल. पारंपरिक वीजेचे उत्पादन दिवसेंदिवस मर्यादित होत चालल्याने कोळसा आणि पाण्यापासून तयार होणाऱ्या वीज वापराला मर्यादा आल्या आहेत. परिणामी अपारंपरिक वीजेचा वापर वाढावा, यासाठी शासनाकडून प्रयत्न चालविले जात आहे. सदर स्पर्धा हा त्या प्रयत्नांचाच एक भाग आहे. दरम्यान गावाची निवड करण्यासाठी गठित समितीमध्ये जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या (डीआरडीए) प्रकल्प अधिकारी प्रिती देशमुख व जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बाळासाहेब बायस यांचा समावेश आहे. याशिवाय महाउर्जा चे विभागीय महाव्यवस्थापक प्रफुल्ल तायडे हे या समितीचे सदस्य सचिव आहेत. 'मॉडेल सोलर व्हिलेज' च्या स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक गावाचा अहवाल महाऊर्जा विभागातर्फे तयार केला जाणार आहे. त्या अहवालाच्या आधारे विजयी होणाऱ्या गावाला शासनातर्फे १ कोटी रुपयांचा पुरस्कार दिला जाणार आहे. या रकमेतून गावासाठी सामुदायिक सौर प्रकल्प, एनआरएलएम बचत गटांसाठी विविध सौर प्रकल्प, गावातील शासकीय ईमारतींचे सौर विद्युतीकरण, सौर आधारित पथदिवे व इतर प्रकल्प किंवा सौर कृषी पंपासाठी वापरता येईल. याशिवाय या गावातील बचत गट/प्राथमिक स्तरावरील सहकारी संस्था,डेअरी,मत्स्यो द्योग प्रकल्प आदी प्रकल्पासाठी ९०% अर्थसहाय्यही केले जाईल.

# वाळूसाठी सुरू असलेले बेमुदत उपोषण सुटले



■ महासागर प्रतिनिधी,

**मारेगाव, दि. ६ :** घरकुल लाभार्थ्यांना कोसारा घाटातुनच रेती मिळावी, यासाठी उपसरपंच सचिन पचारे यांनी वर्धा नदी पात्रातील कोसारा घाटात आमरण उपोषण सुरु केले होते. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी तहसीलदार उत्तम निलावाड तसेच आमदार संजय देरकर यांनी उपोषण मंडपाला भेट देऊन चर्चा केली. त्यानंतर उपोषण सोडण्यात आले.

महसुली क्षेत्रात येत असलेल्या वर्धा नदी वरील कोसारा घाटात रेती भरपुर प्रमाणात उपलब्ध असून वाळू साठी प्रसिद्ध आहे. हा घाट घरकुल लाभार्थ्यांसाठी सुरु करण्यात यावा या प्रमुख मागणी घेऊन हे उपोषण सुरु करण्यात आले होते. तसेच शासनाच्या मोफत रेती भोरणानुसार पाच ब्रास रेती कोसारा येथील घरकुल लाभार्थ्यांना देण्यात यावी, अशी सुध्दा मागणी करण्यात आली होती. मंगळवारला सायंकाळी ८.३० वाजता दरम्यान तहसिलदार उत्तम निलावाड यांनी उपोषण कर्त्यांची बाजु ऐकुण घेतली दरम्यान समाधान कारक तोडगा काढण्यात आला.तसेच अखील भारतीय सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष अविनाश लांबट, सचिव सुरेश लांडे, सराटीचे सरपंच तुळशीराम कुमरे, खैरगाव बुट्टीचे सरपंच रामचंद्र जवादे, बोरी गदाजी सरपंच प्रविण नान्ने उपसरपंच प्रशांत भंडारी, यांनी सुध्दा भेट दिली होती.

आमदार साहेबांच्या उपस्थितीमध्ये तहसीलदार यांनी आश्वासीत केले आणि संबंधित खणीकर्म जिल्हाधिकारी यांच्याशी फोनवरून संपर्क करून दिला, आम्ही कोसारा घाटाच्या बाजुला गोटाळी व पुष्पा येथील वाळू घरकुल लाभार्थ्यांना सुरू करून देणे असे आमदार साहेबांकडे आश्वासित केल्यानंतर मी उपोषण मागे घेतले, अशी प्रतिक्रीया उपसरपंच सचिन पगारे यांनी दिली. त्यामुळे आता हे आमरण उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# जिल्हा परिषद परिसरामध्ये 'एक पेड माँ के नाम' उपक्रम

## जागतिक पर्यावरण दिन उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती , दि. ६ :** जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आज, गुरुवारी जिल्हा परिषदेच्या वतीने 'एक पेड माँ के नाम' या संकल्पनेवर आधारित वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.



प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्या आईच्या सन्मानार्थ एक वृक्ष लावून पर्यावरण संवर्धनाबाबत सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यानिमित्ताने जिल्हा परिषदेच्या परिसरात अनेक झाडे लावण्यात आली. या वेळी जि.प.च्या अतिरिक्त सीइओ तथा डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, डेप्युटी सीईओ बालासाहेब बायस, मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) दिनेश ठाकरे, कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पुरुषोत्तम सोळंके, शिक्षणाधिकारी अरविंद मोहरे व प्रिया देशमुख, कृषि विकास अधिकारी मलप्पा तोडकर, प्रभारी डेप्युटी सीईओ सुनील गवई, संजय खारकर, अभियंता प्रमोद कराळे, पल्लवी मांडवगडे, प्रशासन अधिकारी नीलेश तालन, विजय कविटकर, गजानन पाचपोर, दिनेश तांबडे, सीइओंचे स्वीय सहायक ज्ञानेश्वर घाटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनासोबतच आईप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा अभिनव प्रयत्न जिल्हा परिषदेच्या वतीने सुरु करण्यात आला असून तो यापुढेही कायम केला जाणार आहे. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणार्थ भाकप सदैव तत्पर

## ॲड. सुभाष लांडे



■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती , दि. ६ :** भांडवलदारांच्या भक्कम पाठिंब्याने आणि आशीर्वादाने उभे ठाकलेले केंद्र सरकार सन २०१४ पासून त्यांच्याच विकासासाठी काम करीत आहे. त्यांना धनिक वर्गाचे भले करण्यासाठी सामान्य जनतेला समस्येच्या खाईत ढकलायचे आहे. या पार्श्वभूमीवर लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष सदैव तत्पर असेल, असे प्रतिपादन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे यांनी केले. भाकपच्या जिल्हा शाखेचे एक दिवसीय अधिवेशन येथील साईनगर स्थित माँ जिजाऊ सभागृहात झाले. या अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाकपचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य तुकाराम भस्मे होते. मंचावर आयटकचे राज्य सरचिटणीस कॉ श्याम काळे, राज्य कार्यकारणी सदस्य अशोक सोनारकर, जिल्हा सचिव सुनील मेटकर, कार्यालयीन सचिव जे.एम. कोठारी, प्रगतिशील लेखक संघाचे प्रा. प्रसेनजित तेलंग, डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे, विनोद जोशी, ॲड. क्रांती देशमुख, लता सोनारकर आदी मान्यवर उपस्थित होते. सुभाष लांडे पुढे म्हणाले, अमरावती जिल्ह्याचा पक्ष हा जुना जाणता व चळवळीचा पक्ष आहे. येथील कॉ. सुदाम काका देशमुख यांनी महाराष्ट्र विधानसभेत आमदार म्हणून व लोकसभेत खासदार म्हणून प्रतिनिधित्व केले आहे. एन डी मंगळे यांनी तिवसा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. . दरम्यान निवडणुकीच्या माध्यमातून पक्षाची शक्ती कमी दिसत असली तरी विचाराच्या आणि भूमिकेच्या धोरणाच्या बाबतीत आज पक्षाची प्रासंगिकता अधिक जास्त महत्त्वाची आहे, हेही त्यांनी स्पष्ट केले.. पंडित




जवाहरलाल नेहरू यांनी समाजवादाचा पुरस्कार करून अनेक कल्याणकारी निर्णय हे समाजवादी विचाराच्या प्रभावामुळे केले. तर मोदी सरकारने गेल्या तीन पंचवार्षिकमध्ये अनेक आश्वासने जनतेला दिली. पण त्यापैकी एकही आश्वासन पूर्णत्वास नेले नाही, याकडे लक्ष वेधून महाराष्ट्रामध्ये कधी नव्हे एवढी संविधानाची आणि नैतिकतेची पायमल्ली देवेंद्र फडणवीस सरकारने केली आहे, याचाही यावेळी इतर अतिथींनी उल्लेख केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील मेटकर यांनी केले. तुकाराम भस्मे म्हणाले, या ठिकाणी तीन पिढीतील कार्यकर्ते बसले आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्ष विज्ञानवादाचा, लोकशाहीचा, समाजवादाचा पुरस्कार करून वाटचाल करते ही फार मोठी देण आहे. कल्पनावादी विचारांना नाकारणे हेदेखील महत्वाचे आहे, असे सांगून देशात विविध प्रकल्पांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर धनसंपत्तीची लूट करून विशिष्ट लोकप्रतिनिधी व त्यांच्या साथीदारांना संपत्ती जमवण्यासाठी रान मोकळे करून दिले जात आहे. अदाणी अंबानीला जमिनी दिल्या जात आहे. मात्र आदिवासी आणि गायरानधारकांना जमिनीवरून हुसकावून लावले जात आहे,आदी मुद्देही तुकाराम भस्मे यांनी विस्ताराने मांडले.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **KHAN WAHID HAFIZ.** NOW MY NEW NAME IS **ABDUL WAHID.**
**ADD** : 107,SAMALOCHAN SOCIETY, KALAMANA ROAD WANJARA NAGPUR.

MY SELF **YASMEEN AAMIR UR RAHIM** WANTED TO CORRECT MY NAME FROM **YASMEEN** TO **YASMEEN** AND SURNAME IS **AAMIR UR RAHIM.**
**ADD** :BESIDE POONAM CHAMBER CHHINDWADA ROAD NAGPUR 440013 PASSPORT NO.**Z2820263**

MY OLD NAME WAS **KHAN HAFIZ.** NOW MY NEW NAME IS **ABDUL HAFEEZ.**
**ADD** : 107,SAMALOCHAN SOCIETY, KALAMANA ROAD WANJARA NAGPUR.

MY OLD NAME WAS **SHAKILA BANO MOHD BASHIR.** NOW MY NEW NAME IS **SHAKILA BEGAM MOHAMMAD SALAM SHEIKH.**
**ADD** : NAL SAHAB ROAD TIMKI KHAMBA NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **PRANAV-KUMAR SHUKLA.** NOW MY NEW NAME IS **PRANAV NAGENDRA SHUKLA.**
**ADD** : PLOT NO 05 SHRIRANG CO OPERATIVE SOCIETY SANGHARSH NAGAR JAITALA NAGPUR 440036. OLD PASSPORT NO: **N4229841**

MY OLD NAME WAS **ISHWAR-LAL GURWANI.** NOW MY NEW NAME IS **ISHWARDAS GURWANI.**
**ADD** : PLOT NO 25, NEAR GURU RAMDAS MANDIR, GURUNANAK NAGAR, JARIPATKA, NAGPUR 440014

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **M9867971**. MY OLD NAME WAS **NARAYANAN KUNIYIL VEEDU.** NOW MY NEW NAME IS **NARAYANAN VYANKAT-CHALAM KUNIYIL.**
**ADD** : SANT TUKDOJI WARD NR GAKWAD GURUJI HOUSE HINGANGHAT WARDHA 442301

MY OLD NAME WAS **GANE-SHKUMAR HARWANI.** NOW MY NEW NAME IS **GANESH HARWANI.**
**ADD** : NEAR GOPALRAO WANKHADE SCHOOL, RUKHMINI NAGAR, MORSHI, AMRAVATI 444905


# ग्रामीण रुग्णालयामध्ये 'तंबाखू नकार महिना'

**चांदूर रेल्वे ,दि. ६ :** राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या निर्देशानुसार येथील ग्रामीण रुग्णालयातर्फे 'तंबाखू नकार महिना' राबविण्यात आला. यानिमित्ताने तालुक्यातील वेगवेगळी कार्यालये, महाविद्यालये आणि इतर ठिकाणी जनजागरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत येथील ट्रायडंट कॉलेज ऑफ नर्सिंग, नगर परिषद कार्यालय, दत्त मंदिर तसेच परिसरात आयोजित करण्यात आलेले गुरुदेव सेवा मंडळाचे उन्हाळी शिबीर आदी ठिकाणी भेट देऊन तंबाखूला नकार देण्याची प्रतीज्ञा वदवून घेण्यात आली. शिवाय तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाला प्रतिबंध करणाऱ्या 'कोटापा' कायद्याची माहिती देण्यात येऊन याठिकाणी उपस्थित विद्यार्थी आणि नागरिकांची प्राथमिक मौखिक तपासणीही करण्यात आली.

या सर्व कार्यक्रमांदरम्यान ग्रामीण रुग्णालयातील एनसीडी विभागाच्या समुपदेशक पुर्ती लाखोडे यांनी तंबाखूचे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती पुरविली.

ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. नम्रता सोनवणे यांच्या नेतृत्वात हे सर्व कार्यक्रम घेण्यात आले.

# डीपी रस्त्यावरील अतिक्रमण हटवले नागरिकांचा कारवाईला विरोध

■ महासागर प्रतिनिधी,

**परतवाडा,दि. ६ :** २४ मीटर डीपी रोड मोकळा करण्याची नागरिकांची मागणी अचलपूर पालिका प्रशासनाने अखेर मुख्य रस्ता ते सिध्दार्थ हायस्कुलकडे जाणारा डिपी रोडवरील अतिक्रमण काढल्यामुळे आठवडी बाजारात राहणाऱ्या नागरीकांनी आक्रोश करत या कारवाईला विरोध दर्शविला होता. मात्र प्रशासनाने कायदेशीररित्या कारवाई केल्याचे म्हटले आहे. जयस्तंभ चौक ते बस स्टॅन्ड रस्त्यापासून सिध्दार्थ हायस्कुलकडे जाणारा २४ मी. डिपी रोड मोकळा करण्यात यावा, अशी मागणी गेल्या कित्येक वर्षापासुन नागरिकांकडून केल्या जात होती. या रस्त्यावर ३० ते ३५ वर्षापासून अतिक्रमण करून राहणाऱ्या नागरिकांना पालिका प्रशासनाने खिरणी बगीचा व बेगमपुरा येथे पर्यायी जागा दिली आहे. परंतु तरीसुध्दा येथील नागरिक तेथे जाण्याच्या मानसीकतेत नव्हते. अखेर पालिका प्रशासनाने नागरिकांना गेल्या तीन महिण्यापासुन नोटीस बजावत निश्चीत केलेल्या जागी जाण्यासाठी सुचना दिल्या. तरीसुध्दा नागरिकांचा प्रतीसाद न मिळाल्याने अखेर पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्यात आली. जवळपास २० ते २५ कुटूंब अतिक्रमण करून राहत होते. २४ मीटर रूंद व ३०० मीटर लांब अशा या रस्त्याच्या कामासाठी पालिकेने एजन्सी नेमलेली असून लवकरच या रस्त्याचे कामसुध्दा केल्या जाणार आहे. येथील नागरिकांनी अतिक्रमण काढत असताना पालिकेने आमच्या निवासा संदर्भात कुठलीच योग्य ती व्यवस्था न करता थेट अतिक्रमण काढल्यामुळे ऐन पावसाच्या दिवसात आम्हाला इतरत्र आसरा शोधावा लागणार आहे, असा प्रश्न उपस्थित केला. तर पालिकेने अतिक्रमण धारकांना न्याय मिळवून देण्यासाठी योग्य ती यादी करत खिरणी बगीचा व बेगमपुरा येथे प्लॉटची आखणी करून दिली, असे सांगितले. पण प्रत्यक्षात अशी कुठलीच कारवाई केली नाही, असे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या जागी पुन्हा वाद होण्याची शक्यता असुन पालिकेने योग्य ते नियोजन करावे अशी मागणी केल्या जात आहे. एकीकडे आठवडी बाजारातील अतिक्रमण धारकांनी ही कारवाई योग्य नसल्याचे म्हटले आहे तर सरस्वती नगर, पांडुरंगनगर, गोवर्धन विहार, लक्ष्मीनगर, गंगानगर या परिसरातील नागरीकांनी या कारवाईचे समर्थन केले आहे. हा डिपी रोड झाल्यानंतर रस्त्यावरील वाहतूकीचा दबाव कमी होऊन सर्व नागरिकांसाठी सुविधा निर्माण होणार आहेत.



# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सायकल रॅलीला प्रतिसाद

**बुलडाणा :** पर्यावरण वाढवणे आणि प्रदूषण रोखून पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. पर्यावरण मित्र मंडळाने बुलडाणा शहर व परिसरात जी पर्यावरण चळवळ सुरू केली आहे. ती आरोग्याच्या दृष्टीने महत्वाची आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त पोलिस अधीक्षक बाबुराव महामुनी यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने बुलडाणा येथे सायकल रॅलीला हिरवी झेंडी दाखवताना ते बोलत होते. ५ जून रोजी पर्यावरण मित्र मंडळाच्या वतीने सायकल रॅलीचे आयोजन केले होते. यावेळी वनविभाग बुलडाण्याचे वन परिक्षेत्र अधिकारी अभिजीत ठाकरे यांनी नागरिकांना 'आंब्याची कोय भविष्याची सोय' या उपक्रमांतर्गत आंब्याच्या कोयी व फळझाडांच्या बिया वन विभाग बुलडाणा येथे जमा कराव्यात, असे आवाहन करण्यात आले. सार्थक डांगे याने अस्वलाची वेशभूषा करून वन्यजीव वाचवण्यासाठी केलेले आवाहन लक्ष वेधून घेत होते. राणी बगीच्या येथे वृक्षारोपण करून रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीत चंद्रकांत काटकर, मुकुंद जोशी, अनु माकोने, मुकुंद वैष्णव, प्रदीप डांगे,नीलेश शिंदे, दीपक पाटील, जीवन जाधव, निर्मल पंजाबी, मोंटी पंजाबी, शैलेश खेडेकर, जयंत दलाल, अनुप सोनोने, गायत्री सावजी, संगीता पंजाबी, रश्मी पंजाबी, सार्थक डांगे, प्रीती डांगे, विधी राठी उपस्थित होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# बालांगण





## हा आहे दोन्हीतला फरक

रस्त्यावरून प्रवास करताना आपल्याला फ्लायओव्हर आणि ओव्हरब्रिज असे शब्द अनेकदा ऐकायला मिळतात. बऱ्याच वेळा आपण हे दोन शब्द एकच समजतो आणि फरक न जाणून घेता त्यांचा वापर करतो. पण तुम्हाला माहिती आहे का की, उड्डाणपूल आणि ओव्हरब्रिज या शब्दांचा अर्थ वेगवेगळा असून वेगवेगळ्या गरजांनुसार ते बांधले जातात? चला, आज याविषयी जाणून घेऊ या.

*** उड्डाणपूल म्हणजे काय?**

उड्डाणपूल हा एक प्रकारचा पूल असून तो रस्ते किंवा रेल्वे रुळांवर बांधला जातो. त्याचा मुख्य उद्देश कोणत्याही अडथळ्याशिवाय वाहतूक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे हा असतो. वर्दळीच्या चौकातून बरीच वाहने येत-जात राहतात. अशावेळी उड्डाणपूल बांधला तर काही वाहने खाली रस्त्यावरुन धावतात आणि काही वाहने उड्डाणपूलावरून जातात. यामुळे चौकात वाहतूक कोंडीची समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होते. उड्डाणपूल सहसा लांब पल्ल्याच्या वाहतुकीसाठी बांधले जातात. ते शहरांमध्ये किंवा बाहेरील भागात असू शकतात. वाहने जलद आणि सुरक्षितपणे जाऊ शकतील, अशाप्रकारे त्याची रचना केली जाते.

**महत्त्वाचे काही...**

*** ओव्हरब्रिज म्हणजे काय?**

ओव्हरब्रिज हा देखील एक प्रकारचा पूलच आहे, परंतु त्याचे मुख्य काम पादचाऱ्यांना किंवा कमी वेगाने जाणाऱ्या वाहनांना रस्ता किंवा रेल्वे मार्गावरून मार्ग उपलब्ध करून देणे हे असते. तुम्ही अनेकदा रेल्वे स्थानकांजवळ पादचाऱ्यांसाठी बांधलेले पूल पाहिले असतील. ते ओव्हरब्रिज असतात.

ओव्हरब्रिजचा उद्देश सुरक्षितता सुनिश्चित करणे हा असतो. हे पूल वर्दळीचे रस्ते किंवा धोकादायक रेल्वे रुळ ओलांडण्याचे टाळण्यासाठी कामी येतात. ओव्हरब्रिज सामान्यतः उड्डाणपुलांपेक्षा लहान असतात आणि पादचाऱ्यांना आणि सायकलस्वारांना सामावून घेण्यासाठी डिझाइन केलेले असतात.

## ताप आलाय?

मित्रांनो, वातावरणातल्या बदलांमुळे विविध आजार डोकं वर काढतात. या दिवसात तर फ्लूच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होते. फ्लू म्हणजे नेमकं काय हे जाणून घेऊया. इन्फ्लूएंझाला 'फ्लू' असं म्हटलं जातं. ताप, थंडी, खोकला, अंगदुखी, डोकेदुखी अशी याची लक्षणं असतात. इन्फ्लूएंझा विषाणूमुळे या विकाराची लागण होते. या फ्लूविरोधात लस उपलब्ध आहे. सहा महिन्यांपेक्षा जास्त वयाचे कोणीही ही लस घेऊ शकतात. रोगप्रतिकारक्षमता कमी असल्याने लहान मुलांना हा विकार होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे तुम्हा मुलांनी ही लस टोचून घ्यायला हवी. नऊ वर्षांपेक्षा मोठ्या मुलांना एकदा दिलेली लस पुरते पण त्यापेक्षा लहान मुलांना दोनदा लस द्यावी लागते. पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना फ्लू होण्याची शक्यता सर्वात जास्त असते. तसंच मधुमेह, अस्थमा किंवा इतर गंभीर आजार असलेल्या मुलांना फ्लू होऊ शकतो.

फ्लू हा साथीचा आजार आहे. हा विषाणू हवेच्या माध्यमातून पसरतो. फ्लू झालेल्या व्यक्तीच्या शिंकण्यातून किंवा खोकल्यातून हा विषाणू हवेत पसरतो आणि श्वासावाटे निरोगी व्यक्तीच्या शरीरात प्रवेश करतो. त्यामुळे खोकल्यानंतर किंवा शिंकल्यानंतर हात स्वच्छ धुवून घ्यायला हवेत.



**आरोग्य जपा**

पण फ्लू झाला तरी काळजी करायचं कारण नाही. औषधोपचार आणि थोड्या विश्रांतीनंतर तुम्ही बरे होता. फ्लूचं निदान झालं तर डॉक्टरांनी दिलेली औषधं वेळेवर घ्या. आराम करा. भरपूर पाणी प्या. ताजी फळं आणि हिरव्या भाज्या खा. फारच बरं वाटत नसेल, श्वास घ्यायला त्रास होत असेल तर आई-बाबांना सांगा.

## पोटात कावळे का ओरडतात?



छोट्या दोस्तांनो, कधीकधी अचानक तुमच्या पोटातून आवाज येता का? पोटात गुडगुड वाजते का? थोडक्यात पोटात कावळे ओरडतात का? खरंतर सगळ्यांनाच कधी ना कधी हा अनुभव येत असतो. म्हणूनच यामागील कारण आज जाणून घेऊ या.

मुलांनो, पोटातून येणारा हा आवाज भूक लागल्याचे लक्षण आहे. पोट रिकामे असते तेव्हा स्नायू आकुंचन पावतात. यामुळे आतील वायू आणि पचन द्रव बाहेर काढता येतो. स्नायूंच्या या हालचालीमुळे पोटातून आवाज येतो. या प्रक्रियेला 'पेरिस्टॅलिसिस' म्हणतात. ही हालचाल नेहमीच सुरू असली तरी पोट रिकामे असताना आवाज अधिक मोठा येतो. रिकाम्या पोटी स्नायू आकुंचन पावतात तेव्हा या हालचालीमुळे निर्माण होणारा आवाज मोठ्याने बाहेर येतो. यामध्ये भूक लागण्याचे संप्रेरक 'घ्रेलिन' देखील भूमिका बजावते. घ्रेलिन भूकेचा हार्मोन असून तो शरीराला अन्नाची गरज असल्याचे संकेत देतो.

**हे होते कशामुळे?**

स्वाभाविकच पोट रिकामे होताच या हार्मोनची पातळी वाढते. यामुळे पोटाचे स्नायू जलद आकुंचन पावतात. म्हणूनच गुरगुरण्याचा आवाज अधिक मोठा होतो.

हा आवाज कमी करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे काहीतरी खाणे. खाल्ल्याने हा आवाज ताबडतोब कमी होतो. अर्थात पोटाच्या स्नायूंची हालचाल सुरूच राहते.

## संवाद वाढवा, मैत्र जोडा



छोट्या मित्रांनो, अनेकांना नवीन व्यक्तीशी बोलताना थोडेसे घाबरायला होते. आजूबाजूला कोणी अनोळखी असेल तर अस्वस्थ वाटते आणि संभाषण सुरू करण्यास अडचण येते. तुम्हालाही असे होते का? होत असेल तरी घाबरु नका. ही एक सामान्य समस्या आहे आणि काही सोप्या टिप्सच्या मदतीने तुम्ही हा संकोच दूर करू शकता. चला जाणून घेऊ या.

मुलांनो, गोड हास्य हा कोणाशीही संभाषण सुरू करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. तुम्ही एखाद्या अनोळखी व्यक्तीकडे बघून हसता तेव्हा मैत्रीपूर्ण असल्याचे दाखवता. तुम्ही त्यांच्याकडे लक्ष देत आहात आणि तुम्हाला त्यांच्याशी बोलायचे आहे, हे या कृतीतून तुम्ही दाखवता आणि संभाषण सुकर होते.

तुम्ही छोटासा प्रश्न विचारूनही सहजपणे संभाषण सुरु करू शकता. प्रश्न विचारल्याने समोरच्या व्यक्तीला बोलावेसे वाटते आणि तुम ची भीतीही कमी होते. तुम्हाला चांगले बोलायचे असेल तर आधी चांगले ऐकले पाहिजे. म्हणूनच कोणी तुमच्याशी बोलत असेल तर ते काय म्हणत आहेत याकडे लक्ष द्या. संबंधित प्रश्न विचारा. यावरून या व्यक्तीला आपल्या बोलण्यात खरोखर रस आहे आणि तुम्ही ते महत्त्वाचे मानता, असे समोरच्या व्यक्तीला कळते. लक्षपूर्वक ऐकल्याने संभाषण सुरू राहते आणि मैत्री वाढते.

**कसे वागावे?**

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आत्मविश्वासाचा तुमच्या संभाषणावर खूप मोठा प्रभाव पडतो. त्यामुळेच थोडे घाबरले असाल तरी आनंदी दिसण्याचा प्रयत्न करा आणि तुमचा स्वतः वर विश्वास आहे हे दाखवा. सरळ उभे राहा, स्पष्ट बोला. आवाज उत्साही ठेवा. लक्षात ठेवा, प्रत्येकजण कधी ना कधी अनोळखी असतो आणि बहुतेक लोकांना नवीन लोकांना भेटणे आणि त्यांच्याशी बोलणे आवडते. तेव्हा तुम्हीही मैत्रीसाठी हात पुढे करा.

## गुणकारी अंजीर



मुलांनो, खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि अयोग्य जीवनशैलीमुळे अनेकजण अनेक प्रकारच्या आजारांना बळी पडतात. आजार जडल्यास डॉक्टरांकडे जावे लागते. औषधे घ्यावी लागतात. हे टाळण्यासाठी तुम्ही आत्तापासून आहाराकडे लक्ष द्यायला हवे. निरोगी राहण्यासाठी तुम्ही सुका मेवा खायला हवा.

तुमच्यापैकी अनेकांना तो आवडतही असेल.

मुलांनो, सुकामेवा खाण्याचे बरेच लाभ मिळतात. पण तुम्हाला माहिती आहे का, की एक असेही ड्रायफ्रूट आहे हे भिजवलेले पाणी प्याल्यास अनेक समस्यांपासून मुक्तता मिळू शकते. हो, आपण अंजीरांबद्दल बोलत आहोत. अंजीरमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, कॅल्शियम, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन के, फायबर, प्रथिने, जस्त आणि लोह यासह अनेक पोषक घटक आढळतात. म्हणूनच अंजीर पाण्यात भिजवून ते पाणी पिल्यास शरीराला अनेक महत्त्वपूर्ण घटक मिळतात.

**माहिती आहे?**

अंजीरचे पाणी पिल्याने पचनसंस्था चांगली कार्य करते. यामुळे अन्न सहज पचते. हे पाणी डिटॉक्स ड्रिंकसारखे काम करते. दररोज सकाळी रिकाम्या पोटी अंजीर भिजवलेले पाणी प्यायल्याने दिवसभर ऊर्जावान वाटू शकते. त्यात नैसर्गिक साखर असल्यामुळे विशेष लाभ होतो.

## घरीच बनवा फळांची बास्केट



छोट्या दोस्तांनो, फळांची बास्केट तुम्ही घरीही बनवू शकता. कल्पकतेचा वापर करून फळांची ही बास्केट सजवता येईल. आज संत्र्यांची बास्केट कशी बनवायची हे शिकू या. साहित्य: मोठ्या आकाराचा कागद, केशरी रंगाचे कागद, केशरी पुठ्ठे (वेगवेगळ्या रंगांचे आणि डिझाईनचे केशरी कागद घ्या.), लाल कागद, गम, स्टिकर तसंच सजावटीच्या इतर वस्तू

कृती: कप किंवा छोट्या प्लेटचा वापर करून केशरी कागदांवर गोल आकार काढा. हे गोल कापून घ्या. तुमच्याकडच्या लाल कागदाचा वापर करून बास्केट किंवा बाउलचा आकार कापून घ्या. बास्केटला तुम्ही आवडीचा आकार देऊ शकता. लाल कागदाचा बाऊल मोठ्या कागदावर चिकटवा. आता लाल बाऊलच्या वरच्या भागावर केशरी गोल चिकटवा. हे केशरी गोल म्हणजे संत्री आहेत. बाऊलमध्ये संत्री ठेवली आहेत असं वाटायला हवं, मित्रांनो. बाऊल सजवण्यासाठी स्टीकर्स किंवा इतर वस्तूंचा वापर करता येईल. याच प्रकारे तुम्ही वेगवेगळ्या फळांचे आकार कापून टोपली सजवू शकता.

**कार्यानुभव**

## पर्यावरण रक्षणासाठी...

छोट्या दोस्तांनो, बांधकाम करण्यासाठी विटा लागतात. पण सिमेंट-काँक्रिटच्या विटांमुळे पर्यावरणाचं नुकसान होऊ शकतं. म्हणूनच आता पर्यावरणपूरक म्हणजे इको-फ्रेंडली विटा तयार करण्यात आल्या आहेत. 'इंडियन स्कूल ऑफ डिझाइन अँड इनोव्हेशन'मधल्या शास्त्रज्ञांनी बरंच संशोधन करून या विटा तयार केल्या आहेत. या विटा तयार करण्यासाठी माती, सिमेंट, चारकोल आणि ऑरगॅनिक लुफ्फा फायबरचा वापर करण्यात आला आहे. या विटांमध्ये सिमेंट असलं तरी काँक्रिटच्या विटांच्या तुलनेत त्याचं प्रमाण बरंच कमी आहे. 'ग्रीन चारकोल ब्रिक्स' असं नाव या विटांना देण्यात आलं आहे. या विटांमध्ये हवा खेळती रहाण्यासाठी छोट्या पोकळ्या तयार करण्यात आल्या आहेत. या पोकळ्या पाण्याच्या टाकीप्रमाणे काम करतात. या पोकळ्यांमुळे विटांमध्ये पाणी साठून रहातं आणि विटांचं तापमान कमी होतं. यामुळे घरात थंडावा जाणवतो. विटांच्या पृष्ठभागावर थोड्या प्रमाणात चारकोलचा वापर करण्यात आला आहे. हे चारकोल हवेतलं नायट्रेट शोषून घेऊन हवा शुद्ध करतं.



**माहिती आहे?**

या विटा खूप हलक्या आहेत. तसंच त्या अगदी पटकन नष्टही होऊ शकतात. त्यामुळे बांधकामासाठी या विटांचा वापर होणं गरजेचं आहे. वातावरणात कार्बन डाय ऑक्साइडचं प्रमाण वाढत चाललं आहे. यामुळे जागतिक तापमानवाढीची समस्या निर्माण होते. सिमेंटमुळे कार्बनच्या उत्सर्जनात वाढ झाली आहे. सध्याच्या काळात प्रत्येकानेच पर्यावरणाचं रक्षण करणं गरजेचं आहे.




## गावाची गोडी वाढवा



मित्रांनो, 'गावाकडे चला' असं गांधीजी म्हणाले होते. गावाला गेल्यावर किती बरं वाटतं. गावात फार गर्दी नसते, प्रदूषण नसतं. गावातली नदी, हिरवळ, शेणाने सारवलेलं घर, शेती हे सगळं हवंहवंसं वाटतं. काही दिवस गावाला जाऊन आल्यावर कसं ताजंतवानं वाटतं. गावच्या हवेत ही जादू असते मित्रांनो. भारताच्या ग्रामीण भागात बरंच काही घडत असतं. इथलं वातावरण, जगणं सगळंच वेगळं असतं. शहरातल्या जीवनासारखी धामधूम इथे नसते. या सगळ्याचा अभ्यास करून तुम्ही करीअर घडवू शकता. 'बॅचलर ऑफ रूरल स्टडीज' हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही ग्रामीण जीवनाकडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघू शकता.


या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातलं जीवन तुम्हाला अगदी जवळून पाहता येईल. विकासकामांमध्ये सहभागी होता येईल. भारताच्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास होणं गरजेचं आहे. यात तुमचा हातभार लागू शकतो. शेती, सामाजिक विकास, पशुपालन, जंगलांचा विकास, पर्यावरणाचं व्यवस्थापन अशा विविध आघाड्यांवर तुम्ही काम करू शकता. ग्रामीण भागाशी संबंधित विविध विषयांचा या अभ्यासक्रमात समावेश असतो. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या विविध संधी उपलब्ध होतात. सरकारी, खाजगी तसंच सार्वजनिक क्षेत्रात तुम्ही काम करू शकता.

**कोण होणार?**

**ठिपके जुळवा**



### स्मार्ट टिप्स



#### अशी थांबवा उचकी

दोस्तांनो, उचकी लागली की खूप अस्वस्थ वाटतं. उचकी लागल्यावर आपण घटाघट पाणी पितो. आपल्याला वर बघायला सांगितलं जातं. उचकी थांबवण्यासाठी काही घरगुती उपायही करता येतील. उचकी लागल्यावर साखर खा. पाण्यात थोडं मीठ घालून प्या. घोट घोट पाणी प्या. हळूहळू श्वास घ्या. यामुळे बरं वाटेल.

### खादाडी

#### चविष्ट पिटा पिझ्झा



मित्रांनो, पिझ्झा खायला कोणाला आवडत नाही? तुम्ही घरच्या घरी मस्त पिझ्झा बनवू शकता. यासाठी पिटा ब्रेड, स्पॅगेटी सॉस आणि मोझरेला चीज असं साहित्य लागेल. सर्वात आधी पिटा ब्रेड घ्या. त्यावर स्पॅगेटी सॉस पसरवा. थोडं चीज सॉसच्या वर पसरवा. आता हा ब्रेड ओव्हनमध्ये ठेवा. मिनिटभर बेक करा आणि खा. संध्याकाळी काय खायचं असा प्रश्न पडत असेल तर पिटा पिझ्झा हा स्मार्ट ऑप्शन आहे.

### दोस्त हे मस्त



#### असा आहे ॲनाकोंडा

ॲनाकोंडा हा साप असून तो ॲमेझॉनच्या जंगलात आढळतो. ग्रीन ॲनाकोंडा हा जगातला सर्वात मोठा साप आहे. त्याची लांबी जवळपास २० फूट असते. तसंच हा सर्वात वजनदार साप आहे. तो दक्षिण अमेरिकेत आढळतो.

### वाचा तर खरं

#### वाढतायंत चक्रीवादळं



दोस्तांनो, जगभरातच अनेक वादळं येत असतात. १९७० मध्ये पूर्व पाकिस्तान म्हणजे आजच्या बांग्लादेशमध्ये 'भोला' नावाचं वादळ आलं होतं. या वादळाने बरंच नुकसान केलं होतं. १९९१ मध्ये बांग्लादेशमध्ये 'मेरियन' नावाचं वादळ आलं होतं. १९७४ च्या 'नीना' या वादळानेही कहर केला होता. अशा नैसर्गिक आपत्ती कमी करण्यासाठी आपण पर्यावरणाचा विचार करायला हवा.

# लाडकी बहीण योजनेवर शिंदे गटाच्या आमदाराची टीका



■ **वृत्तसंस्था, रायगड, दि. ६ :**
महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी योजना म्हणजे लाडकी बहीण योजना. या योजनेवर विरोधकांनी टीका केलीच आहे, परंतु आता शिंदे गटाच्याच आमदाराने घरचा आहेर दिला आहे.

शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी लाडकी बहीण योजनेवर टीका केली आहे. लोकांवर असा कोट्यवधींचा निधी उधळण्यापेक्षा ते पैसे गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी खर्च करा, असा सल्ला गायकवाड यांनी दिला आहे.

रायगड येथे माध्यमांशी बोलताना संजय गायकवाड म्हणाले, ३५२ व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा साक्षीदार होण्यासाठी मी या ठिकाणी आलो आहे. शिवरायांची भक्ती आणि कीर्ती ही ओसांडून वाहत आहेत.

राजेंची कीर्ती जगात पसरलेली आहे. रायरीचा डोंगर राजेंनी किल्ले रायगडसाठी निवडला. या ठिकाणी ३५० इमारती असलेला किल्ला कमी कालावधीत उभारला गेला. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज यांना जर का दीर्घायुष्य लाभले असते तर देशात निजाम मुघल, पोतुर्गीज, कुतुबशाह हे कोणीच शिल्लक राहिले नसते. मराठ्यांनी पराक्रम करून संपूर्ण भारतभूमी मोघलरहीत केली.

पुढे बोलताना संजय गायकवाड यांनी किल्ल्यांवर येणाऱ्या तरुणांना सल्ला देताना म्हणाले, खऱ्या शिवभक्तांना शिस्त सांगण्याची गरज नाही. गड किल्ल्यांवर आपल्या प्रेमिकेचे नाव आणि इतर विटंबना करणाऱ्या तरुणांनी तसे करू नये. गडकिल्ल्यांचे पुनर्वैभव प्राप्त होणे गरजेचे आहे. कोट्यवधीच्या योजना लोकांवर उधळण्यापेक्षा तेच पैसे राजांच्या गडकिल्ला संवर्धनासाठी वापरा, असा सल्ला देत त्यांनी अप्रत्यक्ष लाडकी बहीण योजनेवरच टीका केली आहे.

# मूळ धर्मात येऊ इच्छितात त्यांना आणले पाहिजे



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी पुन्हा एकदा धर्मांतरावर भाष्य केले आहे. धर्मांतर ही हिंसा आहे. जर ते स्वेच्छेने केले गेले तर काही हरकत नाही, परंतु आम्ही दबाव आणण्याच्या विरोधात असल्याचे ते म्हणाले. जे आपल्या मूळ धर्मात येऊ इच्छितात त्यांना आणले पाहिजे, असे देखील त्यांनी सांगितले.

नागपूरमध्ये आरएसएस स्वयंसेवकांसाठी कार्यकर्ता विकास वर्गाच्या समारोप समारंभाला संबोधित करताना मोहन भागवत यांनी समाजात एकतेचा संदेशही दिला. जबरदस्तीने धर्मांतर करण्याविरुद्ध बोलताना मोहन भागवत म्हणाले की, 'धर्मांतर ही हिंसा आहे. जेव्हा ते स्वेच्छेने केले जाते तेव्हा आम्ही त्याच्या विरोधात नाही. पण आम्ही लोभ, जबरदस्तीने धर्मांतर आणि दबाव देण्याच्या विरोधात आहोत. लोकांना त्यांचे पूर्वज चुकीचे होते हे सांगणे हा त्यांचा अपमान आहे. आम्ही अशा प्रथांच्या विरोधात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या वेळी भागवत यांनी पहलगाम हल्ल्यावर आणि त्यानंतर केलेल्या कारवाई वरही आपले मत मांडले. मोहन भागवत म्हणाले की, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर राजकीय वर्गात दिसणारा परस्पर समंजसपणा आणि त्यानंतर भारताने केलेल्या कारवाईचा प्रभाव कायम राहिला पाहिजे आणि तो कायमचा राहिला पाहिजे.

त्यांनी ऑपरेशन सिंदूरचा अप्रत्यक्ष उल्लेख केला आणि सांगितले की, २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये पर्यटकांच्या हत्येनंतर लोक संतप्त झाले होते आणि दोषींना शिक्षा व्हावी अशी त्यांची इच्छा होती. यात कारवाई देखील झाली. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी तळांना लक्ष्य केले होते. त्यानंतर, प्रत्युत्तर म्हणून शेजारच्या देशातील हवाई तळांचे नुकसान झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आदिवासी नेते आणि माजी केंद्रीय मंत्री अरविंद नेताम यांचा उल्लेख करून मोहन भागवत म्हणाले, 'आम्ही तुमच्यासोबत आहोत (धर्मांतराच्या विरोधात लढाईत).' मोहन भागवत यांनी पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान लष्करी संघषार्चा उल्लेख केला आणि अधोरेखित केले की पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केलेल्या कारवाईत, देशासाठी निर्णय घेणाऱ्यांचे धाडस सर्वांना दिसले.

ते म्हणाले, 'पहलगाममधील भयंकर दहशतवादी हल्ल्यानंतर कारवाई करण्यात आली. त्यातून पुन्हा एकदा आपल्या सैन्याचे शौर्य दिसून आले. प्रशासनाची खंबीरताही दिसून आली. राजकीय वर्गानेही परस्पर समजूतदारपणा दाखवला. समाजानेही एकतेचा संदेश दिला. हे चालू राहिले पाहिजे आणि कायम राहिले पाहिजे.' ते म्हणाले की भारताने आपल्या सुरक्षेच्या बाबतीत स्वावलंबी असले पाहिजे. संघ प्रमुखांनी सुरक्षेच्या बाबतीत भारताने स्वावलंबी असले पाहिजे यावर भर दिला.

पाकिस्तानचे नाव न घेता मोहन भागवत म्हणाले, 'जे भारताशी थेट युद्ध जिंकू शकत नाहीत, ते हजारो जखमा करून आणि प्रॉक्सी वॉर करून आपल्या देशात रक्तपात करू इच्छितात.' दुसऱ्या महायुद्धादरम्यान, हिटलरने जवळजवळ एक महिना लंडनवर बॉम्बहल्ला केला, या आशेने की ब्रिटन शरणागती पत्करेल. प्रत्युत्तरादाखल, पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी राष्ट्राला संबोधित केले आणि नंतर संसदेत सांगितले की ब्रिटिश 'समुद्र आणि किना?यावर' लढतील. या प्रकरणाचा संदर्भ देत भागवत म्हणाले की चर्चिल म्हणाले होते की, समाज हा खरा सिंह आहे आणि त्यांनी फक्त त्याच्या वतीने गर्जना केली होती.

**आपली मुळे एकतेत**

एका व्यक्तीचा फायदा कधीकधी दुसऱ्यासाठी हानिकारक असू शकतो आणि व्यक्तींमधील परस्पर समजुतीचा अभाव असंतोष निर्माण करू शकतो. त्यांनी अधोरेखित केले की राष्ट्रीय हितासाठी, कोणताही गट किंवा वर्ग दुसऱ्याशी संघर्ष करू नये. आवेग पूर्णपणे वागणे, अनावश्यक वादविवादात अडकणे किंवा कायदा हातात घेणे हे राष्ट्रीय हिताचे नाही. आरएसएस प्रमुखांनी त्या काळाची आठवण करून दिली जेव्हा भारत स्वतंत्र नव्हता, तेव्हा (ब्रिटिश) राज्यकर्ते फूट पाडत होते आणि विघटनकारी घटकांना पाठिंबा देत होते, ज्यामुळे सामान्य लोकांना लढण्यास भाग पाडले जात होते. तथापि, ते म्हणाले की आज सरकार संविधानानुसार काम करते.

# दोन अल्पवयीन मुलींवर एकाच दिवशी अत्याचार

■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ६ :**
जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील पोलीस स्टेशन अड्याळ हद्दीतील दोन वेगवेगळ्या गावामध्ये दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या घटना घडल्या.

अड्याळ पोलिस स्टेशन हद्दीतील दोन गावात गुरुवारी एकाच दिवशी दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या घटनांचे गुन्हे दाखल करण्यात आले असून दोन्ही घटनेतील आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पहिल्या घटनेत, मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असतानाही तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्याशी तीन ते चार वेळा कुकृत्य करण्यात आल्याची तक्रार आहे. यामुळे ती गरोदर राहिल्याने तिच्या तक्रारीवरून अभय विलास धुर्वे (२१) याच्याविरुद्ध गुन्ह दाखल करून अटक करण्यात आली.

दुसऱ्या घटनेत ७ वर्षीय मुलीवर बळजबरीने लगतच्या शेतात नेऊन अत्याचार केल्याची घटना घडली. ५ जूनला सायंकाळी ही बालिका आपल्या घरी खेळत असताना ७:२० वाजताच्या दरम्यान, आरोपीने तिचे तोंड दाबून लगतच्या वाडीत नेले. तिथे अत्याचार केला. काही वेळाने बालिका रडत घरी आल्यावर आईला प्रकार कळला.

आईच्या तक्रारीवरून गणेश ज्ञानेश्वर गोटेफोडे (३०) याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. पुढील तपास सुरू असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी मनोज शिडाम यांनी दिली.

# शालार्थ आयडी घोटाळ्याची प्रशासकीय चौकशी होणार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
राज्यात सध्या गाजत असलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्याची प्रशासकीय चौकशी राज्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग संचालक महेश पालकर करीत आहे. त्यांचा चौकशी अहवाल दहा दिवसात सादर होणार असल्याची माहिती आहे.

आतापर्यंत या प्रकरणात आजी, माजी शिक्षण उपसंचालकांना अटक झाली. मात्र, वेतन पथक अधीक्षक वाघमारे याला अजूनही अटक झालेली नाही. लवकरच यात गुंतलेले शिक्षणसंस्था चालक आणि मुख्याध्यापकांवरही कारवाई होणार असल्याची माहिती वरिष्ठ सूत्रांनी दिली.

या घोटाळ्याची व्याप्ती गोंदिया, गडचिरोली, भंडारा, जळगाव, पुण्यापर्यंत आहे. आतापर्यंत शिक्षणसंस्था चालक, शिक्षक तसेच मुख्याध्यापक रेकॉर्डवर नव्हते. तेही आता रेकॉर्डवर आले आहे. यापुढे त्यांच्यावरही कारवाई होईल, अशी माहिती पोलिस विभागातील वरिष्ठ सूत्रांनी दिली.

या संदर्भात शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंग यांनी नागपुरात येत पोलिस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांची भेट घेतली. दोघांनीही काही माहितीची देवाणघेवाण केली. या घोटाळ्यात गुंतलेल्या सर्वच संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे अशी शिक्षण विभागाची भूमिका असल्याचे सूत्रांनी सांगितले.

शालार्थ आयडी घोटाळ्याचा सूत्रधार वेतन विभागाचा अधीक्षक नीलेश वाघमारे याला अजून अटक न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शालार्थ आयडी घोटाळ्यात माजी उपसंचालक उल्हास नरड यांच्या तक्रारी वरून नीलेश वाघमारेचे निलंबन झाले होते.

या प्रकरणी आतापर्यंत संभाजी नगर शिक्षण मंडळाच्या सचिव व नागपूर विभागाच्या माजी शिक्षण उपसंचालक वैशाली जामदार, राज्य शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष व माजी शिक्षण उपसंचालक चिंमामण वंजारी यांच्यासह एकुण १४ आरोपींना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. काहीजण अद्यापही फरार आहेत.

वंजारी हे या प्रकरणाच्या चौकशी समितीचे अध्यक्ष होते. या घोटाळ्यात बोगस शालार्थ आयडी तयार करून अपात्र शिक्षकांना वेतन मंजूर केल्याचा आरोप आहे.

# शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांबाबत संभ्रम : रोज नवीन अडथळा

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ६ :**
गेल्या तीन महिन्यांपासून सुरू असलेल्या शिक्षक ऑनलाईन बदली प्रक्रियेत रोज एक नवीन अडथळा निर्माण होत असून शासन निर्णयानुसार ३१ मे रोजी बदलीची मुदत संपल्यामुळे शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्या होणार की नाही, असा संभ्रम शिक्षकांमध्ये निर्माण झाला आहे.

ग्राम विकास विभागाच्या १८ जून २०२४ च्या शासन निर्णयानुसार, एकूण ७ टप्प्यात शिक्षकांची ऑनलाईन बदली प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ७ नोव्हेंबर २०२४ रोजी ग्राम विकास विभागाकडून २८ एप्रिल ते ३१ मे असे प्रत्यक्ष बदली प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. परंतु पुढे या वेळापत्रकात वारंवार बदल करण्यात आला.

ऑनलाईन प्रक्रियेत वारंवार निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी, शिक्षक व शिक्षक संघटना यांनी दाखल केलेली न्यायालयीन प्रकरणे व त्याबाबत उच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश, तसेच जुन्या-नव्या संच मान्यतेबाबतचा संभ्रम या सर्व बाबींमुळे शिक्षक ऑनलाईन बदली प्रक्रियेत सातत्याने अडथळे निर्माण झाल्याने अजूनही संवर्गनिहाय प्रत्यक्ष बदली प्रक्रियेला सुरुवात होऊ शकली नाही.

७ नोव्हेंबर २०२४ च्या वेळापत्रकानुसार संपूर्ण बदली प्रक्रियेसाठी ३४ दिवसाचा कालावधी लागणार होता. हे वेळापत्रक गृहित धरले तर आज जरी प्रक्रिया सुरू झाली तरी बदली प्रक्रिया पूर्ण व्हायला जुलै उजाडेल. विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रातील शाळा १६ जून रोजी तर विदर्भातील शाळा २३ जून रोजी सुरू होणार आहे, त्यामुळेच आता शाळा सुरू होण्याआधी बदली प्रक्रिया पूर्ण होणे शक्य नाही. त्यामुळे बदल्या होणार की नाही, याबाबतचा संभ्रम अधिकच वाढला आहे. सध्या बदली बाबतच्या याद्या प्रसिध्द झाल्या आहे. पण रिक्त जागा घोषित झाल्या नाहीत.

## : साप्ताहिक संवाद : प्लास्टिकमुक्ती हाच शाश्वत पर्यावरणासाठी उपाय



लोकरंग

दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी पर्यावरण दिनाची एक थीम किंवा विषय असतो. यंदाच्या वषार्ची थीम आहे प्लास्टिकमुक्ती अर्थात पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टिकला नकार.

शाश्वत आणि सुंदर असे आपले सभोवताल म्हणजेच पर्यावरण. मात्र मागील काही दशकापासून विविध प्रकारच्या जल,वायू आणि रासायनिक प्रदूषणामुळे आपल्या पर्यावरणाचा समतोल बिघडू लागलेला दिसतोय. पर्यावरणाचा ऱ्हास होण्यास प्लास्टिकचे प्रदूषण हे अत्यंत धोकादायक आणि तितकेच गंभीर आहे. म्हणूनच पर्यावरण संवर्धनासाठी प्लास्टिक मुक्ती करायची हे यंदाच्या पर्यावरण दिनाचे उद्दिष्ट आहे. याच अनुषंगाने पर्यावरण दक्षता मंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक विद्याधर वालावलकर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**प्लास्टिक मुळे पर्यावरणास कशा प्रकारे धोका आहे?**

प्लास्टिक या धातूचा शोध इतर धातूंना पर्याय म्हणून मानवानेच लावलेला आहे. मात्र सध्या याच प्लास्टिकचा अतिरेकी वापर इतका वाढलेला आहे कि संपूर्ण पर्यावरणाचं धोक्यात आलेले आहे. या प्लास्टिकचे विघटन वषार्नुवर्षे होत नाही त्यामुळे आपण इतस्ततः फेकून दिलेल्या प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या आणि तत्सम वस्तूमुळे छोटी गटार, नद्या, समुद्रामध्ये देखील या प्लास्टिकचा इतक्या महाकाय स्वरूपात कचरा निर्माण होतोय कि त्याचा जलचर आणि सजीव सृष्टीलाच धोका निर्माण झालेला आहे.

अनवधानाने हेच प्लास्टिक पोटात गेल्याने जनावर आणि जलचर मृत्युमुखी पडतातच. शिवाय प्लॅस्टिकच्या डब्यामध्ये खाद्यपदार्थ ठेवल्याने आणि प्लास्टिक बाटल्यांमध्ये पाणी प्यायल्याने मनुष्याला कर्करोगाचा धोका देखील तितकाच वाढलेला आहे. याच प्लास्टिक च्या कचऱ्यामुळे पावसाळ्यात अक्षरशः पूर येतात अर्थात यामुळेच अनेक अर्थाने पर्यावरणास या प्लास्टिकचा धोका आहे.

**प्लॅस्टिकची पुनर्निर्मिती शक्य आहे का?**

पर्यावरणीय आणि आर्थिक शाश्ववता या उद्दिष्टाचा एक महत्वाचा पैलू म्हणून भारतात प्लॅस्टिकच्या पुनर्निर्मितीने वेग घेतला आहे. तसेच वतुर्ळाकार अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक म्हणून त्याला मान्यताही दिली आहे. त्यात भविष्यातील संभाव्य वाढ आणि पर्यावरणीय नियम समाविष्ट आहेत.

स्वच्छ ऊर्जा आणि पर्यावरणाची शाश्वतता वाढविण्यासाठी प्लॅस्टिकची पुनर्निर्मिती महत्वाची ठरते. प्लॅस्टिकच्या पुनर्निर्णमतीमुळे ऊजेर्ची लक्षणीय बचत होत असल्याचे देखील अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. संशोधनपर अभ्यासातून एक टन प्लॅस्टिकच्या पुनर्निर्णमतीतून ५,७४४ किलो वाट प्रतितास ऊर्जा आणि १६. ३ बॅरेल तेलाची बचत होऊ शकते.

**प्लास्टिक मुक्ती कशा प्रकारे शक्य आहे?**

आपल्याला जर शाश्वत आणि सुंदर पर्यावरण हवे असेल तर प्लास्टिक मुक्ती अर्थात प्लास्टिकला नकार हा अगदी व्यक्तिनुरूप करायला हवा. बाजारात गेल्यानंतर अगदी कमी मायक्रॉनच्या पर्यावरणास धोकादायक अशा पिशव्यांचा वापर थांबविण्यासाठी प्रत्येकाने नियमित कापडी पिशवी बाजारात घेऊन जाण्याची सवय लावून घ्यायलाच हवी. अगदी गरज असेल तरच घरात प्लॅस्टिकच्या भांड्यांचा अगदी कमीत कमी वापर करावा.

प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये पाणी पिऊन कर्करोगाला निमंत्रण देण्यापेक्षा चहा,कोफी आणि पाणी हि पेय काचेच्या ग्लास किंवा कपमध्येच पिण्याचा आग्रह धरावा.कचरा असलेले प्लास्टिक इतस्ततः फेकून पर्यावरणास धोका पोहचवण्यापेक्षा याच कचऱ्याची शाशत्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी हे प्लास्टिक पुनर्निर्मिती केंद्राला देणे असे अनेक उपाय योजून प्लास्टिकमुक्ती करता येन सहज शक्य आहे. ■ ■ ■

## भारतीय विमानतळ परिसंस्थांची भविष्यातील उत्तुंग भरारी



इंडिया पासेंजर टर्मिनल शो 2025 च्या आधी, मीडिया फ्यूजन LLC ने मुंबईत एक उच्च-प्रभावी मीडिया सोबत चर्चासत्राचे आयोजन केले. नवकल्पना, तंत्रज्ञान आणि शाश्वततेद्वारे विमानतळ प्रवासी पायाभूत सुविधा नव्याने संकल्पित करणे या विषयावर भर देत, या सत्रात सरकार, विमान वाहतूक आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील प्रमुख नेत्यांनी सहभागी होऊन, स्मार्ट, पर्यावरणपूरक आणि भविष्यकालीन विमानतळ परिसंस्थांच्या निर्मितीवर सखोल चर्चा केली.

या कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रमुख वक्त्यांमध्ये जोसेफ गौडा, सहसंचालक, इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिसेस; सुमीत सुसीलन, सदस्य, नागरी उड्डाण मंत्रालय, भारत सरकार; गीता प्रिया, वरिष्ठ संचालक व सेक्टर प्रमुख पायाभूत सुविधा आणि विमानतळ, खछछ इंडिया; नितीन शर्मा, व्यवसाय विकास, डॉमार्काबा; विक्रम फलोडिया, प्रमुख झ्र टर्मिनल ऑपरेशन्स, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि ताहेर पत्रावाला, व्यवस्थापकीय संचालक, मीडिया फ्यूजन होते.

चर्चेचा केंद्रबिंदू भारताच्या आश्चर्यकारक विमान वाहतूक विकासावर होता जो आता जगातील तिसरा सर्वात मोठा देशांतर्गत बाजार आहे, गेल्या दशकात ८५ हून अधिक विमानतळांची निर्मिती झाली असून, सरकारच्या विकसित भारत २०४७ व्हिजन अंतर्गत हा आकडा ३५० पर्यंत नेण्याचा रोडमॅप आहे. पायाभूत सुविधांचे पुन्हा संकल्पनात्मक नियोजन करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. पायाभूत सुविधांमधील दरी भरून काढणे, आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि उडान योजनेद्वारे प्रादेशिक कनेक्टिव्हिटी वाढवणे यांचा समावेश होता. डिजिटल परिसंस्थेचे बळकटीकरण करणे हीही एक महत्त्वाची प्राथमिकता ठरली. आतापर्यंत $१२ अब्जहून अधिक गुंतवणूक भारतात विमान वाहतूक पायाभूत सुविधांमध्ये झाली असून, २०३१ पर्यंत $४ अब्जच्या जागतिक मार्केटमधून हिस्सा मिळवण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. ■ ■ ■




स्थापत्य शास्त्राचा अद्भुत नमुना झुलते मनोरे धार्मिक आणि ऐतिहासिक दृष्टीकोनातून महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्याचे महत्व आहेच. परंतु याच जळगावाला शास्त्रीय दृष्टीने देखील महत्व आहे. एरंडोल शहरापासून १६ किलोमीटरवर आणि कासोदा या गावाच्या पश्चिमेला फरकांडे हे गाव आहे. या गावी नदीच्या किनाऱ्यावर पिसा येथील झुलत्या मनोऱ्यांची आठवण करून देणारे व स्थापत्यशास्त्राचा अद्भुत नमुना म्हणून प्रसिद्ध असलेले झुलते मनोरे आहेत.

काही इतिहासतज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार सुमारे २५० वर्षांपूर्वी चांदमोमीन नावाच्या इसमाने ही मशीद बांधली आहे. तर काही इतिहासतज्ज्ञांच्या मते फारूकी राजांनी सुमारे ४०० वर्षांपूर्वी या वास्तूची निर्मिती केली असावी.या वास्तूचे दोन्ही मनोरे अस्तित्वात होते तेव्हा त्यांना पाहताक्षणीच पाहणाऱ्याला इजिप्तच्या पिरॅमिडची आठवण येत होती. मनोऱ्यांची प्रत्यक्ष उंची १५ मीटर आहे. हे दोन्ही मिनार वरील बाजूला निमुळते होत गेले आहेत. त्यांच्या पायाचा खालचा व्यास जवळपास ३ मीटर रुंदीचा होता. या मनोऱ्यांचे वैशिष्ट्य असे, की एक मनोरा हलविल्यावर आपोआप दुसरा मनोराही हलत असे. सद्यस्थितीत चार मनोऱ्यापैकी एकच मनोरा अस्तित्वात आहे. आज ही एक ऐतिहासिक वास्तू नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# कालव्यात बुडून भावंडांचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी भंडारा, दि. ६ :**
एक चिमुकला घरापासून जवळ असलेल्या नहरात मोठा भाऊ आणि कॉलनीतील मित्रांसोबत पोहण्यासाठी गेला.

मात्र कालव्यातील पाण्याचा अंदाज न आल्यामुळे पाण्यात उतरताच त्याचा मृत्यू झाल्याची घटना तामसवाडी शिवारातील बावनथडी प्रकल्पाच्या नहरात घडली. या घटनेनंतर कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला.

तुमसरमधील शिवाजीनगर परिसरातील अल्ताफ शेख (वय ८) असे मृत बालकाचे नाव आहे. अल्ताफ रजा शेख हा त्याचा मोठा भाऊ अहमद व काही मित्रांसोबत शहराच्या बाहेरील तामसवाडी रस्त्याला छेदून गेलेल्या कालव्यात आंघोळीला गेले होते. सर्वजण कालव्यातील पाण्यात उतरले. मात्र पाण्याच्या अंदाज न लागल्याने मोहम्मद हा पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. पोहता येत नसल्याने तो खोल भागात गेला आणि काही क्षणांतच पाण्यात बुडून मृत्यू झाला.

लहान भाऊ बुडत असल्याने पाहून त्याच्या मोठ्या भावाने वाचवा वाचवा म्हणून आरडाओरड केली. तोपर्यंत अल्ताफ हा नहरातील पाण्यात बुडाला.

यावेळी परिसरात कुणीच नसल्याने या बालकांच्या मदतीसाठी कोणीही येऊ शकले नाही. या घटनेने सोबत असलेली सर्व मुले प्रचंड घाबरली होती. भेदरलेल्या अवस्थेत सर्व मुलांनी घराकडे धाव घेत घडल्या घटनेची माहिती दिली. यानंतर कुटुंबीय व परिसरातील नागरिकांनी कालव्याकडे धाव घेतली.

परिसरातील नागरिकांनी तात्काळ धाव घेत काही वेळातच अल्ताफचा मृतदेह कालव्या बाहेर काढला. पण तोपर्यंत खूप उशीर झालेला होता. मुलाचा मृतदेह पाहून कुटुंबीयांनी हंबरडा फोडला.

घटनेची माहिती मिळताच तुमसर पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# सर्वोच्च न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

**१५ वर्षानंतर आला निर्णय**

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ६ :**
चंद्रपूरमध्ये २०१० साली घडलेली एक धक्कादायक घटना घडली होती. यात वैभव नावाच्या एका मित्राने मंगेश नावाच्या दुसऱ्या मित्राच्या डोक्यात गोळी घालून त्याची हत्या केली होती.

विशेष बाब म्हणजे, याप्रकरणी चंद्रपूर सत्र न्यायालयाने आरोपी मित्राला दोषी मानत शिक्षा ठोठावली होती. २०१२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानेही मित्राला दोषी मानत शिक्षा कायम ठेवली.

२०१० मध्ये घडलेली ती घटना पुन्हा चर्चेत असण्याचे कारण म्हणजे घटनेच्या तब्बल १५ वर्षांनंतर सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी निर्णय दिला आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, सत्र न्यायालय आणि उच्च न्यायालय यांच्या निरीक्षणाच्या उलट जात सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयातून अनेक घटनेतील अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत.

वैभव आणि मंगेश हे दोघेही चंद्रपूरमधील होमिओपॅथी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी होते. सप्टेंबर २०१० मध्ये वैभवच्या वडिलांची सरकारी रिव्हॉल्व्हर हातात येताच, दोघेही तिच्याशी खेळू लागले. त्यावेळी एक गोळी सुटली आणि थेट मंगेशच्या डोक्यात जाऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. घाबरलेल्या वैभवने मृतदेह लपवण्याचा प्रयत्न केला, रक्ताचे डाग पुसले आणि दोन मित्रांना घटनास्थळी बोलावून मृतदेह हटवण्यास मदत मागितला. या कृतीमुळे पोलिसांनी त्याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल केला. २०१२ मध्ये सत्र न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयानेही त्याला दोषी ठरवले होते.

सर्वोच्च न्यायालयात प्रकरण पोहोचल्यावर संपूर्ण घटनाक्रमाची नव्याने चिकित्सा झाली. मंगेशच्या डोक्यातून झटकलेली गोळी थेट खोलीच्या भिंतीवर असलेल्या व्हेंटिलेटरवर जाऊन आदळली होती, जो मंगेशच्या उंचीपेक्षा खूप वर होता. न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, अशा प्रकारे गोळी फक्त त्याचवेळी वर जाऊ शकते, जेव्हा मृत व्यक्ती खाली पाहत असतो आणि अगदी जवळून गोळी झाडली जाते. यावरून हा हत्येचा प्रकार नसल्याचा निष्कर्ष काढत निर्दोष सुटका केली.

# पेंच व्याघ्र प्रकल्पातील ३० गावांत पर्यावरण जागृती

**विद्यार्थ्यांनी केले प्लास्टिक संकलन आणि वृक्षारोपण**





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
महाराष्ट्रातील पेंच व्याघ्र प्रकल्पात प्लास्टिक प्रदूषणावर मात करा' या जागतिक थीम अंतर्गत, ३० हून अधिक गावांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

वन्यजीव संवर्धन आणि समुदाय-आधारित पर्यावरणीय शिक्षणावर काम करणाऱ्या सातपुडा फाउंडेशनने आयोजित केलेल्या विविध उपक्रमात शालेय मुलांनी प्लास्टिक कचरा संकलनासोबतच विविध देशी झाडांचे बीज संकलन केले. तसेच रोपेही लावली.

पेंच व्याघ्र प्रकल्पातील (महाराष्ट्र) बफर झोनमधील फुलझारी, घाटकुकडा, उसरीपार, शिलादेवी, कोलितमारा, सुवर्णधारा, सावरा, घाटपेंढरी, अंबाझरी आणि सलाई यासारख्या गावांमध्ये, शालेय विद्यार्थ्यांनी दिवसाच्या सुरुवातीला स्वच्छता मोहीम राबवून, शाळेचे अंगण आणि गावातील गल्ल्या प्लास्टिक आणि इतर कचरामुक्त करून रंगमंच उभारला. प्लास्टिक प्रदूषण, वनसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणात तरुणांची भूमिका यावर आधारित चित्रकला, निबंध आणि भाषण स्पर्धांमध्ये मुलांनी भाग घेतला.

फुलझारी गावातील विद्यार्थ्यांनी महुआ, अमलतास, चिंच, करंज, कडुनिंब आणि बेल यासारख्या स्थानिक वृक्षांच्या बिया गोळा केल्या.सातपुडा फाउंडेशनच्या १५ तरुण शिक्षकांनी तीन महिन्यांच्या उन्हाळी शिकवणी कार्यक्रमात (मे-जुलै २०२५) सहभागी आहेत, अशा ३० गावांमध्ये कार्यक्रम आयोजित केले आणि ४०० हून अधिक शाळकरी मुलांना सहभागी करून घेतले.

या सत्रांनी केवळ शालेय विषयांना बळकटी दिली नाही तर वन्यजीव, जैवविविधता आणि पर्यावरणीय व्यवस्थापनाचे धडे देखील दिले. सलाई गावात, अर्णव गंडे (क्षेत्र जीवशास्त्रज्ञ) आणि दिव्यम वाळके (क्षेत्र सहाय्यक) यांनी पक्षी निरीक्षण फेरफटका आणि पर्यावरणीय संतुलनावरील चर्चा यासह निसर्ग-आधारित उपक्रमांचे नेतृत्व केले.

सावरा येथे, अधिराज सिंग (क्षेत्र जीवशास्त्रज्ञ) आणि निखिल कोहळे (क्षेत्र सहाय्यक) यांनी स्वच्छता आणि वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन केले. आवळेघाट येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी प्लास्टिक संकलन मोहिमेने उत्सवाची सुरुवात केली. त्यानंतर सीताफळ, जांभूळ आणि बेल (लाकूड सफरचंद) रोपे लावली. बंडू उईके यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

महासागर
नागपूर
वृत्तसागर
शनिवार, दि. ७, जुन २०२५

# ७ गोवंश तस्कर १५ दिवसांसाठी तडीपार

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
गोवंश तस्करी आणि गोमांस विक्रीत सक्रीय 7 गुन्हेगारांची लगाम कसण्यासाठी सदर पोलिसांनी त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाई केली. त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना 15 दिवसांसाठी नागपूर शहरातून तडीपार करण्याचे आदेश दिले. तन्वीर कुरेशी सलीम हाजी कुरेशी (34), मोहम्मद इरशाद अब्दुल वहाब कुरेशी (44), साहेब उर्फ शोबी नूर कुरेशी (35), मोहम्मद इमरान जहीर कुरेशी (27), राहिल कुरेशी छोटू कुरेशी (36), आसिब कुरेशी अजीब कुरेशी (36) आणि सरफराज हक अब्दुल हक (35) सर्व रा. गड्डीगोदाम अशी तडीपार करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.
सर्व आरोपींविरुद्ध गोवंश तस्करी आणि गोमांस विक्रीचे गुन्हे नोंद आहेत. ते संघटितरित्या टोळी बनवून गो तस्करी व मांस विक्री करतात. त्यांच्याविरुद्ध अनेकदा कारवाई करण्यात आली. त्यांची लगाम कसण्यासाठी झोन 2 चे डीसीपी राहुल मदने यांनी त्यांना 6 महिन्यांसाठी तडीपारही केले होते. त्यानंतरही आरोपी आपल्या कामात सक्रीय होते. ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी त्यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम 170 (1) अन्वये अटक केली. यासोबतच पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना 15 दिवसांसाठी शहरातून तडीपार करण्याचे आदेश दिले. या दरम्यान वरील आरोपी शहरात दिसले तर पोलिस नियंत्रण कक्ष किंवा सदर पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन पोलिसांकडून नागरिकांना करण्यात आले आहे.

# सौरऊर्जेवरील उपसा सिंचन योजना शेतकऱ्यांसाठी ठरणार वरदान : नितीन गडकरी

## तरंगत्या सोलर पॅनलवर चालणाऱ्या मुरादपूर उपसा सिंचन योजनेचे लोकार्पण

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
शेतकऱ्यांसाठी पाणी हा कळीचा मुद्दा आहे. त्यांना नियमीत पाणी मिळाले तर केवळ शेतीचाच प्रश्न सुटणार नाही, तर गावातील एकूणच समस्या मार्गी लागतील. मुरादपूर उपसा सिंचन योजना आजपासून लोकांच्या सेवेत अर्पण करण्यात आली आहे. सौरऊर्जेवरील ही उपसा सिंचन योजना या भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

उमरेड तालुक्यातील वडगाव जलाशयावर (वेणा नदीवरील) सौर ऊर्जेवर संचालित मुरादपूर उपसा सिंचन योजनेचेनितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार संजय मेश्राम, माजी आमदार सुधीर पारवे, सरपंच दुर्गा आलाम, उपसरपंच गजानन गाडगे, आदिवासी विभागाचे उपसंचालक चव्हाण, मानस उद्योग समूहाचे उपाध्यक्ष जयकुमार वर्मा, उपाध्यक्ष आनंदराव राऊत आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

नितीन गडकरी म्हणाले, 'बऱ्याच दिवसांपासून या भागात अश्या प्रकल्पासाठी आम्ही प्रयत्नरत होतो. या विभागातील निवृत्त मुख्य अभियंता जनबंधू या प्रकल्पाचा प्रस्ताव घेऊन माझ्याकडे आले. त्यानंतर याचे काम सुरू झाले. सौरऊजेर्मुळे जे पाणी शेतीसाठी उपलब्ध होणार आहे, त्यातून शेतकऱ्यांना दोन ते तीन पिके घेता येणार आहेत. यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे.

या भागात ५३ टक्के आदिवासी लोक राहतात. हा परिसर सामाजिक, शैक्षणिक, आर्थिकदृष्ट्या मागास आहे. त्यामुळे या समाजासह येथील एकूणच सर्वसामान्य लोकांचे जगणे सुसह्य करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने पं. दिनदयाल उपाध्याय यांनी दिलेला अंत्योदयचा संदेश घेऊन आम्ही काम करतोय. समाजातील उपेक्षित वगार्ला परमेश्वर मानून त्याची निरंतर सेवा केली पाहिजे, हे त्यांचे सामाजिक-आर्थिक चिंतन आम्ही जोपासले आहे, याचाही नितीन गडकरी यांनी उल्लेख केला.

या पाण्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट होणार आहे. ऊस, मका, धानासारखे नगदी पिक लावून नफा मिळविण्यासाठी जनकल्याण समितीने लक्ष घालण्याची गरज आहे. शेतकऱ्याला उत्तम भाव मिळाला पाहिजे. त्याच्या उत्पादनांची गुणवत्ता चांगली असायला पाहिजे. त्यातून त्याचा विकास साधता आला पाहिजे, हाच यामागचा उद्देश आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांना पाणी मिळाले आहे, आता फार्मर प्रोड्युस कंपनी तयार करावी, असे आवाहन गडकरी यांनी केले. एक ट्रॅक्टर घेऊन संपूर्ण गावातील वखरणी एकाच ट्रॅक्टरने करा. ड्रोणने स्प्रेयींग करा. यातून एकरी पाच ते सहा हजार रुपयांची बचत होईल. तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती केली तर उत्पादन वाढेल आणि नफाही वाढेल, असेही ते म्हणाले.

शंभर कोटी रुपयांमध्ये दहा एकर जागेवर स्मार्ट व्हिलेज बांधायला घेतले आहे. लवकरच या प्रकल्पाचे भूमिपूजन होणार आहे. ४०० लोकांनी घरांसाठी नोंदणीही केली आहे. यात एक हजार लोकांना घरे देणार आहोत. ४५० चौरस फुटाचे घर, सिमेंटचे रस्ते, आयुष्यभर पाणी आणि वीज मोफत देण्याचा प्रयत्न आहे. याठिकाणी खेळाचे मैदान आणि उद्यानही असेल, अशी माहिती नितीन गडकरी यांनी दिली.

**अशी आहे उपसा सिंचन योजना**
या प्रकल्पात वडगाव धरणाचे पाणी जॅकवेलमधून पंपाद्वारे उचलून एम.एस. पाईपलाईन द्वारे डिलीव्हरी चेंबर -1 ला पोहोचवले जाणार आहे. त्यानंतर डिलीव्हरी चेंबर क्र.-1 ते डिलीव्हरी चेंबर क्र.-2 ला गुरुत्वाकर्षणाद्वारे पाणी पोहोचवले जाईल.

डिलीव्हरी चेंबर क्र.-1 व डिलीव्हरी चेंबर क्र.-2 ला पाणी पोहोचल्यानंतर डिलीव्हरी चेंबर क्र.1 व क्र. 2 वर बसविण्यात आलेल्या 20 एच.पी.च्या पंपाद्वारे शेतीला ठिबक सिंचन करण्यात येईल. यामुळे 465 एकर शेतजमीनीला बारमाही पाणी उपलब्ध होईल.

गावातील 465 एकर शेतजमिनीसाठी बारमाही पाणी वडगाव जलाशयातून उचल करता येणार आहे. या प्रकल्पात 270 केव्हीए क्षमतेचे तरंगते सौर ऊर्जा पॅनल्स आहेत. या सौर पॅनलमुळे जवळपास प्रतिदिन 1080 युनिट उर्जा निर्माण होणार आहे. निर्माण झालेल्या उर्जेमुळे प्रकल्पावरील सर्व पंप व विजेवरील सर्व उपकरणे विनाशुल्क चालविण्यात येणार आहेत.



**मुरादपूर उपसा सिंचन योजनेची वैशिष्ट्ये**
* रामा डॅमच्या जलाशयात तरंगते सोलर पॅनल्स
* प्रत्येकाच्या क्षेत्रात ठिबक सिंचनाची सोय
* एका कंट्रोल रूममधून संपूर्ण क्षेत्रात पाणीवाटप
* संपूर्ण प्रकल्पावर पाणीवापर संस्थेचे नियंत्रण
* सोलर पॅनलद्वारे वीज निर्मिती होईल व ते एमएसईबीला जोडले जाणार असल्यामुळे योजनेवरील वीज बिलाचा भार कमी राहणार
* मुरादपूर प्रकल्पाच्या माध्यमातून पाण्याचा उपसा करून शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाद्वारे
* शेतीकरिता पाणी वापरता येणार आहे.

# दुपारी सीजीओ इमारतीला बॉम्बस्फोटाने उडवले जाईल

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
शहरातील सेमिनरी हिल परिसरात असलेल्या सीजीओ कॉम्प्लेक्समधील पेट्रोलियम आणि स्फोटक सुरक्षा संघटना (पेसो) च्या कार्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी ईमेलद्वारे मिळाली. 2.30 वाजेपर्यंत सीजीओ इमारतीला बॉम्बस्फोटाने उडवले जाईल. असा मजकूर ईमेलमध्ये होता. त्यामुळे पोलिस दलात एकच खळबळ उडाली. ही घटना शुक्रवारी दुपारी समोर आली. ही माहिती मिळताच पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. मात्र, शेवटी ती अफवा निघाल्याने पोलिसांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

गिट्टीखदान पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सीजीओ कॉम्प्लेक्समध्ये पेसोच्या पाचव्या मजल्यावरील कार्यालयासह अनेक महत्त्वाचे केंद्रीय कार्यालय आहेत. धमकी मिळताच संपूर्ण इमारत रिकामी करून बॉम्ब शोध पथक (बीडीडीएस) आणि डॉग स्क्वॉडच्या मदतीने संपूर्ण इमारतीची कसून तपासणी करण्यात आली. तपासादरम्यान कोणताही स्फोटक पदार्थ आढळून आला नाही. या घटनेमुळे काही काळासाठी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पेसो कार्यालयासह केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, सीबीआय, केंद्रीय जल आयोग, पोस्टल विभाग यासारखी अनेक कार्यालये या कॉम्प्लेक्समध्ये आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ईमेलद्वारे आलेली धमकी कोणाकडून आली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, नागपूर सायबर सेलला अलर्ट करण्यात आले असून, ईमेलचा स्त्रोत शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. ईमेलचा आयपी अॅड्रेस, सर्व्हर लोकेशन यांची माहिती घेण्यात येत आहे.

**धमकीच्या ईमेलने पोलिस दलात खळबळ**
सध्या परिसरात पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, सध्या सीजीओ इमारतीतील कामकाज सुरळीतपणे सुरू आहे आणि परिसर पूर्णपणे सुरक्षित आहे.
**कैलाश देशमाने**
**(ठाणेदार, गिट्टीखदान पोलीस स्टेशन)**

# १.३२ लाखाच्या मालावर डल्ला

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
कुटुंब बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत रोकड व दागिन्यांसह एकूण 1 लाख 32 हजार 500 रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. ही घटना वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी अनिकेत शिवाजी भोसले (32) रा. रामकृष्णनगर, दिघोरीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. अनिकेत व त्यांचे सासरे कुटुंबासह छत्तीसगड येथे गेले होते. अज्ञात आरोपीने कुलूप तोडून कपाटातील 50 हजारांची रोकड आणि सोन्याचे दागिने घराचे कुलूप तोडून रोख 5 हजार रुपये असा एकूण 1,32,500 रुपयांचा माल चोरून नेला.

# अखेर कारगिल पोलिस रिकाम्या हातानेच परतले

## सुनीता हेरगिरी प्रकरण

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
हेरगिरीचा संशय असलेल्या सुनीताला ताब्यात घेण्यासाठी आलेले कारगिल पोलिस रिकाम्या हाताने परतले. सुनीताला ताब्यात घेण्यासाठी कारगिल पोलिस पथक मंगळवारी नागपुरात पोहोचले होते. तिचा ताबा घेण्यासाठी बुधवारी न्यायालयात गेले.

मात्र, त्यांच्याकडे स्थानिक न्यायालयाचा वॉरंट नसल्यामुळे न्यायालयाने सुनीताचा ताबा देण्यास तुर्तास नकार दिला. त्यामुळे कारगिल पोलिसांना गुरूवारी रिकाम्या हाताने परतावे लागले. मात्र सुत्राने दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक न्यायालयाच्या वॉरंटसह कारगिल पोलिस पुढील आठवड्यात पुन्हा येणार आहेत. तोपर्यंत सुनीता नागपूर कारागृहात आहे. कारगिल पोलिसांसह एनआयए तसेच गुप्तचर यंत्रणा देखील सुनीताची सखोल चौकशी करणार आहेत.

हेरगिरीचा संशय व्यक्त करीत अमृतसर पोलिसांनी सुनीताविरुद्ध ऑफिशियल सिक्रेट ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल केला आणि हे प्रकरण कपिलनगर पोलिसांकडे वर्ग केले. तोच धागा पकडून पुढील तपास करीत पोलिसांनी तिला 29 मे रोजी सुनीताला अटक करीत पोलिस कोठडीसाठी न्यायालयाला विनंती केली. न्यायालयाने 2 जूनपर्यंत तिला पोलिस कोठडी सुनावली. कोठडी संपल्यानंतर तिची कारागृहात रवानगी करण्यात आली. पोलिस कोठडीदरम्यान कपिलनगर पोलिसांनी तिचा मोबाईल, पासपोर्ट आणि आधारकार्ड जप्त केले. तांत्रिक विश्लेषणासाठी सायबर पोलिसांकडे मोबाईल पाठविला. हेरगिरी करीत असल्याची ठोस माहिती पोलिसांना मिळाली नाही. मात्र, चौकशी दरम्यान तिने पोलिसांना पाकिस्तानातील 9 दिवसांची धक्कादायक माहिती दिली. परंतु, काही प्रश्न अनुत्तरीत आहेत. कारगिर पोलिस आणि विविध तपास यंत्रणांना आजही मोठा संशय आहे. स्टोनचा (चमकणारे दगड) व्यवसाय करण्याच्या दृष्टीने पाकिस्तानात गेल्याचे तिने पोलिसांना सांगितले. मात्र, सामान्य कुटुंबातील सुनीता केअर टेकरची कामे करून उदरनिर्वाह करते. त्यामुळे तिला पाकिस्तानात जाण्याचे कारण तपास यंत्रणेच्या कल्पनेपलिकडचे आहे. पर्यटनासाठी एवढे पैसे तिच्याकडे आले कुठून. पाकिस्तानपर्यंत तिची लिंक कशी लागली. ८ ते ९ दिवसात पाकिस्तानात काय झाले? या प्रश्नांची उत्तरे तपास यंत्रणेला हवी आहेत. त्यामुळे कारगिल पोलिस पुढील आठवड्यात तयारीनीशी येतील.

# श्री जलाराम सत्संग मंडळ-भजन तर्फे सत्संग

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**



श्री जलाराम सत्संग मंडळ-भजन तर्फे 07 जून रोजी मनोज लक्ष्मीदास वसानी साई ज्योती निवास, प्लॉट क्र. 131, गौरी नगर, पारडी, प्रवीण बिछायत केंद्राजवळ, भरतवाडा रोड, नागपूर येथे रात्री 8.10 ते रात्री 8.10 या वेळेत सत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व भाविकांनी सत्संगाचा लाभ घ्यावा. संपर्क ८०५५५१००४९,९७६४५५१००४.

# लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

## मुंबईचा ठकबाज गजाआड

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
महिलांना लग्नाचे आमिष दाखवून पैसे उकळण्यासोबतच त्यांचे शारीरिक शोषण करणाऱ्या मुंबईचा ठकबाजास जरीपटका पोलिसांनी अटक केली आहे. कल्पेश शशिकांत कक्कड (42) रा. व्हीनी क्लासिक अपार्टमेंट, कांदिवली वेस्ट, मुंबई असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. कल्पेश महिलांना लग्नाचे आमिष दाखवून शेअर बाजारात गुंतवणुकीच्या नावावर लाखो रुपये उकळतो. अशाच प्रकारे त्याने जरीपटका परिसरात राहणाऱ्या एका 47 वर्षीय महिला वकिलालाही आपल्या जाळ्यात अडकवून 12 लाख रुपयांनी फसवणूक केली. या प्रकरणी खळगी (पुणे) पोलिसांनी गुन्हा दाखल करून जरीपटका पोलिसांकडे गुन्हा वर्ग केला होता. जरीपटका पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला 7 जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जरीपटका ठाण्यांतर्गत राहणारी पीडित महिला ही वकील आहे. डिसेंबर 2022 मध्ये कल्पेशने पीडितेला फेसबुकवर मैत्रीचे निवेदन पाठवले. पीडितेने त्याचे निवेदन स्विकारताच त्याने एक मॅसेज पाठवला. त्यात कल्पेशने मेट्रीमोनी साईटवर त्यांचा बायोडाटा पाहिल्याची माहिती दिली आणि लग्नाचा प्रस्ताव ठेवला. त्याने पीडितेला सांगितले की, त्याची बिस्किट फॅक्टरी असून त्याच्याकडे स्क्वॉच ब्राईटची डीलरशिपही आहे. यासोबतच तो भावासोबत मिळून शेअर ट्रेडिंगही करतो आणि मुंबईत त्याचा दोन कोटींचा फ्लॅट आहे. त्यानंतर दोघांमध्ये सतत फोनवर बोलचाल सुरू झाली. पीडितेने आपल्या कुटुंबीयांना त्याच्याबाबत माहिती दिली. सप्टेंबर 2023 मध्ये कल्पेश पीडितेला भेटायला नागपुरात आला. तिच्या कुटुंबीयांनाही तो मोठा व्यापारी असल्याची बतावणी केली. जानेवारी 2024 मध्ये पीडितेच्या घरीच दोघांचाही साखरपुडा झाला. त्यानंतर पीडितेचे कुटुंबीय मंदिरात पूजा करण्यासाठी गेले.

**शेअर बाजारात गुंतवणुकीचे दाखविले आमिष**
पीडिता आणि कल्पेश घरी एकटेच होते. पीडितेने त्याला डोके दुखत असल्याचे सांगितले. कल्पेशने त्यांना एक गोळी खायला दिली. गोळी खाताच पीडिता बेशुद्ध पडली. बेशुद्धावस्थेत त्याने पीडितेशी लैंगिक संबंध प्रस्थापित केले. तसेच या कुकृत्याचे त्याने फोटो आणि व्हीडिओही बनवले. त्यानंतर तो सतत पीडितेचे लैंगिक शोषण करू लागला. या दरम्यान त्याने पीडितेच्या भावालाही आपल्या जाळ्यात अडकवले. शेअर बाजारात गुंतवणूक करून बक्कळ नफा कमावण्याचे आमिष दाखवत वेळोवेळी 12 लाख रुपये घेतले. मात्र ना नफा दिला आणि ना मुळ रक्कम परत केली. पीडिता जेव्हाही त्याला लग्नाबाबत विचारणा करीत होती तो टाळाटाळ करीत होता.

**मोबाईलमध्ये अनेक महिलांचे अश्लील फोटो, व्हीडिओ दिसले**
एक दिवस पीडितेला त्याच्या फोनमध्ये अनेक महिलांचे अश्लील फोटो आणि व्हीडिओ दिसले. त्यात पीडितेचाही व्हीडिओ होता. पीडितेने जाब विचारला असता तो ते फोटो आणि व्हीडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच त्याने लग्न करण्यासही पीडितेला स्पष्ट नकार दिला. पीडितेने पोलिसात तक्रार करण्याबाबत म्हटले असता आरोपीने तिच्या भावाला जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच तिचे फोटो, व्हीडिओ व्हायरल करून बदनाम करण्याची धमकी दिली. शेवटी त्रस्त होऊन पीडितेने पोलिसात तक्रार केली.

# राज्यशास्त्र परिषदेच्या पाचवा वर्धापन दिन

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
महाराष्ट्र राज्य राज्यशास्त्र कनिष्ठ महाविद्यालयीन परिषदेचा पाचवा वर्धापन दिन कार्यक्रम ९ जून रोजी नागपूर जिल्ह्यातील कामठी येथील पोरवाल महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. वर्धापन दिन सोहळ्याचे उदघाट्न नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबले करतील तर परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुमित पवार यांच्या अध्यक्षतेखाली वर्धापन दिन संपन्न होत आहे.

त्यानिमित्ताने राज्यातील राज्यशास्त्र कनिष्ठ महाविद्यालय परिषदेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

नागपुर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर राज्यशास्त्र विषयाचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांनी आणि राज्यशास्त्र विषयात ९० टक्के च्या वर गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सदर वर्धापन दिनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष प्रा. सुमित पवार, प्रा. सुधीर अग्रवाल, तसेच प्रा. संध्या येलेकर यांनी केले.

# अंमली पदार्थासह दोघांना अटक

**नागपूर :** यशोधरानगर पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीवरून सापळा रचत दोन युवकांना अंमली पदार्थासह अटक केली. रजत दिलीप ननेट (28) रा. गौतमनगर झोपडपट्टी, जरीपटका आणि राकेश राजकुमार कोहळे (21) रा. तिवारीनगर, भिलगाव अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. गुरूवारी सकाळी 7 वाजताच्या सुमारास यशोधरानगर पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान भिलगावच्या पाटीलनगर परिसरात 2 ड्रग्स विक्रेता येणार असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधरावर पोलिसांनी आरोपींना पकडण्यासाठी परिसरात सापळा रचला. या दरम्यान एमएच-40/बीएन-2935 क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने दोनजण संशयितरित्या फिरताना दिसले. त्यांना ताब्यात घेऊन झडती घेतली असता 15.25 ग्रॅम एमडी पावडर मिळाले.

# हरिभाऊ नाईक स्मृती समाजसेवा प्रतिष्ठानचा तिसरा स्मृतिदिन

## गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व शिष्यवृत्ती वितरण सोहळा

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
स्व. हरिभाऊजी नाईक कामगार नेते माजी महापौर नागपूर व माजी मंत्री यांचे तृतीय स्मृतिदिनानिमित्ताने रविवार दि. ८ जून रोजी शिक्षक सहकारी बँक सभागृह गांधी सागर जवळ स्मृतिदिना चा कार्यक्रम आयोजित केला आहे. वरील कार्यक्रमाचे अध्यक्ष नितीन गडकरी रस्ते वाहतूक मंत्री हे राहतील.

तसेच विशेष अतिथी पाहुणे माजी खासदार दत्ता मेघे आणि खासदार श्यामकुमार बर्वे लोकसभा रामटेक क्षेत्र तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सचिन अहिर, आमदार विकास ठाकरे, आमदार अभिजीत वंजारी, कामगार नेते एस क्यू जामा यांची प्रामुख्याने उपस्थिती राहतील. कार्यक्रमाला आर्थिक दृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. आणि इयत्ता १० वी व १२ वीचे 2024 व 25 चे वार्षिक परीक्षा गुणवत्तेसह जे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. अशांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्याचे प्रयोजन केले आहे. वरील कार्यक्रम रविवार ८ जून रोजी सकाळी १०:३० वाजता सुरू होणार आहे.

विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल देऊन सत्कार करण्यात येईल. कार्यक्रमाचे आयोजन हरिभाऊ नाईक स्मृती समाजसेवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमात जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महावितरणचा २० वा वर्धापन दिन उत्साहात

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
"माझ्या कौटुंबिक जबाबदारीचे व्यवस्थित निर्वहन करण्यासाठी, विद्युत सुरक्षिततेशी मी कधीही तडजोड करणार नाही" या सुरक्षा प्रतिज्ञेने महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी आज 20 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. नागपूर परिमंडलातील विविध कार्यालयांमध्ये हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला, जिथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या 351 व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त त्यांच्या अधार्कृती पुतळ्याला आदराने अभिवादन करण्यात आले. हा दिवस केवळ वर्धापन दिनापुरता मर्यादित नसून, सुरक्षिततेच्या संस्कृतीला अधिक बळकट करण्याचा संकल्प घेऊन साजरा करण्यात आला.

काटोल मार्गावरील महावितरणच्या 'विद्युत भवन' येथील मुख्य कार्यक्रमात नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी उपस्थित सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विद्युत सुरक्षेची शपथ देऊन कार्यक्रमाचा शुभारंभ केला. याप्रसंगी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अधार्कृती पुतळ्याला माल्यार्पण करून आदरांजली वाहिली. उपस्थितांमध्ये देशभक्ती आणि कार्यनिष्ठा यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. यानंतर, मुख्य अभियंता दोडके यांनी केक कापून सर्व कर्मचाऱ्यांना वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊजार्मंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला दिलेल्या शुभेच्छांची चित्रफीत यावेळी प्रसारित करण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या संदेशाने कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य संचारले आणि त्यांच्या कार्याला अधिक प्रेरणा मिळाली. याप्रसंगी विद्युत निरीक्षक उमाकांत धोटे आणि महानिर्मितीचे अधीक्षक अभियंता किशोर सूर्यवंशी यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, कार्यकारी अभियंता मंजूषा आडे यांच्यासह महावितरणच्या प्रादेशिक व परिमंडल कार्यालयांमधील विविध विभाग प्रमुख, अधिकारी, अभियंते तसेच महानिर्मिती आणि महापारेषण कंपन्यांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी, महावितरणच्या गेल्या 20 वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेणारी आणि सुरक्षिततेच्या कटिबद्धतेची गाथा अधोरेखित करणारी एक विशेष चित्रफीत दाखविण्यात आली. या चित्रफितीने महावितरणने विद्युत क्षेत्रात गाठलेले मैलाचे दगड आणि भविष्यातील दिशा स्पष्ट केली. हा वर्धापन दिन केवळ एका संस्थेचा वाढदिवस नसून, ग्राहकांना अखंडित आणि सुरक्षित वीज पुरवठा करण्याच्या वचनबद्धतेचे पुनरुत्थान होता, असे उपस्थितांनी सांगितले.



कर्मचाऱ्यांनी घेतली सुरक्षेची शपथ

# सूराबर्डीतील अतिक्रमण वाद चिघळला

## उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे ३ घर तोडण्याची कारवाई थांबवली, पीडितांनी शेवटच्या क्षणी घेतला स्टे



■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ६ :** नागपूर तालुक्यातील सुराबर्डी येथील जुन्या वस्तीमध्ये बुधवार ४ जुन रोजी अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईमुळे दिवसभर तणावपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तीन घरं तोडण्याकरिता नागपूर ग्रामीण तहसीलदार बालासाहेब टेले पोलिस बंदोबस्तासह घटनास्थळी पोहोचले होते. मात्र, शेवटच्या क्षणी पीडितांनी न्यायालयातून स्थगन आदेश (स्टे) मिळवल्यामुळे कारवाई थांबवण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, सुराबर्डीतील शेतमालक नितीन शेंद्रे यांनी परिसरातील बेकायदेशीर बांधकाम व अतिक्रमणाविरोधात न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यानुसार गावातील तीन घरे आणि एका मंदिराचा काही भाग हटवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. ही घरे ज्या कुटुंबांची आहेत, ती १९८४ पासून तिथे राहत असल्याची माहिती समोर आली आहे. दयाराम नथुजी बोटरे, निलकंठ माकोरे (सध्या तिथे भगवान बालकृष्ण राऊत राहतात) आणि किसान गणपत राऊत यांच्या घरांमध्ये एकूण २४ जणांचे संयुक्त कुटुंब राहते. दयाराम बोटरे यांना १९८७-८८ साली इंदिरा गांधी आवास योजनेंतर्गत घर मिळाले होते, तर इतर कुटुंबांना २०१०-११ मध्ये घरकुल योजनेअंतर्गत घरे मिळाली होती.

पीडितांचे म्हणणे आहे की, ज्या ठिकाणी हाय टेन्शन लाईन आणि पांदन रस्ता दाखवून अतिक्रमण घोषित केले जात आहे, तिथे आधी घरे बांधली गेली होती आणि नंतर लाईन टाकण्यात आली. त्यांच्याकडे घरपट्टीची पावती व इतर आवश्यक कागदपत्रेही असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

तहसीलदार कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ३ जूनपर्यंत घर खाली करण्याचे नोटीस पीडितांना देण्यात आले होते. बुधवारी पोलिस बंदोबस्तासह प्रशासन वस्तीमध्ये पोहोचले, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप उसळला. घटनास्थळी तहसीलदार आणि नागरिकांमध्ये तीव्र शाब्दिक चकमकही झाली. अखेर दुपारी ४ वाजताच्या सुमारास पीडित कुटुंबे नागपूर उच्च न्यायालयातून ६ जूनपर्यंतचा स्थगन आदेश घेऊन आली, त्यामुळे प्रशासनाला तातडीने कारवाई थांबवावी लागली.

पीडित कुटुंबांची मागणी आहे की, जर प्रशासनाने अतिक्रमण हटवायचेच असेल, तर आधी त्यांना पर्यायी कायमस्वरूपी निवास द्यावा. "आधी घर दिलं, आता तोडायला आले, हा अन्याय आहे," असे पीडितांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. आता या प्रकरणात पुढे काय भूमिका घेतली जाईल, हे न्यायालयाच्या आगामी आदेशावर आणि प्रशासनाच्या धोरणावर अवलंबून असेल. सध्या मात्र सूराबर्डीत प्रशासन आणि नागरिकांमध्ये संघर्षाची स्थिती निर्माण झाली.

# कट्टा येथे महाराजस्व समाधान शिबीर संपन्न




■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ६** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर रामटेक तालुक्यातील देवलापार मंडळात मौजा कट्टा येथील आदिवासी समाज येथे दि. ४ जुन, २०२५ रोजी आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांचे मार्गदर्शनात आयोजीत करण्यात आले. सदर शिबीरात तहसीलदार रमेश कोळपे,देवलापार अप्पर तहसिलदार पुनम कदम यांचे व्यवस्थापनात सदर शिबीर यशस्वीरीत्या पार पाडले. देवलापार मंडळातील माजी जि.प.सदस्या शांताबाई कुंभरे,कट्टाच्या सरपंच वनिता टेकाम,वडांबा सरपंच मुकेश दुबे,डोंगरताल सरपंच उपेश उईके,कट्टा उपसरपंच विशाल वरठी हे उपस्थित होते.

देवलापार मंडळातील ग्रामपंचायत कट्टा, देवलापार, बांद्रा, डोंगरताल, वडांबा, बेलदा या ६ ग्रामपंचायत अंतर्गत गावातील नागरीकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देवून शिबीराचा लाभ घेतला. सदर शिबीरामध्ये तहसीलदार रमेश कोळपे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देवुन मार्गदर्शन केले व नागरिकांशी जनसंवाद करुन मुख्य अडचणी जाणुन घेतल्या. सदर शिबीरामध्ये तालुका रामटेक अंतर्गत सर्व विभागांकडून एकूण ३२० लाभार्थ्यांनी लाभ घेतला., आधार नोंदणी २७, महसुल विभागाअंतर्गत वनहक्क दावे, सेतु, निवडणुक ओळखपत्र, सात बारा वाटप, फेरफार नोंदणी, सं.गा.यो., पुरवठा विभाग ई. अंतर्गत १६३ लार्भार्थ्यांना लाभ देण्यात आला. आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी, आयुष्यमान कार्ड, आभा कार्ड, सिकलसेल तपासणी इत्यादी ६५ लाभ, भुमिअभिलेख विभागामार्फत सनद वाटप १७, पंचायत समीती कृषी विभागा अंतर्गत २१ लाभ, महिला बाल विकास विभागामार्फत बेबी केयर किट वाटप २, कृषी विभाग विविध योजनेचे १६ लाभ, अॅग्रीस्टॅक नोंदणी १०, आधार नोंदणी ३० लाभ देण्यात आले.

सदर शिबीरात महसुल विभागातील गटविकास अधिकारी जयसिंग जाधव,नायब तहसीलदार भोजराज बडवाईक, निरीक्षण अधिकारी संदेश हलमारे, सहा. गटविकास अधिकारी भुजाडे,मंडळ अधिकारी अमोल पोतदार मुनेश बांगर, तलाठी दिलीप रांचे, अमिर खान, श्रीमती सुनिता घाटे व कार्यालयीन कर्मचारी व ईतर विभागातील अधिकारी व कर्मचारी या शिबिराकरिता उपस्थित होते.

# दवलामेटीतील अतिक्रमणधारकांना न्याय द्या आवासभूमी अधिकार अभियानची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :** नागपूर ग्रामीण मधील दवलामेटी येथील अतिक्रमणधारकांनी जमिनीच्या पट्ट्यांसाठी आंदोलन सुरू केलेले असून या आंदोलनाची दखल घेऊन अतिक्रमणधारकांना न्याय देण्याची शहर विकास मंच- आवास भूमी अधिकार अभियानच्या वतीने सरकारकडे करण्यात आली आहे.

आवास -भूमी अधिकार अभियानचे संयोजक अनिल वासनिक व संघठक युवराज फुलझेले यांच्या नेतृत्वात एका शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खोडे व नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांची शुक्रवारी, 6 जून 2025 रोजी भेट घेऊन निवेदन सादर केले.

शिष्टमंडळात राजकुमार वंजारी, राजेंद्र कांबळे, रामदास उईके, शैलेंद्र वासनिक आदींचा समावेश होता. सरकारच्या सर्वांसाठी घरे या महत्वाकांक्षी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना अतिक्रमित जागा निवासासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने (शासन निर्णय क्र. ग्राम विकास विभाग, प्रआयो-2017/प्र.क्र. 348/ योजना-10/दि.16/02/2018) घेतला आहे. त्या नुसार शासकीय जमिनीवर निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमिणे नियमानुकूल करण्याबाबत स्पष्ट आदेश देण्यात आलेले आहेत.

या धोरणांतर्गत नागपूर ग्रामीण मधील दवलामेटी येथील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे पात्र ठरत असल्याने ही अतिक्रमणे नियमित करण्याबाबत योग्य कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी शहर विकास मंच- आवास भूमी अधिकार अभियानच्या वतीने अनिल वासनिक व युवराज फुलझेले यांनी केलेली आहे.

दवलामेटी येथील अतिक्रणधारकांनी ग्राम पंचायत कार्यालयासमोर दि. 2 मे 2025 पासून साखळी उपोषण तर दि. 2 जून 2025 पासून बेमुदत उपोषण सुरू केलेले असूनही त्यांच्या मागणीची योग्य दखल घेतली गेलेली नाही, लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या या आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी सरकारकडे व्यक्त केली आहे.

# आरोग्य व रक्तदान शिबिराचे आयोजन



■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ६ :** येथील शिवतिर्थ श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात विश्व हिंदू परिषद व बजरंग दल यांच्या वतीने शिवराज्याभिषेक सोहळा आणि भव्य आरोग्य व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महाराजांच्या प्रतिमेच्या दूग्धाभिषेक व विधिवत पूजनाने झाली.

त्यानंतर वाडीतील नागरिकांसाठी शालिनीताई मेघे रुग्णालयातील डॉक्टरांच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिर तसेच अमन ब्लड बँक च्या सहयोगाने रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात आरोग्य तपासणीसाठी १०१ नागरिकांनी सहभाग घेतला, तर रक्तदानासाठी ३४ शिवभक्तांनी आपले अमूल्य रक्तदान केले. कार्यक्रमाचे आयोजन विश्व हिंदू परिषद वाडीचे कार्यकर्ते विशाल जाधव, शुभम डवरे, जितेश गोरडे, रवी अजित, पवन बर्वे, अजय पाटणे, पवन बारबैले, संदीप मानकर, लोकेश जगताप, शिवम राजे, शुभम नाटकर यांनी केले. कार्यक्रमाला वाडी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे ,हर्षल काकडे, अतुल शिंदे, व्यंकटेश बाटवे, अमित हुसनापुरे, रजनीकांत अतकरी, संकल्प युवा फाऊंडेशनचे मंगेश खोरगडे, स्वप्नील कारंडे, रमेश धोटे उपस्थित होते.आयोजनासाठी वैभव राजे, रुपेश राजूरकर, सुमित ढोक, अजय चिंचोलकर, प्रवीण जैस्वाल, अंकुश बारबैले, अंश नरनवरे, गुलशन शेंडे, रोहन वाघमारे, विनय वडीचार, वेदांत लांडगे,श्वेता डवरे, नम्रता जाधव, प्राची बारबैले, श्रद्धा जगताप, विधी कोरे, शिवानी मिश्रा, प्राजक्ता सूर्यवंशी, प्राची कांबळे, आचलं गोरे, माधुरी बारबैले, नांदणी ठाकरे, मनस्वी पांडे, करीना गौळकर, प्रणिता क्षीरसागर, साक्षी मून आदींनी सहकार्य केले. कार्यक्रम उत्साहात पार पडला असून शिवभक्तांनी देशभक्ती व समाजसेवेचा उत्तम आदर्श या माध्यमातून प्रस्थापित केला.

# ओरिएंटल टोल प्लाझा येथे जागतिक पर्यावरण दिवस साजरा



■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ६** नागपूर- जबलपूर महामार्गावर खुमारी येथील ओरिएंटल टोल प्लाझा येथे दिनांक ५ जुन ला जागतीक पर्यावरण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.रावसाहेब झटाळे, मुख्य अतिथी महामार्ग पोलीस मदत केंद्र चे सहाय्यक पोलीस निरीक्षक अरुण बकाल, खुमारी येथील ओरीएंटल टोल प्लाझा चे प्रबंधक अतुल आदमने, खुमारी येथील पुण्यश्लोक शाळेच्या मुख्याध्यापीका यादव मॅडम, कांद्री येथील प्रकाश हायस्कुल चे मुख्यध्यापक मिलींद वानखेडे, खुमारी ग्रामपंचायत चे उपसरपंच उईके , रवि बावणकर, योगेश बोंद्रे,जियाउद्दीन सिद्दीकी, सतिश किरपान, आकाश यादव,पांडूरंग वाघाडे, मनोज सनोदिया,संजय मोहुर्ले, अनिल वर्मा व सर्व टोल नाका कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# वृत्तपत्र विक्रेते इंद्रपाल रामटेके यांचे निधन



■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ६ :** तालुक्यातील वृत्तपत्र विक्रेते इंद्रपाल अर्जुन रामटेके( वय ६०) यांचं गुरुवारी( ५) सायंकाळी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सावंगी( देवळी) या त्यांच्या पैतृक गावी शुक्रवारी दुपारी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. इंद्रपाल रामटेके हे गेली ४० वर्षांपासून वृत्तपत्र विक्रेते होते.

# विकसित कृषी संकल्प अभियान हे शेतकऱ्यांसाठी शासनाचे महत्त्वाचे पाऊल : डॉ. शानमूघम





■ **महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. ६** विकसित कृषी संकल्प अभियान हे शेतकऱ्यांचे जीवन मान उंचावण्यासाठी शासनाचे महत्त्वाचे पाऊल आहे. या अभियाना अंतर्गत शास्त्रज्ञांनी दिलेल्या मार्गदर्शनाचे पालन करून शेतीमध्ये सुधारणा करावी, असे आवाहन केंद्र शासनाचे वैज्ञानिक डॉ. शानमूघम यांनी केले.

ते खंडाळा (घटाटे) येथे ग्रामपंचायत कार्यालयात मंगळवारी 3 जूनला शेतकऱ्यांशी सरळ संवाद साधताना बोलत होते. ते पुढे म्हणाले की शेती आणि शेतकरी हा देशाच्या समृद्धीचा प्रमुख आधार आहे. आपल्या कृषी शास्त्रज्ञांनी अनेक संशोधने केली आहेत.

नवीन तंत्रज्ञान, प्रगत बियाणे, खते इत्यादीच्या मदतीने कमी खर्चात पीक उत्पादन वाढण्यासाठी प्रयत्न करावे असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.देशातील700 जिल्ह्यातील 1.5 कोटी शेतकऱ्यांशी कृषीतज्ञ 12 जून पर्यंत सरळ संवाद साधनार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पारशिवनी तालुक्यातील खंडाळा (घटाटे) या गावात अभियान घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच चेतन कुंभलकर तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रवींद्र केणे, महादेव गावंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य व्यंकट कारेमोरे, धडाडीचे शेतकरी नेते संजय सत्येकार उपस्थित होते. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरच्या डॉ. श्वेता लेंडे, कृषी महाविद्यालय नागपूर चे प्राध्यापक डॉ. आर आय खोब्रागडे, उपकृषी अधिकारी एस. पी. कुबडे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. क्रांती खारकर, डॉ. शायनी जोय यांनी भाजीपाला, फळबाग, कापूस लागवड, पशुसंवर्धन, शेती पूरक व्यवसाय आदी बाबतीत मार्गदर्शन केले. शेती व शेती पूरक जोडधंदे करताना येणाऱ्या अडचणी शेतकऱ्यांनी विशद केल्या. तर शेतकऱ्यांसाठी शासनाच्या चांगल्या योजना मृगजळ ठरू नये अशी माफक अपेक्षा रवींद्र केणे यांनी व्यक्त केली.

# काटोलात पार पडला शिव राज्याभिषेक सोहळा



■ **महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. ६** शहरात राजे शिवछत्रपती न.प.व्यापारी संकुल येथे शिव राज्याभिषेक सोहळा पार पडला. सदर सोहळा शिव राज्याभिषेक उत्सव समिती काटोल तर्फे आयोजित करण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी ६ जून १६७४ रोजी रायगडावर राज्यभिषेक करून "स्वराज्य" या संकल्पनेला मूर्त स्वरूप दिलं. हे केवळ सत्ता मिळवण्याचं नव्हतं, तर जनतेच्या हितासाठी, न्याय आणि अस्मितेसाठी उभारलेलं लोककल्याणकारी राज्य होतं.

शिवरायांनी संघर्ष, पराक्रम आणि दूरदृष्टी यांच्या बळावर अलुतेदार - बलुतेदारांना सोबत घेऊन हे स्वराज्य घडवलं, त्यामागे रयतेप्रतीची माया आणि सेवाभावाचा दृढ संकल्प होता. "स्वराज्य" हा शब्दच त्यांच्या जनतेविषयीच्या प्रेमाचं आणि उत्तरदायित्वाचं प्रतीक आहे. अशा रयतेच्या स्वराज्याचा स्मरण करणाऱ्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त काटोल मधील सर्व सामाजिक संघटना एकत्र येऊन आज महाराजांना अभिवादन करण्यात आले.

सदर कार्यक्रमास यशस्वी आयोजन पार पडण्याकरिता मिलिंद उर्फ पिंटू देशमुख , विवेक गायकवाड, बाबारावजी वाघमारे, जीवन गायकवाड, दिलीप सुतोन, माणिक नाईक, हर्षद बनसोड, प्रा. विजय कडू, प्रा. विरेंद्र इंगळे,प्रा. चंद्रभान गजभिये, कपिल गायकवाड, रामरावजी पाटील, डॉ.सुधाकर कावळे, हेमंत निंबाळकर, प्रशांत मानकर, इम्रान अली, प्रणय ठवळे, प्रशांत तायडे, अक्षय रेवतकर इत्यादी लोकांना राज्यभिषेक सोहळानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण




■ **महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. ६** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नगर परिषद सावनेरच्या वतीने मुख्याधिकारी किरण बगडे यांच्या अध्यक्षतेखाली वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला व हरित शपथ घेण्यात आली.

या उपक्रमांतर्गत सावनेर शहरातील गायकी ले-आउट परिसर, महाजन ले-आउट परिसर, माळेकर ले-आउट, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प केंद्र ई. परिसरात शहरातील नागरिक, नगर परिषद अधिकारी व कर्मचारी, सफाई कामगार, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प केंद्र कामगार यांचेकडून उत्साहाने वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी कले, निकोसे, मोरे, पाणी पुरवठा व स्वच्छता अभियंता कोलते, विद्युत अभियंता भोयर, लेखापाल खंडागळे, लेखापरीक्षक पाटील, प्रशासन अधिकारी पटले, प्र. स्वच्छता निरीक्षक देशमुख, अग्नीशमन अधिकारी वाडेकर, शहर समन्वयक वाटकर, प्र. आ. यो. अभियंता अवचट तसेच न. प. कर्मचारी रोषण धोटे, मेंढे, वाघमारे, लीडर, विनयकुमार, आकाश, बागडे, महाजन, पाठक, हजारे, हरुगवार, ई. कार्यालयीन कर्मचारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वृक्ष लावा, पर्यावरण वाचवा!**

या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनासाठी महिलांचा सक्रिय सहभाग वाढवण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# प्रवीण शर्मा विदर्भ गौरव सन्मानाने पुरस्कृत

■ **नागपूर :** विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात शिवसेना वंदनीय बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्षातर्फे विदभार्तील गरजू लोकांना वैद्यकीय सेवा व दिव्यांग बांधव, ज्येष्ठ नागरिक व दुर्घटनाग्रस्त गरजू व्यक्तीला लागणारे साहित्य पोहोचविण्याचे कार्य केले होते. विदभार्तील वैद्यकीय क्षेत्राचे प्रमुख म्हणून प्रवीण शर्मा यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विदर्भ गौरव सन्मानाने पुरस्कृत करण्यात आले.

# बँक ऑफ बडोदा प्रादेशिक कार्यालयात जागतिक पर्यावरण दिन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. ६** बँक ऑफ बडोदा, प्रादेशिक कार्यालय नागपूर येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बँकेचे उपमहाव्यवस्थापक आणि प्रादेशिक प्रमुख मनोज डी. वडोदरिया आणि एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत पी. जोशी यांनी वृक्षारोपण केले.

एम्स नागपूरच्या आवारात हे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रादेशिक प्रमुख मनोज वडोदरिया यांनी प्रदूषणाचे दुष्परिणाम स्पष्ट करताना सांगितले की, आजकाल जीवनशैलीतील बदल आणि आधुनिक गरजांमुळे आपण नैसर्गिक रचना हळूहळू नष्ट करत आहोत, प्रत्येक शहराचा विस्तार करण्यासाठी आणि शहरांना अधिक आकर्षक बनवण्यासाठी, विविध ठिकाणी इमारती बांधणी इत्यादींसाठी झाडे तोडली जातात, परंतु पुन्हा झाडे लावली जात नाहीत, ज्यामुळे पर्यावरण संतुलन बिघडत आहे.

एम्सचे कार्यकारी संचालक म्हणाले की, आजकाल प्रत्येक कार्यालय, घर आणि वाहनात एसीचा वापर सामान्य झाला आहे. अशा परिस्थितीत, एसीमधून निघणाऱ्या हानिकारक वायूंपासून संरक्षण करण्यासाठी, सर्व कर्मचाऱ्यांना विनंती करण्यात आली की त्यांनी त्यांची घरे आणि आजूबाजूचा परिसर हिरवागार करावा जेणेकरून पर्यावरण स्वच्छ होईल आणि येणाऱ्या काळात आपण पर्यावरणीय प्रदूषण नियंत्रित करू शकू. अशी आशा व्यक्त केली.

या प्रसंगी बँक ऑफ बडोदा एम्स शाखेचे प्रमुख रितेश शाहू आणि नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयाचे मुख्य व्यवस्थापक मोहन प्रशांतम आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.



**कोर्ट विद्यमान रमेश कोळपे तहसिलदार, रामटेक यांचे कार्यालय**

मौजा – नवेगाव (संग्रामपुर)
त.सा.क्र. ४६ अ
पेशी दिनांक : २०/०६/२०२५

**जाहिरनामा**

या जाहिरनामा व्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की,

**प्रपत्र**

| अर्जदाराचे नाव व पत्ता | गावाचे नाव व त.सा.क्र. | सर्व्हे क्रमांक | आराजी (हे.आर.) | प्रयोजन |
|---|---|---|---|---|
| श्री लक्ष्मण तुकाराम लिल्हारे | मौजा–नवेगाव (संग्रामपुर) त.सा.क्र. ४६अ | ५१/२ | १.४७ | जा नवेगाव (संग्रामपुर), येथील शेत सर्व्हे क्र. ५१/२ आराजी १.४७ हे. आर. आकारणी २.२६, भो. वर्ग– २ या जमीनीच्या ७/१२ वरील 'तुकाराम घुलबा लोधी' हे कुळाचे नाव कमी करून मिळण्याबाबत |

प्रपत्रात नमुद प्रयोजनाकरीता या कोर्टात अर्ज केलेला आहे. सदरचे अर्जावर कोणाचे काही आक्षेप वा उजर असल्यास आपले दिनांक २०/०६/२०२५ चे आत लेखी स्वरुपात कोर्टात दाखल करावे. यानंतर आलेले आक्षेप वा उजर विचारात येणार नाही.

हा जाहिरनामा आज दिनांक ०६/०६/२०२५ रोजी माझे कोर्टात शिक्क्यानिशी जाहीर करण्यात आले.

(रमेश कोळपे)
तहसिलदार, रामटेक

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बहादुरा येथे वृक्षारोपण

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ६ :




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नगर पंचायत बहादुरा तर्फे परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये नगर पंचायत बहादुरा हद्दीत स्मशान भूमी व खरबी परिसरात स्थानिक प्रजातीचे वृक्ष लावण्यात आले.

याप्रसंगी नगरपंचायत बहादुराचे मुख्याधिकारी राजेंद्र चिखलखुंदे, प्रशासकीय अधिकारी सागर ठाकरे, पाणी पुरवठा अभियंता श्रीकांत समर्थ, कर व प्रशासकीय अधिकारी साहस कनाळे, लेखाधिकारी प्रसाद कोरमकर, शहर अभियंता अक्षय झिरपे, शहर समन्वयक सुमित गव्हाळे, अजय भोयर,जीवन बावणे, महेश मांढरे, भावना घुगुसकर, माजी जि. प सदस्य सुभाष गुजरकर, माजी पं. स. सदस्य शुभांगी गायधणे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यानंतर वर्षभर नगरपंचायत हद्दीमध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम नगरपंचायत बहादुरा तर्फे घेण्यात येणार असून याकरीता नगरपंचायत बहादुरा तर्फे रोपवाटिका तयार करण्यात आली आहे. नगरपंचायत क्षेत्रामध्ये नागरीकांनी वृक्ष लागवड करून हरित आच्छादन तयार आवाहन करण्यात आले.

# लोककलाकार संघटनेचे पालकमंत्र्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ६ :

भारतीय लोककलाकार सांस्कृतिक संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी एक सुसंगठित निवेदन नागपूरचे पालकमंत्री तथा राज्याचे राजस्व मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांना सादर करण्यात आले. या निवेदनाच्या प्रसंगी मोठ्या संख्येने ग्रामीण आणि शहरी भागातील लोककलाकार आणि नागरिक उपस्थित होते.

संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश गरीबाजी काळे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. कलाकारांनी आपल्या समस्या आणि व्यथा पालकमंत्री महोदयांसमोर सविस्तरपणे मांडल्या. मुख्यतः लोककला आणि पारंपरिक कलाकारांना मिळणारी शासकीय मदत, त्यांचे मानधन, सामाजिक सुरक्षा, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये संधी यासारख्या मुद्द्यांचा यात समावेश होता.



पालकमंत्री बावनकुळे यांनी कलाकारांच्या सर्व मागण्या काळजीपूर्वक ऐकून घेतल्या आणि सकारात्मक विचार करून त्या सोडविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की पारंपरिक लोककला ही आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून, कलाकारांचे योगदान फार मोलाचे आहे.

त्यामुळे त्यांच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल. यावेळी संघटनेचे सचिव अनिल पारखी, ज्ञानेश्वर पाटील, वामनराव बरबत, सविता गडकिने, अश्विनी बोबडे, मीनाक्षी मिश्रा, गायिका पल्लवी नगराळे, आश्विन चंदेल, योगिता नवखरे, भूमिका वाघमारे, माधुरी कळसकर, सुकन्या थडकर, जयश्री सलोटे, कौशल्या मरबटे, पुषा मेश्राम, मंदा कांबळे, लता मेश्राम, रेखा मेश्राम, वंदना कथका, शीतल देवगिकर, प्रीती समरीत, निशा राठोड, कल्पना वंजारी, बंडू डहाके, रामकृष्ण सोते, शेषराव मेश्राम, अरुण ठवरे, रवींद्र भोयर, नंदकिशोर कावडे, शंकर कडोनी, ज्ञानेश्वर कठोली, ग्यानबा कठोले, मनोरमा दहिवले, निर्मला वांगुळकर, नंदा दुबे, प्रभा बनते, शोभा ठाकरे, कांता ढोबळे, मुक्ता चौधरी, बेबी सरातकर, ललिता बोबडे, निरंजन आधाऊ, पुष्पा कामफोडे, निरंजन होले, वंदना पाटील, सरिता गोंडाणे, सोनू गठाडे, अनुसयाताई, नलू साहरे, साक्षी सहारे, अलका वानखेडे, जशोदा बोबडे, सुमित्रा ताई, उपास शेंडे, सचिन भोयर, गजानन वाकडे, अशोक दहाके, अशोक सुदाम, मायाताई सोमकुवर, माधुरी हरणे, ममता ठाकरे, साधना डहाके, रेखा वाघ, वनिता डहाके, विनायक तितरमारे, बबन डफरे व छाया भोयर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे पार पडले असून, या निवेदनामुळे लोककलाकारांच्या प्रश्नांना प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे. संघटनेच्या वतीने कलाकारांच्या हक्कासाठी सुरू असलेला हा लढा अधिक जोमाने पुढे नेण्यात येणार असल्याचे अध्यक्ष प्रकाश काळे गुरुजी यांनी यावेळी सांगितले.

# मनपाच्या वृक्षारोपण अभियानाला मिळाली नागरिकांची साथ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :



महानगरपालिकेने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम 2.ड' अभियानांतर्गत शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. मनपाच्या आवाहनाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत या अभियानाला भरभरून साथ दिली.

मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या हस्ते गोरेवाडा परिसरात आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या हस्ते भांडेवाडी येथे वृक्षारोपण करून 'एक पेड माँ के नाम 2.ड' अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. तर सर्व झोनच्या सहायक आयुक्तांनी संबंधित झोन मध्ये वृक्षारोपण करीत अभियानात सक्रीय सहभाग नोंदविला.

यावेळी शहरातील विविध स्वयंसेवी संस्थांनी मनपाच्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद दिला. मनपाचे दहाही झोन कार्यालय, मनपाच्या शाळा, सर्व उद्याने, अग्निशमन केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांसह विविध सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार अतिरिक्त आयुक्त वसूमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्या मार्गदर्शनात वृक्षारोपण अभियान यशस्वीरीत्या राबविण्यात आले. मुख्य कार्यक्रम गोरेवाडा परिसरात आयोजित करण्यात आला. मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी मनपाचे उपायुक्त गणेश राठोड, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. तर अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या हस्ते भांडेवाडी येथे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता राजेश दुफारे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच मनपाच्या निगम सचिव डॉ. रंजना लाडे यांच्या हस्ते मनपा मुख्यालयातील परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, समाज कल्याण विभागाच्या नूतन मोरे, जयश्री गडकर, विनय त्रिकोलवार, रितेश बांते, प्रमोद खोब्रागडे यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

मनपाच्या झोन कार्यालयाद्वारे शहरातील नवनिर्माणनगर मैदान, मरार टोली मैदान, गोकुळपेठ मार्केट, माऊली नगर नाला, मानेवाडा घाट, गीता नगर मैदान, मोक्षधाम घाट, नरेंद्र नगर हजरी स्टँड, विरंगुळा केंद्र दर्शन कॉलनी, सक्करदरा उड्डाण पूल, ताजबाग उर्दू हायस्कूल, सी.पी.अँड बेरार महाविद्यालय चौक, नाईक तलाव परिसर, बाबुलबन अग्निशमन केंद्र कार्यालय परिसर, प्रियदर्शिनी गरोबा मैदान एनआयटी मैदान बाबुलबन, कपिल नगर मनपा शाळा, बोरगाव नाका, आदी विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. याशिवाय आयईसी चमूने दुपारी संविधान चौकात प्ले कार्डच्या माध्यमातून वाहनचालकांना पर्यावरण संवर्धनासाठी जागृत केले. यात चमूच्या सदस्यांनी विविध जलचर प्राण्याचे चित्र हाती घेऊन नागरिकांना घातक प्लास्टिक विषयी माहिती दिली. मनपाद्वारे शहरात पशूपक्ष्यांचा अधिवास वाढेल अशा वृक्षरोपांची लागवड करण्यात येत आहे.

## गुंड संदीप वर्मा तडीपार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

सतत गुन्हेगारीत सक्रीय गुंड संदीप भारत वर्मा (23) रा. महाकालीनगर झोपडपट्टीविरुद्ध झोन 4 च्या पोलिस उपायुक्त रश्मिता राव यांनी तडीपारीची कारवाई केली आहे. संदीपविरुद्ध गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यांची नोंद आहे.

बेलतरोडी पोलिसांनी संदीपची लगाम कसण्यासाठी अनेकदा प्रतिबंधक कारवई केली. त्यानंतरही तो गुन्हेगारीत सक्रीय होता. त्यामुळे बेलतरोडीचे ठाणेदार मुकुंद कवाडे आणि त्यांच्या पथकाने संदीपचा गुन्हेगारी रेकॉर्ड गोळा करून पोलिस उपायुक्त राव यांच्याकडे तडीपारीचा प्रस्ताव पाठवला. राव यांनी संदीपला दोन वर्षांसाठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश दिले. बेलतरोडी पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन छत्तीसगडच्या कबीर धाम येथे सोडले. ही कार्यवाही वपोनि मुकुंद कवाडे, सपोनि राम कांडुरे, पोहवा शैलेष बडोदेकर, हेमंत उईके, मंगेश कामिलकर आणि प्रियंका रामटेके यांनी केली.

# माँ गंगा दशहरानिमित्त हजारो दीपांनी उजळला अंबाळा तलाव

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ६ :



भारतीय जनसेवा मंडळ, माँ गंगा दशहरा दीप महोत्सव समिती, श्रीक्षेत्र अंबाळा ब्राम्हणवृंद आणि भाविक भक्तांगण यांच्या वतीने अंबाळा तलावाच्या काठावर माँ गंगा दशहरा दीप महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

रामटेक येथे अगस्ती आश्रमातील अखंड ज्योतीला दुसरी ज्योत पेटवून जैन मंदिर, बर्वे स्कूल, झेंडा चौक, गांधी चौक, लंबे हनुमान मंदिर या मार्गाने अंबाळा तलावाच्या काठावर आणली. या ज्योतीचे वाजतगाजत स्वागत करण्यात आले. येथे उपस्थित ब्राम्हणांकडुण वैदिक मंत्रोच्चारात तलावाच्या पाण्याचे विधिवत पूजन करण्यात आले. यानंतर माँ गंगेची महाआरती करण्यात आली.

हजारो भाविकांनी सोबत आणलेले दीप तलावात सोडले. तलावात तरंगणारे दीप जणू आकाशातील तारकासमूह रामटेकच्या भेटीला जमिनीवर उतरल्याचा भास होत होता. या तलावात गंगा-यमुना नदीचे पाणी पवित्र पाणी वास करते अशी भाविकांची श्रद्धा आहे. अगस्ती आश्रमातील संत दिवंगत गोपाल बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव दरवर्षी भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा केला जात होता. तीच परंपरा भारतीय जनसेवा मंडळाने कायम ठेवली आहे.

यावेळी भारतीय जनसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रपाल चौकसे यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव पार पडला. यानिमित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, जनसेवा मंडळाचे सचिव तथा माजी आमदार डी.मल्लिकार्जुन रेड्डी, कैलासपुरी महाराज, ज्ञानदास महाराज, विष्णुगिरी महाराज, शिवप्रेमाचंद महाराज, चंद्रकांत ठक्कर, सुभाष बघेले, शेखर बघेले, विनायक डोंगरे, शंकरराव चामलाटे, ऋषीकेश किंमतकर, नत्थू घरजाळे, मोहन कोठेकर, अमोल गाडवे,अनिल मुलमुले, सुभाष मुळे,अजय मेहरकुळे,राहुल कोठेकर,गोपाल काठोके,चंद्रकांत संगीतराय,नंदकिशोर पापडकर व मंडळाचे पदाधिकारी, अंबाळा येथील ब्राम्हणवृंद व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गती शक्ती कार्गो टर्मिनलमधून पहिला कोळसा रेक रवाना



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ६ :

मालवाहतुकीला चालना देणारा आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागामार्फत मूर्सा स्थानकावरील नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या गती शक्ती कार्गो टर्मिनल येथून प्रथम कोळसा रेक (59 इडठ वॅगन्स) यशस्वीरित्या लोड करून प्रेषित करण्यात आला आहे.

या रेकचे लोडिंग M/s MSPG कंपनीद्वारे करण्यात आले असून, तो महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सायडिंग (MFSG), भुसावळ विभागाच्या अंतर्गत, 427 किलोमीटरच्या एकूण अंतरासाठी पाठवण्यात आला. या माल वाहतुकीतून सुमारे 0.45 कोटी इतका अतिरिक्त मालवाहतूक महसूल अपेक्षित आहे.

पंतप्रधान गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत या GCT चे कमीशनिंग ही मल्टी मॉडल कनेक्टिव्हिटी सुधारण्याची व व्यवसाय करण्याच्या सुलभतेची दिशा निश्चित करणारी महत्त्वपूर्ण पायरी आहे. हा टर्मिनल कोळसा आणि इतर वस्तूंच्या मोठ्या प्रमाणात वाहतुकीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल व जलद आणि कार्यक्षम लॉजिस्टिक सेवा पुरवण्यात मदत करेल.

नागपूर विभाग सार्वजनिक-खाजगी भागीदारी आणि पायाभूत सुविधांच्या वाढीच्या माध्यमातून माल वाहतूक क्षमता वाढविण्यावर विशेष भर देत आहे. मूर्सा येथील हा नवीन टर्मिनल अधिकाधिक माल वाहतूक ग्राहकांना आकर्षित करेल, परिणामी विभागाच्या आर्थिक विकासास चालना मिळेल व भारतीय रेल्वेच्या माल वाहतूक हिस्सा वाढीस हातभार लागेल.

हा विकास नागपूर विभागाची पुरवठा साखळी मजबूत करण्याची व एकात्मिक व शाश्वत लॉजिस्टिक प्रणालीसाठी भारताच्या व्हिजन साठी असलेली कटिबद्धता अधोरेखित करतो.

# प्रामाणिक सेवावृत्ती हीच कर्तव्यपूर्तीचे समाधान होय : अनुराग राऊत

■ महासागर प्रतिनिधी,
मौदा, दि. ६ :



शिक्षकी पेशा हा उत्तम पेशा आहे. परंतु, आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या मोहजालामुळे अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत. मुलांचे पालक हे मुलांचे पहिले शिक्षक असतील, तर शिक्षक हे मुलांचे दुसरे पालक आहेत.

महाविद्यालयीन सेवेत सचोटीने कार्य करत राहणे ही प्रामाणिक सेवावृत्ती जोपासल्यास प्रत्येकाला कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभते. हेच समाधान सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य सुखकर करून जाते, शिक्षक आजीवन शिक्षक असतो तो कधीही माजी होत नाही, फक्त शासकीय नियमाने तो सेवानिवृत्त होत असतो, असे प्रतिपादन नवनियुक्त मुख्याध्यापक अनुराग राऊत यांनी केले.

तालुक्यातील धानला येथील सर्वोदय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथील मुख्याध्यापक संजय गिरडे हे निवृत्त झालेत. त्यांचा शाल, श्रीफळ देऊन संस्थेच्या वतीने भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त मुख्याध्यापक गिरडे यांनी शिक्षण विभागातील अधिकारी. शाळेतील सर्व कर्मचारी, विद्यार्थी, धानला गावातील पालक वर्ग स्थानिक पत्रकार संघातील पदाधिकारी यांनी वेळोवेळी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे गीरडे यांनी आभार व्यक्त केले. त्यानिमित्ताने नुकतेच सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन केले होते. त्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नवनियुक्त मुख्याध्यापक अनुराग राऊत बोलत होते.

सेवानिवृत्ती शुभेच्छा समारंभाच्या कार्यक्रमासाठी संस्था सचिव मोरेश्वर गारघाटे, सदस्य मोहन बालपांडे, केंद्रप्रमुख राजू आंबीलकर, राजेंद्रप्रसाद पाराशर, रमेश बेरड, नरेश सावसकडे, प्रतिभा रामकेलकर, वैशाली गिरडे, उपासना पाराशर, ललिता राजगिरे, रोहिणी पत्रे, मनोहर ठाकरे, देवराव हारोडे, उपस्थित होते.

पुढे बोलतांना नवनियुक्त मुख्याध्यापक अनुराग राऊत म्हणाले की शिक्षकी पेशा हा नोकरी म्हणून न करता प्रत्येक शिक्षकाने ते एक व्रत आहे अशी सेवा करावी. शिक्षक हा कधीच निवृत्त होत नसतो, शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे अखंड ज्ञानावर माझी श्रद्धा आहे. विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे काम शिक्षक करत असतो. शिक्षक म्हणजे ज्ञानाची विहीर व विद्यार्थी म्हणजे विहिरीबाहेर असलेला पोहरा आहे.

## बसपातर्फे वृक्षरोपण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

बहुजन समाज पार्टीने कही हम भूल ना जाये या राष्ट्रीय अभियान अंतर्गत आज विश्व पर्यावरण दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे व नागपूर जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बॅनर्जी लेआउट येथील कैकाडी महाराज उद्यान परिसरात दोन बोधीवृक्षाचे वृक्षरोपण केले.

याप्रसंगी नितीन वंजारी, दिलीप गजघाटे, जगदीश गेडाम, संभाजी लोखंडे, शामराव तिरपुडे, भाऊराव नगराळे, गौतम मून, छायाताई सोमकुवर, हनुमान उके, प्रेम गोटे, तथागत कांबळे, आस्था शेवडे, स्वरा भिष्णूकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## कार्यालय नगरपंचायत हिंगणा परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ६ :




वातावरणातील समतोल राखण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे काळाची गरज असल्याने कार्यालय नगरपंचायत हिंगणा द्वारे 5 जून जागतिक पर्यावरण दिनाच्या औचित्य साधून माननीय मुख्याधिकारी धनंजय सरनाईक व इतर सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याद्वारे विविध प्रजातींच्या फळझाडांचे व इतर वृक्षांचे रोपण करण्यात आले. यावेळी नगरपंचायतचे मुख्याधिकारी धनंजय सरनाईक, कार्यालय अधीक्षक विशाल नरवाडे कर निरीक्षक अमय मेटांगळे स्वच्छता निरीक्षक धर्मेंद्र गोतमारे, दौलत वानखेडे, संजय माहूरे, सुनील नागदेवे, रतपाल वाहणे, निखिल देशभ्रतार व शहर स्वच्छता समन्वयक जागृती लोहारे, शहरस्तरीय तंत्रदन प्रीती चकोले, पवन ढवळे, आकाश ढवळे, विठ्ठल गंडे, हिमाशु तिवारी व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## प्लास्टिक प्रदूषणावर आळा घालण्यासाठी जनजागृती उपक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

जागतिक पर्यावरण दिनानिमित्य महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर तर्फे जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदुषण मुक्त करणे या संकल्पनेवर आधारभुत मानून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. शिवबाला एस. भावसे, सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पाडला.

त्यात महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरण यांच्या निदेर्शानुसार, मंडळाने "जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करणे" या राष्ट्रीय संकल्पनेशी सुसंगत भूतलस्तरीय उपक्रम आणि जनजागृती मोहिमा राबविल्या. यामध्ये एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे नागपूर महानगरपालिके अंतर्गत सस्टेनेबल बिझनेस डेव्हलपमेंट या संस्थेद्वारे चालविलेल्या भांडेवाडी येथील नगरपालिका घनकचरा प्रक्रिया प्रकल्पास भेट देणे. या भेटीदरम्यान सुरेंद्र काळे, दिशा गोजे, आणि क्षितिजा सुर्यवंशी यांनी प्रकल्प प्रमुखांशी संवाद साधला. त्यांनी कचरा वर्गीकरण, आरडीएफ निर्मिती, कंपोस्टिंग, बायोमायनिंग आणि बायोगॅस प्रकल्पाच्या आगामी योजनांची माहिती घेतली. संपूर्ण उपक्रमाची आखणी व समन्वय श्री. सुरेंद्र काळे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

तसेच नागपूर रेल्वे स्टेशन येथे स्थानिक नागरिक व प्रवाश्यांना प्लास्टिक प्रदुषणाचे दुष्परिणामांबाबत माहिती देण्याकरीता रैली आयोजित करण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी स्थानिक नागरिकांना महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाच्या वतीने कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिक प्रदुषणाबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात आली. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त्याने महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अधिकारी/कर्मचारी यांचेकडून भविष्यात प्लास्टिक मुक्त परिसरबाबत शपथ घेण्यात आली. तेलंगखेडी उद्यानात व बाह्य भागात मंडळाचे अधिकारी / कर्मचारी यांनी सहभाग घेवून स्वच्छता अभियान राबवून परिसर प्लास्टिक मुक्त करण्यात आला. प्लास्टिक प्रदुषणाचे वाढते गांभीर्य व दुष्परिणाम लक्षात घेता भविष्यात प्लास्टिकचा वापर टाळावा असे आव्हान डॉ. शिवबाला एस., सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर यांचेतर्फे करण्यात आले.

# डॉ. राजीव पोतदार यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. ६ :




कळमेश्वरात आज भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य डॉ. राजीव पोतदार यांचा वाढदिवस होम हवन रक्तदान शिबिर तसेच पर्यावरण दिनानिमित्त रोपट्यांचे वाटप करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला दिनांक पाच जूनला सकाळी सात वाजता येथील तळ्याची पाल हनुमान मंदिरात वाढदिवसानिमित्त होम हवन पूजा अर्चना आटोपल्यानंतर डॉ. राजीव पोतदार यांच्या जनसंपर्क कार्यालयात संपूर्ण जिल्हाभरातून आलेल्या भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी व इतर सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.

या निमित्ताने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात 25 रक्तदात्यांनी रक्तदान केले पर्यावरण दिनाचे औचित्य साधत पर्यावरण दिन साजरा करण्यात आला व शुभेच्छा देण्याकरिता येणाऱ्यांना रोपट्याचे वाटप करण्यात आले. शुभेच्छा देण्याकरिता जिल्ह्यातून भाजपा कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची रीघ लागली होती. तसेच शहरांमधील. कळमेश्वर नागरिक सहकारी पतसंस्था केमिस्ट ड्रगिष्ट असोसिएशन सातपुडा क्रीडा सांस्कृतिक मंडळ व इतर सामाजिक संघटनेचे पदाधिकाऱ्यांनी डॉक्टर राजीव पोतदार यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सावनेर कळमेश्वर विधानसभा क्षेत्राचे आमदार आशिष देशमुख जिल्हा भाजपा अध्यक्ष मनोहर कुंभारे, कळमेश्वर तालुका अध्यक्ष प्रमोद हत्ती, शहर अध्यक्ष प्रतीक कोल्हे, आदर्श पटले ,संध्या गोतमारे, नरेश चरडे, दिलीप धोटे, मनोज चौरे, संजय मुलमुले, आनंद कदम, निलेश बुचुंडे, जीवन मुंगळे, सुरेंद्र शेंडे, युवराज मेश्राम, किशोर मुसळे, ईमेश्वर यावलकर, पियुष बर्डे, नितीन पुरी, प्रमोद पिंपळे , राहुल वाहने, विजय देशमुख, शामराव सरोदे, चंद्रशेखर लांडे, स्वप्निल चौधरी, मंगेश चोरे, वैभव टेकाडे, शैलेंद्र असोले, डॉ. संजय घोडखांदे, कळमेश्वर नागरिक पतसंस्थेच्या सुनंदा लंगडे, प्रकाश वरुडकर, माजी नगराध्यक्ष स्मुर्ती इखार, महादेव इखार, भगीरथ टेक्स्टाईल मिलचे शिशुपाल तुरकर, मनोज शेंडे, डॉ. मनोहर काळे, मंगला शेटे व अन्य मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. तसेच रक्तदान शिबिरासाठी साईनाथ ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची यशस्वीतेसाठी रवी खडसे, राहुल धारपुरे, आशिष पटेल, मंगेश मांगे, सचिन रघुवंशी, प्रवीण काथवटे, रशीद शेख, मुकेश भरके, मंगेश केशरवाणी, आदित्य जिचकार, रोहित बागडे, रफिक शेख, शंतनू कोल्हे. आदींनी सहकार्य केले.

# आपले काम सर्वोत्तम पद्धतीने करा : मंगल प्रभात लोढा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

आपणास देण्यात आलेले कोणतेही काम श्रेष्ठपणे करण्याची गरज आहे. कोणतेही काम छोटे अथवा मोठे असत नाही. प्रत्येक कामाला, कष्टाला सारखेच मूल्य असते. गीतेमध्ये हेच तत्वज्ञान सांगितले आहे. त्यामुळे आपले काम सर्वोत्तम पद्धतीने करीत यशाची शिखरे पादाक्रांत करण्याचे आवाहन कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले.



विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा रोजगार व प्रशिक्षण विभाग, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराज बाग चौक स्थित विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात आज रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री मंगल प्रभात लोढा बोलत होते.

रोजगार मेळाव्याला प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे, प्र कुलगुरू डॉ. सुभाष कोंडावार, राज्यपालनामित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नागपूरचे उपायुक्त प्रकाश देशमाने, सहआयुक्त सुनंदा बजाज, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची उपस्थिती होती.

कोणतेही काम छोटे किंवा मोठे नसून प्रत्येक कामाचा स्वीकार करावा, असे आवाहन मंगल प्रभात लोढा यांनी पुढे बोलताना केले. महाराष्ट्र तसेच देशात रोजगाराची कमी नाही. मात्र, महाराष्ट्रात विद्यार्थ्यांना पसंतीचा रोजगार मिळत नाही. कौशल्य अभाव असल्याने पीछेहाट होते. श्रमाचा सन्मान होण्याची गरज आहे. त्यामुळेच नळ कारागिराला 'वॉटर इंजिनियर'चे नाव देण्याचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना कौशल्य युक्त केले तर यांच्यामधून मोठे उद्योजक तयार होतील आणि भारत विकसित होईल असे मंगल प्रभात लोढा म्हणाले.

इच्छा असेल तर मार्ग सापडतात रोजगाराचा मार्ग तयार करण्यात विद्यापीठ मदत करीत असल्याचे प्रतिपादन प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे यांनी केले. उद्योजकांनी विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकास करावा, त्यांच्या कौशल्यातून कंपनीचा पर्यायाने भारताचा विकास होईल असे त्या यावेळी म्हणाल्या.

विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी याकरिता या रोजगार मिळाव्याचे आयोजन केल्याची माहिती जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नागपूरचे उपायुक्त प्रकाश देशमाने यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सहआयुक्त सुनंदा बजाज यांनी रोजगार मेळाव्याच्या स्वरूपाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ भूषण महाजन यांनी मानले. रोजगार मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

रोजगार मेळाव्यामध्ये ॲक्सिस बँक, इंडोरामा, टाटा तनिष्क, लाईट हाऊस सिस्टीम, निको अलॉय, करण कोठारी ज्वेलर्स, स्मार्ट हायजीया प्रायव्हेट लिमिटेड नागपूर, द युनिव्हर्सल ग्रुप असोसिएट नागपूर, मंशा टूर्स प्रायव्हेट लिमिटेड, वैभव इंटरप्राईजेस नागपूर, टाटा स्ट्राईव्ह एक्सटेन्शन सेंटर वाडी नागपूर, ईरॉस मेटल वर्क्स प्रायव्हेट लिमिटेड, महाचाय प्रायव्हेट लिमिटेड नागपूर, एलआयसी ऑफ इंडिया, टाइम प्रो इव्हेंट अँड एज्युटेक प्रायव्हेट लिमिटेड यासह विविध कंपन्या या रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी झाल्या.

## महिला अधिकाऱ्याच्या घरी घातला गोंधळ
# वरिष्ठ लिपिकाविरुद्ध गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

स्वेच्छा निवृत्तीच्या लाभापासून वंचित ठेवल्याच्या संशयातून चिडलेल्या समाज कल्याण विभागाच्या वरिष्ठ लिपिकाने महिला अधिकाऱ्याच्या घरासमोर येऊन चांगलाच गोंधळ घातला आणि त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना प्रतापनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी महिला अधिकाऱ्याच्या तक्रारीवरून आरोपी लिपिकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. सुशील शिंदे रा. भिलगाव, कामठी रोड असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुशील वरिष्ठ लिपिक पदावर कार्यरत आहे. मार्च महिन्यात सुशीलने स्वेच्छा निवृत्तीसाठी अर्ज दिला होता. तो अर्ज सरकारने मंजूरही केला. मात्र त्याला स्वेच्छा निवृत्तीचा लाभ अद्यापही मिळाला नाही. महिला अधिकाऱ्यामुळेच त्याला या लाभापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचा संशय सुशीलला होता. यावरून तो नेहमी महिलेच्या कार्यालयात जाऊन धमकी देत होता. मंगळवारी रात्री सुशील प्रतापनगर ठाण्यांतर्गत राहणाऱ्या महिला अधिकाऱ्याच्या घरी पोहोचला. अगदी गेटपुढे आपली कार थांबवली. जोर-जोरात हॉर्न वाजवू लागला. जवळपास पाऊन तास तो गोंधळ घालत राहिला. अखेर महिलेने पोलिस नियंत्रण कक्षाला सूचना दिली.

माहिती मिळताच प्रतापनगर पोलिस घटनास्थळी पोहोचले, मात्र सुशील तोपर्यंत तेथून पसार झाला होता. काही दिवसांपूर्वी त्याने दारूच्या नशेत कार चालवत वाडीच्या नवनीतनगरात ऑटोला धडक मारली होती. या अपघातात 65 वर्षीय महिलेसह 7 जण जखमी झाले होते. वाडी पोलिसांनी सुशीलविरुद्ध गुन्हाही नोंदविला होता. सुशीलच्या या प्रकारामुळे आता अधिकारी आणि कर्मचारी दहशतीत आहेत.

# आमडी ग्रामपंचायतीत वृक्षारोपण कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील आमडी ग्रामपंचायत येथील अमृत सरोवर स्थळी मनरेगा आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. पर्यावरण संवर्धन व हरित महाराष्ट्राच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल ग्रामस्थांच्या सहभागातून यशस्वी झाले.

"वृक्ष हेच जीवन - पर्यावरण रक्षणासाठी सर्वांनी एकत्र यावे" या संकल्पनेतून हरित महाराष्ट्र घडवण्याचा निर्धार करण्याचे मा. आयुक्तांनी सर्वांना आवाहन केले. कार्यक्रमात महिला बचत गटांचा सक्रीय सहभाग लाभला. महिला बचत गटांचे सामाजिक-आर्थिक सक्षमीकरण हेच खऱ्या परिवर्तनाचे पाऊल असे प्रतिपादन यावेळी आयुक्तांनी व्यक्त केले. मनरेगा अंतर्गत महिला बचत गटांनी कामांमध्ये सहभागी होऊन सक्षमीकरणाची दिशा घ्यावी, असे आवाहन देखील यावेळी केले.




### पारशिवनी व मौदा तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या कामांचा आढावा

यानंतर, आयुक्तांनी पारशिवनी तालुक्यातील बनपुरी आणि मौदा तालुक्यातील निसदखेडा या ग्रामपंचायतींना भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी संबंधित गावांच्या सरपंचांसोबत चर्चा केली तसेच मनरेगा अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचा कामनिहाय आढावा घेतला. मनरेगा अंतर्गत ग्रामपंचायतींमध्ये करण्यात आलेल्या दुतर्फा वृक्ष लागवड, फळबाग लागवड, सिंचन विहीर, बांबू लागवड, सिमेंट काँक्रीट रस्ते या कामांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. ही पाहणी ग्रामविकासाच्या दृष्टीने प्रभावी ठरली असून स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या विकास कामांची पारदर्शकता व गुणवत्ता वाढवण्याचा उद्देश असल्याचे आयुक्तांनी सांगितले. प्रसंगी उपायुक्त (मनरेगा) अरविंद उपरीकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) स्वाती देसाई, गटविकास अधिकारी (नरेगा) जि. प. वंदना भेले, गटविकास अधिकारी परशिवनी सुभाष जाधव तसेच, आईसी समन्वयक संकेत रामराजे, रविंद्र भुते, इमरान शेख, चंदू गोमासे, दर्शन आंबेडकर व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## बिबट्याच्या हल्ल्यात दोन बछड्यांचा मृत्यू झाला

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ६ :

रामटेक तालुक्यातील ग्रामीण भागात बिबट्या, वाघ इत्यादी वन्य प्राण्यांच्या हल्ल्याच्या घटना थांबण्याचे नाव घेत नाहीत. बुधवारी सकाळी एका बिबट्याने शेताच्या गोठ्यात बांधलेल्या दोन बछड्यांना ठार मारले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली.

रामटेक वनपरिक्षेत्रातील डोंगरी येथील रहिवासी दामोदर कुपाले यांच्या शेतात बांधलेल्या जनावरांवर मंगळवार-बुधवार रात्री एका बिबट्याने हल्ला करून दोन बछड्यांना ठार मारले. मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी दामोदर कुपाले यांनी मंगळवारी संध्याकाळी नेहमीप्रमाणे आपली जनावरे शेताच्या गोठ्यात बांधली आणि घरी परतले. बुधवारी सकाळी शेतात पोहोचल्यावर दोन बछडे मृतावस्थेत आढळले. शेतकरी दामोदर कुपाले यांनी याबाबत ग्रामस्थांना आणि रामटेक वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना माहिती दिली.

माहिती मिळताच संबंधित वन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. त्यांनी माहिती दिली की लवकरच अहवाल तयार करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केला जाईल आणि शेतकऱ्याला सरकारी मदतीचे आश्वासन दिले जाईल.

## येरल्यात पाच भूखंडधारकांवर एनएचआयचा अन्याय
# मोबदला न देता बेकायदेशीर संपादन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ६ :

नागपूर तालुक्यातील येरला येथील पाच भूखंडधारकांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणावर( एनएचआय ) अन्यायाचा गंभीर आरोप केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता आणि योग्य वाढीव मोबदला न देता बेकायदेशीररित्या भू संपादनाची कार्यवाही केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही कार्यवाही गुरुवार ५ जुन रोजी केली आहे.

या पाच भूखंडधारकांमध्ये जयंत काळमेघ, भगवान मिसाळ, महादेव मिसाळ, गोपाल मानकर आणि किशोर गमे यांचा समावेश आहे. हे सर्वजण मागील दोन वर्षांपासून भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यालयात हेलपाटे मारून थकले असले, तरी अद्याप त्यांना मोबदला मिळालेला नाही. प्रकरण उपविभागीय अधिकाऱ्याकडे सुरु असूनही जबरदस्तीची कार्यवाही केली आहे.या भूखंडधारकांचे वाढीव मोबदल्याचे प्रकरण सध्या उपविभागीय अधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयात प्रलंबित आहे. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करत संबंधित अधिकाऱ्यांनी संबंधितांच्या घरांवर जबरदस्तीची कार्यवाही सुरु केली आहे. यामुळे गावकरी प्रचंड संतप्त झाले आहेत.



भगवान मिसाळ व महादेव मिसाळ हे जेष्ठ नागरिक असूनही त्यांना सतत एनएचआयच्या अधिकाऱ्यांकडून त्रास दिला जात आहे. या वयोवृद्ध नागरिकांवर होणारी मानसिक व आर्थिक छळवणूक ही मानवाधिकारांच्या उल्लंघनासारखी असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

पीडित भूखंडधारकांनी या प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधित मगरूर अधिकाऱ्यांवर तत्काळ कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. स्थानिक प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घ्यावी, अशी मागणीही गावकऱ्यांनी केली आहे.

# मनपाच्या स्वच्छता दूतांना आता सुरक्षा कवच

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

नागपूर शहराला स्वच्छ, सुंदर आणि स्वस्थ साकारण्यासह आरोग्यदायी ठेवण्यासाठी दिवस-रात्र मेहनत करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना नागपूर महानगरपालिकेद्वारा पावसाळ्यापूर्व तयारीच्या अनुषंगाने नोज मास्क, हँडग्लोज, सेफ्टी जॅकेट व गमबूट आदी विविध सुरक्षा साहित्याचे झोन निहाय नियोजनबद्ध वाटप करण्यात आले.



मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार अतिरिक्त आयुक्त वासुमना पंत यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त राजेश भगत आणि मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्या देखरेखीत स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षा साहित्याचे झोन निहाय वाटप करण्यात आले. मनपामध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांकरिता विशेष निधी उपलब्ध करण्यात आली असून, शहराचे आरोग्य सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा कवच उपलब्ध केल्यामुळे त्यांना समाधान मिळाले आहे. शहर स्वच्छता आणि कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने मनपाने दहाही झोनमध्ये तैनात स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुरक्षा साहित्य दिले आहे. यामध्ये नोज मास्क, हँडग्लोज (रबर व साधे), सेफ्टी जॅकेट्स, गमबूट्स यांचा समावेश आहे. मनपा मुख्यालयासह दहाही झोनमध्ये आवश्यकतेनुसार साहित्याचे वितरण करण्यात येत आहे. यात लक्ष्मीनगर झोन, हनुमाननगर झोन, धंतोली झोन, सतरंजीपुरा झोन, आशीनगर झोन, मंगळवारी झोन येथील कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येकी १२८० नोज मास्क प्रदान करण्यात आले आहे. तर धरमपेठ झोन, गांधीबाग झोन आणि लकडगंज झोन मध्ये प्रत्येकी ६४० मास्कचे वितरण करण्यात आले आहे. याशिवाय नेहरूनगर झोन मध्ये ८२३, भांडेवाडी डम्पिंग यार्डमध्ये १५०, मनपा मुख्यालयात १००, नाला स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ५० नोज मास्क देण्यात आले आहे.

याशिवाय लक्ष्मीनगर झोनमध्ये २१७२, धरमपेठ झोन मध्ये ७२४, हनुमाननगर झोन मध्ये १६०० , धंतोली झोन मध्ये १२००, नेहरूनगर झोन मध्ये २२५०, गांधीबाग झोनमध्ये ९००, सतरंजीपुरा झोन मध्ये २१५० लकडगंज झोन मध्ये ९००, आशीनगर झोन आणि मंगळवारी झोन मध्ये प्रत्येकी १००० व भांडेवाडी डम्पिंग यार्ड मध्ये २९६, मनपा मुख्यालयात २३१७, शेल्टर हाउसमध्ये २४०, कोडवाडा मध्ये १२ हँडग्लोजचे वितरण करण्यात आले आहे. तर लक्ष्मीनगर झोन मध्ये ५००, धंतोली झोन मध्ये १०० भांडेवाडी डम्पिंग यार्ड मध्ये २४, मनपा मुख्यालयात १२०, नाला स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ६४, कत्तलखाना मध्ये २०० रबर हँडग्लोज देण्यात आले आहे.

लक्ष्मीनगर, हनुमाननगर, धंतोली, गांधीबाग, आशीनगर मंगळवारी झोन मध्ये प्रत्येकी १००, धरमपेठ झोन मध्ये १६०, नेहरूनगर झोन मध्ये ४००, सतरंजीपुरा झोन मध्ये ३००, लकडगंज झोन मध्ये ३५०, भांडेवाडी डम्पिंग यार्डमध्ये ४०, मनपा मुख्यालयात १२५ सेफ्टी जॅकेट्सचे वितरण करण्यात आले आहे. तसेच लक्ष्मीनगर, लकडगंज, मंगळवारी झोन मध्ये प्रत्येकी ६०, धरमपेठ झोन मध्ये ३०, हनुमान नगर झोन मध्ये २०, आशीनगर झोन मध्ये २०, भांडेवाडी डम्पिंग यार्ड मध्ये १०, मनपा मुख्यालयात ४०, नाला स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १०० आणि कत्तलखाना मध्ये ५ गमबूट्स वितरीत करण्यात आले आहे.

## गोवारी पुलावर पुन्हा एक टँकर धडकले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

सीताबर्डीच्या शहीद गोवारी पुलावर जड वाहनांना प्रतिबंध असतानाही सर्रास वाहतूक सुरू असते. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाकडून सोमवारी मध्यरात्री पुलावरील वाहतूक बंद करून दोन्ही टोकावर उंची मयार्दा कठडे बसविण्यात आले. या कामाला 24 तासही होत नाही तोच पेट्रोलने भरलेल्या टँकरने मंगळवारी सायंकाळी रहाटे कॉलनीकडून मॉरिस कॉलेस टी-पॉइंटकडे जाताना कठड्याला जोरदार धडक दिली. यात कठड्याचा वरचा भाग आणि सूचना फलक पूर्णतः तुटून नुकसान झाले. पोलिसांनी वाहन चालकाविरुद्ध सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केल्याचा गुन्हाही दाखल केला. त्यानंतर बुधवारी दुपारी एका टिप्परने मॉरिस कॉलेजकडून रहाटे कॉलनीकडे जाणाऱ्या मार्गावरील कठड्याला धडक दिली.

यात कठड्याचा वरचा भाग तुटण्यापासून वाचला मात्र सूचना फलकाचा चुराडा झाला. पुन्हा पोलिसांनी कठड्यात अडकलेला टिप्पर कसा-बसा बाहेर काढला. या घटनेला काही तास होत नाही तोच मध्यरात्रीला पुन्हा एक टँकरने त्याच कठड्याला धडक दिली. त्याच दरम्यान मागून येत असलेल्या कारचा चालक गोंधळला आणि त्याने टँकरला धडक दिली. या घटनेतही कोणतीही जीवित हानी किंवा गंभीर दुखापत झाली नाही, मात्र कठड्याचा वरचा भाग वाकला. तर कारचाही समोरच्या बोनटचे नुकसान झाले. तसेच एकामागेएक सलग कठड्याला धडकेच्या तीन घटना घडल्याने या कठड्यांवर एक प्रकारची संक्रांत असल्याची चर्चा आहे.

पुलावरून जड वाहनांची वाहतूक रोखण्यासाठी उड्डाणपुलाच्या दोन्ही टोकांवर उंची मयार्दा कठडे लावण्यात आले होते. कठड्यांवर जड वाहनांसाठी प्रतिबंधित असे सूचना फलकही लावण्यात आले होते. मात्र त्यानंतरही वाहन चालक निष्काळजीपणे पुलावरून जाण्याच्या प्रयत्नात या कठड्यांना धडक देत आहेत. मंगळवारी सायंकाळी पेट्रोलने भरलेला टँकरच या कठड्यावर धडकला होता. या अपघातात टँकर लिक होऊन स्फोट होण्याचीही शक्यता होती. मात्र सुदैवाने मोठी घटना टळली.

या घटनेच्या पुलावर आणि आसपास शेकडो लोक होते. अशात जर स्फोट झाला असता अनेकांना जीवही गमवावा लागला असता. त्यामुळे प्रशासनाने या घटनांची गंभीर दखल घेऊन काहीतरी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा मोठा अपघात घडल्याशिवाय राहणार नाही.

## माथेफिरू भावाची बहिणीला अमानूष मारहाण

**नागपूर** : कौटुंबिक वादातून एका माथेफिरूने आपल्या सख्ख्या वृद्ध बहिणीलाच अमानूष मारहाण केली. ही घटना अंबाझरी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी किरण गौरीशंकर शाहू (60) रा. रामनगर, तेलंगखेडी यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. कृष्णा गौरीशंकर शाहू (48) असे आरोपी भावाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, किरण आणि त्यांचे लहान भाऊ कृष्णा व जगदीश एकाच इमारतीत राहतात. पहिल्या माळ्यावर किरण राहते. त्यांनी इतर खोल्या भाड्याने दिल्या आहेत. भाड्याच्या पैशांवरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो. कृष्णा तळ माळ्यावर आपल्या कुटुंबासह राहतो. तो नेहमी लहान-लहान गोष्टींवरून किरणशी वाद घालत असतो. त्यामुळे किरणने त्याच्याविरुद्ध अंबाझरी ठाण्यात तक्रार दिली होती. गत 16 एप्रिलच्या दुपारी किरण आपल्या घरी जिन्यावर झाडू लावत होत्या. या दरम्यान कृष्णा तेथे आला. जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. किरण बेशुद्ध पडल्या. त्यानंतरही कृष्णा थांबला नाही आणि मारतच राहिला.

## मनपातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात सर्वप्रथम मनपाचे अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, उपायुक्त विजया बनकर, परिवहन अधिकारी विनोद जाधव, सहायक आयुक्त. श्याम कापसे, सुर्वणा दखने, मुख्य अग्निशमन अधिकारीतुषार बाराहाते यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राला माल्यार्पण केले. तसेच महापौर कक्षातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्रास अभिवादन करीत पुष्प अर्पण केले. याप्रसंगी साप्रविचे अधीक्षक राजकुमार मेश्राम, जनसंपर्क अधिकारी मनिष सोनी, सर्वश्री अमोल तपासे, प्रमोद हिवसे, प्रशांत भेंडे, परिमल इनामदार, विनय बगले, शैलेश जांभूळकर, प्रमोद बारई, संध्या डाखोरे, अनिता पाटील यांच्यासह मनपाचे कर्मचारी उपस्थित होते.

## धंतोलीत दिवसाढवळ्या बॅग लिफ्टिंग

### घटनेच्या १५ तासांत आरोपीस अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ६ :

दुचाकीस्वार दोन आरोपींनी एका व्यक्तीची 70 हजारांची रोकड असलेली बॅग पळविली. ही खळबळजनक घटना धंतोली ठाण्यांतर्गत भरदुपारी घडली. या घटनेमुळे प्रचंड खळबळ उडाली. मात्र, पोलिसांनी घटनेच्या 15 तासांत आरोपींचा शोध लावून एका युवकाला अटक केली. तुषार मेश्राम (22) रा. फुटाळा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

कुंजीलालपेठ येथील रहिवासी फिर्यादी पवन नरांजे (38) हे एका कंपनीत काम करतात. कंपनीचे कर्मचारी ठिकठिकाणाहून गोळा केलेली रक्कम बँकेत जमा करतात. आरोपी तुषार आणि त्याचा मित्र मंडप डेकोरेशनचे काम करतो. त्यांना पवन कलेक्शनचे काम करीत असून त्यांच्याकडे मोठी रक्कम राहात असल्याची माहिती मिळाली. त्यांनी काही दिवस रेकी केली. पवन ये-जा करीत असलेल्या मार्गावर पाळत ठेवली. कोणत्या मार्गावर लुटपाट करणे सोईचे राहिल, याचाही अभ्यास केला. घटनेच्या दिवशी म्हणजे 3 जून रोजी पवन यांनी धंतोली परिसरातील एका रुग्णालयातून 70 हजारांची रोख रक्कम घेतली. बॅगमध्ये भरली आणि रक्कम बँकेत भरण्यासाठी ते दुचाकीने निघाले. दुपारी 12.45 ते दीड वाजताच्या सुमारास पवन हे अभ्यंकर मार्गाने जात असताना त्यांच्या पाळतीवर असलेल्या आरोपींनी पाठलाग सुरू केला. संधी मिळताच मागे बसलेल्या युवकाने पवन जवळची पिशवी हिसकावली आणि पळाले. पवन यांनी मदतीसाठी आरडाओरड केली. मात्र, तोपर्यंत आरोपी पळून गेले होते. पवन यांच्या तक्रारीवरून धंतोली पोलिसांनी गुन्हा नोंदविला. पोलिस निरीक्षक अनामिका मिझापूरे यांनी घटनेची गंभीर दखल घेतली. घटनास्थळी पाहणी करून एक पथक तयार केले. पथकाने सीसीटीव्ही फुटेज तपासले. आरोपींची ओळख पटली आणि घटनेच्या पंधरा तासात आरोपींच्या मुसक्या आवळल्या. यापूर्वीही आरोपींनी कुठे बॅग लिप्टींग केली काय, ही योजना आखण्यासाठी कोणी टीप दिली, इत्यादी विषयांवर आरोपींची सखोल चौकशी सुरू आहे.

## सामुहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन
# विवाह करणाऱ्या दाम्पत्यांसाठी कन्यादान योजना

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ६ :

सामुहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणाऱ्या दाम्पत्यांसाठी कन्यादान योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेतर्गत सामुहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणाऱ्या वधूच्या पालकास पंचवीस हजार व संस्थेस प्रत्येक जोडप्यामागे चार हजार रुपये अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत २०२५-२६ वर्षासाठी 30 जूनपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. सामूहिक विवाह सोहळयात भाग घेऊन विवाह करणाऱ्या दाम्पत्यांनी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाकडे सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या संस्थेमार्फत आवश्यक कागदपत्रांसह 30 जूनपर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

समाज कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे. लाभार्थ्यांनी वेळेपुर्वीच अर्ज सादर केल्यास या योजनेंतर्गत लाभ मिळू शकतो. यासाठी कुठल्याही अमिषाला बळी न पडता लाभार्थ्यांनी थेट संपर्कही साधल्यास माहिती देण्याची व्यवस्था आहे. पात्रतेचे निकष - वधू व वर महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आसावेत. नवदाम्पत्यातील वधु वरापैकी दोन्ही किंवा एकजण हे अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह) विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवगार्तील असावेत. दांपत्यापैकी वराचे वय 21 व वधूचे वय 18 वर्षापेक्षा कमी असू नये. वधु व वर यांच्या प्रथम विवाहासाठीच हे अनुदान अनुज्ञेय असेल. योजनेचा लाभ विधवा महिलेस दुसऱ्या लग्नाकरिता देखील अनुज्ञेय राहील. जातीचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले असावे. सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व यंत्रणेचे निकष

स्वयंसेवी संस्था/यंत्रणा, स्थानिक नोंदणी अधिनियम, 1960 व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, 1850 अंतर्गत नोंदणीकृत असावी. सामुहिक विवाह सोहळ्यासाठी किमान 10 दाम्पत्ये (20 वधू व वर) असणे आवश्यक राहील. सामुहिक विवाह सोहळा आयोजित करण्यासाठी क्षेत्रबंधन लागू होणार नाही.

अर्ज असा करावा - ज्यांना सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये विवाह करावयाचा आहे त्या संस्थेमध्ये शासन निर्णयात दिलेल्या अर्जाच्या नमून्यानुसार शासन निर्णयात नमूद निकषानुसार परिपूर्ण अर्ज सादर करावा. सदर संस्थेमार्फत एकूण प्राप्त अर्ज विवाह संपन्न होण्याच्या 15 दिवस अगोदर सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयात सादर करावे.

## ४५४९ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर** : वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 4,549 वाहन चालकांवर कारवाई करून 5,30,000 रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये 6 व एनडीपीएस अन्वये 2 अशा 8 प्रकरणात 9 आरोपींवर कारवाई करून 1,0,955 रुपयांचा माल जप्त केला. तसचे महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये 8 प्रकरणात 13 जुगाऱ्यांवर कारवाई करून 95,375 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहन चालविताना सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे करण्यात आले आहे.